अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत

जुलै २०१२। किंमत १५ रुपये

















'शब्द' हे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. म्हणूनच त्याचा वापर काळजीपूर्वक आणि जपूनच केला पाहिजे. 'अठरा विश्वे दारिद्र्य', 'खांदेपालट', 'धर्मपत्नी' अशा काही शब्दांचे अर्थ आणि अनर्थ अत्यंत सोप्या आणि रंजक पद्धतीने डॉ. म. बा. कुलकर्णी यांनी आपल्या 'शब्दचर्चा' या पुस्तकात उलगडून दाखवले आहेत. वाचकांच्या पसंतीस उतरलेल्या या पुस्तकांस समीक्षकांनीही गौरविले आहे.

डॉ. म. बा. कुलकर्णी यांच्या 'शब्दचर्चा' या पुस्तकास महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पुणे यांचे **उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पारितोषिक** आणि नाशिक सार्वजनिक वाचनालय, नाशिक यांचा **ग. वि. अकोलकर पुरस्कार** जाहीर झाला आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जुलै २०१२ ◆ वर्ष बारावे ◆ अंक सातवा


अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **साहित्यवार्ता** | **१४** |
| **पुरस्कार** | **४४** |
| **पुस्तक परिचय** | **५०** |
| **इंग्रजी पुस्तक परिचय** | **६५** |
| **अभिप्राय** | **७८** |
| **ओळख लेखकांची** | **८४** |
| **वाचकांचा प्रतिसाद** | **९८** |
| **श्रद्धांजली** | **१०२** |
| **बालनगरी** | **१०४** |



संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

अंकाची किंमत १५रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता पब्लिशिंग हाऊस*



संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
Extension **(ग्रंथजगत विभाग) - २२७/२४३**
E-mail : info@mehtapublishinghouse.com


**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## संपादकीय

# ई-बुक्सच्या क्षेत्रात दिग्गजांची स्पर्धा

काही आठवड्यांपूर्वी मायक्रोसॉफ्टने बार्न्स अँड नोबलच्या (बी एन) ई-बुक प्रकल्पात ६०५ दशलक्ष डॉलर्स गुंतवण्याची घोषणा करून ई-बुकच्या जागतिक प्रसाराकरिता न्यूको या नव्या उपक्रमाचा शुभारंभ केला. जागतिक ग्रंथव्यवहारक्षेत्रात ही घटना क्रांतिकारक ठरेल.

आतापर्यंत लेखक-प्रकाशक-विक्रेता-ग्राहक-वाचक हे ग्रंथव्यवहाराच्या केंद्रस्थानी होते. आता मात्र ई-बुक्समुळे ॲपल, ॲमेझॉन, गुगल, मायक्रोसॉफ्ट, बार्न्स अँड नोबल, वगैरे कंपन्या किंडल, नूक, सोनी, टॅब्लेट, मोबाइल, स्मार्ट फोन वगैरे वाचनयंत्राच्या सहाय्याने, मल्टिमीडियाच्या माध्यमातून ग्रंथव्यवहारावर आपली पकड अधिकाधिक मजबूत करण्याच्या प्रयत्नात आहेत. ग्रंथव्यवहाराची सूत्रे प्रकाशकाऐवजी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नवनव्या संस्थांच्या हाती एकवटत आहेत, याची मायक्रोसॉफ्ट - बीएन हातमिळवणी ही एक निशाणी आहे.

ॲमेझॉनने किंडल हे वाचनयंत्र बाजारात आणून त्यावर लक्षावधी पुस्तके वाचता यावीत अशी सोय केली. किंडलमुळे इंटरनेट, संगणक यांची मदत न घेता स्वतंत्रपणे पुस्तक वाचण्याची सुविधा वाचकांना उपलब्ध झाली. परंतु आरंभी एकदा किंडल घेतले की कुठलेही पुस्तक डाऊनलोड करण्यासाठी किंडलचाच वापर करणे क्रमप्राप्त होते. किंडल असेल तरच पुस्तक ई-बुकच्या स्वरूपात वाचता येईल. किंडल नसेल तर ते वाचता येणार नाही ही मर्यादा वाचक-ग्राहकांना जाचक वाटणे स्वाभाविक होते. छापील पुस्तकाप्रमाणे किंडलवरचे पुस्तक मित्रांना वा

इतरांना देता येत नसे; एका किंडलवरून दुसऱ्या किंडलवर ट्रान्स्फर करता येत नसे. ॲमेझॉनने किंडलची किंमतही ५०० डॉलर्स ठेवल्याने सर्वसामान्य वाचकांना किंडलसाठी तेवढी गुंतवणूक करणे जड जात होते. कुठलेही पुस्तक डाऊनलोड करण्यासाठी ९.९९ डॉलर्स हा ॲमेझॉनचा दर होता. छापील पुस्तकांच्या किंमती त्यापेक्षा जास्त असल्याने वाचकाला काही पैसे वाचवता येत. त्याचबरोबर किंडलवर तीनचार हजार पुस्तके स्टोअर करणे शक्य असल्याने एक मोठी लायब्ररीच बरोबर घेऊन आपण सदासर्वकाळ फिरतोय असा अभिमान बाळगता येई.

'किंडल'ला प्रतिसाद मिळत गेला. ॲमेझॉनने पुढे किंडलमध्ये सुधारित तंत्रज्ञान वापरत त्याच्या किंमतीही १५० डॉलर्सच्या पातळीवर आणल्या. त्यामुळे 'किंडल'चा खप वाढत राहिला. तीसचाळीस लाख ग्राहकांपर्यंत तो पोचला. छापील नव्याजुन्या पुस्तकांच्या - हार्ड कव्हर पुस्तकांच्या बरोबरीने ई-बुक्सचा खप होऊ लागला. तेव्हा प्रकाशक-विक्रेत्यांना 'किंडल'ची स्पर्धा जाणवू लागली. ग्रंथदालनांतील विक्री कमी होऊ लागली. बॉर्डर्स ही पाचशेवर ग्रंथदालनांची विक्रीसंस्था दिवाळखोरीच्या खाईत अडकली. बार्न्स अँड नोबलचीही घसरगुंडी सुरू झाली. परंतु तिने सावधगिरी दाखवून नूक हे किंडलसारखे वाचनयंत्र दीडशे डॉलरमध्ये बाजारात आणले. त्यावर पुस्तके डाऊनलोड करण्याच्या दरात सवलती दिल्या. हार्डकव्हर छापील पुस्तकांच्या विक्रीत होणारी घट ई-बुक्सच्या वाढत्या विक्रीतून भरून काढली. ग्रंथव्यवहारातले आपले स्थान कायम राखले.

बार्न्स अँड नोबलमध्ये साठ कोटी डॉलर्सची गुंतवणूक करून मायक्रोसॉफ्टने तिचे भांडवल जवळजवळ दुप्पट केले आहे. मायक्रोसॉफ्टकडे आज २०० अब्ज डॉलर्सची माया आहे. ६० अब्जांची रोकड हातात आहे. तिच्या दृष्टीने १.७ अब्ज डॉलर्स म्हणजे किस झाडकी पत्ती असेच म्हणावे लागेल. परंतु या रकमेच्या बळावर 'बार्न्स अँड नोबल'च्या नूक या वाचनयंत्राला ॲमेझॉनच्या किंडलशी तोडीस तोड स्पर्धा करता येईल आणि ई-रीडिंगच्या प्लॅटफॉर्मचा जागतिक पातळीवर वेगाने प्रभाव पाडता येईल. आजमितीला जगातील ९० टक्के संगणकांमध्ये मायक्रोसॉफ्टची विंडोज् ऑपरेटिंग सिस्टिम वापरली जाते. त्यासाठी मायक्रोसॉफ्टने अब्जावधी डॉलर्स संशोधनावर खर्च केले आहेत. ऑनलाइन सर्व्हिसेस, जाहिराती, व्हिडिओ गेम्स, गुगलच्या

इंटरनेट सर्च मधील मक्तेदारीला आव्हान देणारे बिंग हे सर्च इंजिन या आणि इतर व्यवसायांतही अमाप गुंतवणूक केली आहे. असे असूनही मायक्रोसॉफ्टला ८० टक्के उत्पन्न हे वुइंडोज् ऑपरेटिंग सिस्टिम आणि ऑफिस सूट यातून मिळते. मायक्रोसॉफ्टचे सॉफ्टवेअर ग्राहकांना विकत घ्यावे लागते. गुगल आपले क्रोम हे सॉफ्टवेअर फुकट देते. तरीही गुगलच्या क्रोमचा वापर फक्त दोन टक्के ग्राहकच करीत आहेत.

मायक्रोसॉफ्टने बार्न्स अँड नोबलच्या ई-बुकशी हातमिळवणी करून एका दगडात अनेक पक्षी मारले आहेत असे मानले जाते. या दोन्ही संस्थांची खास काही बलस्थाने आहेत. ती एकमेकांना पूरक ठरणारी आहेत.

१. बार्न्स अँड नोबलची अमेरिकेत पाचशेवर ग्रंथदालने आहेत. शिवाय विद्यापीठात पाठ्यपुस्तके व शालोपयोगी साहित्याची सातशेवर विक्रीकेंद्रे आहेत. त्या सर्वांमध्ये मायक्रोसॉफ्टला आपल्या उत्पादनांचा प्रसार करण्याची संधी मिळेल. मायक्रोसॉफ्टची वुइंडोज प्रणाली वापरणाऱ्या कोट्यवधी संगणकांद्वारे नूक वाचनयंत्राचा, ई-बुक्सचा, शैक्षणिक साहित्याचा प्रसार करून बी-एनलाही जगभर पोचता येईल. नूक ब्रँड हा आंतरराष्ट्रीय स्तरावर नेणे सुलभ ठरेल. ॲपलच्या टेक्स्टबुक क्षेत्रातील घोडदौडीला लगाम घालता येईल.

२. वुइंडोज ८ ही सुधारित प्रणाली मायक्रोसॉफ्ट मोबाइल स्मार्टफोनसाठी आणि टॅब्लेट पीसीसाठी विकसित करीत आहे. तिच्या द्वारे ई-बुक्स, ई-रीडिंगचा प्लॅटफॉर्म व्यापक होईल आणि सर्वदूर पोचवणे सोपे जाईल. बीएन ला त्याचा फायदा होईल. ॲमेझॉनशी टक्कर देण्यासाठी वुइंडोज८ ई-रीडिंग ॲपची निर्मिती करून मोबाइलचा सोईस्कर वापर करता येईल असे तंत्रज्ञान विकसित करीत आहे.

३. महाविद्यालयीन विद्यार्थी, त्यांना लागणारी पुस्तके, शिक्षकोपयोगी साहित्य, डिजिटल शैक्षणिक साहित्य, त्याचे वितरण यासाठी नूक स्टडी सॉफ्टवेअरचा प्लॅटफॉर्म सिद्ध करणे, ऑफलाइन - ऑनलाइन स्टोअर्सचे इंटिग्रेशन करणे, मायक्रोसॉफ्टला प्रचंड लाभदायक ठरेल.

४. बीएनने अमेरिकेप्रमाणेच इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, चीन, जपान, ब्राझील वगैरे देशात योग्य व सामर्थ्यशाली भागीदार आणि वितरक, गुंतवणूकदार आणि माध्यमतज्ज्ञ निवडून नूक ब्रँड जगभर न्यावा आणि ई-रीडिंगचे विश्वव्यापी व्यवस्थापन करावे. हा जागतिक विस्तार करताना स्थानिक, देशनिहाय बाजारपेठांची मदत घ्यावी. इंग्लंडमध्ये

वॉटरस्टोन्स या २००वर ग्रंथदालने असणाऱ्या विक्रीसंस्थेशी नूकने तसा करारही केला आहे.

५. डिजिटल टेक्स्ट बुक्सची निर्मिती करून मायक्रोसॉफ्ट 'आशय-कन्टेन्ट प्रोव्हायडर आणि ई-पब (प्रकाशक) अशा भूमिकेतून काम करील. मोबाइल स्मार्टफोनबाबत नोकियाशी मायक्रोसॉफ्टने करार केला आहे. नोकिया कंपनी विकत घेण्याचीही तयारी दाखवली आहे.

सोनी, कोबो (राकुटेन) गुगल वगैरे कंपन्याही ई-रीडिंग डिव्हायसेसच्या क्षेत्रात कार्यरत आहेतच. स्पर्धा असणारच.

एकूणच मायक्रोसॉफ्ट - बार्न्स अँड नोबल यांच्या नव्या युतीमुळे जागतिक ग्रंथव्यवहारात आणि ई-रीडिंग, ई-बुक क्षेत्रात क्रांतिकारक बदल होण्याची शक्यता दिसते. भारतातील ग्रंथविश्वाला या बदलत्या पर्यावरणात आपले अस्तित्व टिकवण्यासाठी योजनापूर्वक पावले टाकावी लागतील. या डिजिटल क्रांतीने किंडल, नूक वगैरे डेडिकेटेड वाचनयंत्रांच्या किमती कमी कमी होत चालल्या आहेत. काही कंपन्या तर उत्पादनखर्चापेक्षा कमी किंमतीत विक्री करीत आहेत. ई-बुक्सच्या डाऊनलोडिंग मधून जास्त फायदा होईल अशी त्यांची खात्री आहे. मोबाईल आणि टॅब्लेट यांचाही वापर ई-रीडिंगसाठी होत असल्याने वाचकांना त्यासाठी वेगळी गुंतवणूक करावी लागत नाही. अर्थात हव्या असलेल्या पुस्तकासाठी मात्र काही शुल्क द्यावे लागणार आहे. डिजिटल कन्टेन्टचा ग्राहक वर्ग वाढत राहणार आहे. त्यात मोठ्या कमाईची अपेक्षा असल्याने आयटी क्षेत्रातील कंपन्या नावीन्यपूर्ण कल्पनांचा पाठपुरावा करीत राहणार आहेत हेही स्पष्ट आहे.

भारतात आणि प्रादेशिक भाषांत या डिजिटल क्रांतीला पोषक स्थानिक तंत्रज्ञानाचा अभाव आहे. जागतिक प्रवाहातच राहून जेवढे जमेल तेवढे हस्तगत करणे - एवढेच माफक उद्दिष्ट समोर ठेवणे त्यामुळे क्रमप्राप्त आहे.

लंडन (एप्रिल २०१२) आणि फ्रँकफर्ट (ऑक्टोबर २०११) ग्रंथजत्रांमध्ये या डिजिटल क्रांतीचेच वर्चस्व जाणवले. छापील पुस्तकांचे स्टॉल रोडावलेले दिसले. आपल्या प्रकाशनक्षेत्राने या बदलत्या वातावरणाकडे दुर्लक्ष करणे आत्मघातकीपणाचे ठरेल.

# दिवाळी अंक २०१२

## रसिक वाचकांसाठी स्पर्धा
## एक हजार रुपयांची पुस्तके बक्षिस मिळवा

**वाचक मित्रांनो,**

- या दिवाळी अंकासाठीही एक स्पर्धा जाहीर करत आहोत.

- ही स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे. फक्त अट एवढीच की इ.स. २०११-२०१२ मध्ये तुम्ही एका पेक्षा जास्त पुस्तके विकत घेऊन वाचलेली असावीत.

- किमान दोन पुस्तके तरी दोन वर्षात विकत घेतलेली असणे आवश्यक. त्यासाठी बिल वगैरे पुरावा देण्याची गरज नाही. तुमच्या शब्दावर आमचा विश्वास आहे.

- आपण खरेदी केलेल्या पुस्तकांची नावे **(जास्तीत जास्त दहा)** पोस्टकार्डावर लिहून कळवा.

- त्यातील तुम्हाला सर्वात जास्त आवडलेल्या पुस्तकाबद्दल तीनचार ओळीत माहिती द्या.

- या स्पर्धेत भाग घेणाऱ्यांची नावे दिवाळी अंकात छापण्यात येतील.

- लॉट टाकून यशस्वी ठरणाऱ्या दोन स्पर्धकांना प्रत्येकी १,००० रुपयांची पुस्तके बक्षीस म्हणून देण्यात येतील

**पत्र पोचण्याची अंतिम मुदत ३० ऑगस्ट २०१२**

**आमचा पत्ता :**

मेहता पब्लिशिंग हाऊस, संपादक, मेहता मराठी ग्रंथजगत
१९४१ माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.
फोन – ०२०-२४४७६९२४




**आगामी**

# महात्मा गांधी आणि तीन माकडे

गांधीजींचे आचरण, गांधीजींची वचने

संपादन- **अनु कुमार**
रेखाटने- **आनंद नोरेम**
प्रस्तावन- **अनुपम खेर**
अनु.- प्रियंका कुलकर्णी

जो बदल तुम्हाला या जगात पाहायला आवडेल, तो बदल तुम्ही स्वत:त घडवला पाहिजे!

'मी काय करु शकतो? मी तर सामान्य माणूस!' अशा प्रकारचे उद्‍गार गांधीजींनी कधीच काढले नाहीत; ते नेहमी म्हणत, 'हळुवारपणानेही तुम्ही जग बदलू शकता!' आणि त्यांनी तसे केले.

आपल्या विचाराने आणि कृतीने गांधीजींनी लाखो भारतीयांना प्रेरित केले आणि एका सामर्थ्यशाली साम्राज्याला स्वत:च्या स्वप्नापुढे झुकायला भाग पाडले. 'स्वतंत्र भारत' या एकाच स्वप्नाने त्यांना असामान्य बनविले, लाखो भारतीयांचा अद्वितीय नेता बनविले. त्यांच्या पश्चात इतक्या दशकांनंतर आजही त्यांचे विचार आणि कार्य तितकेच प्रेरणादायी आहे. गांधीजींच्या आयुष्यात घडलेल्या ज्या प्रसंगांनी त्यांचे जीवन घडवले, अशा प्रसंगांचे व त्यावरील गांधीजींच्या विचारांचे एकत्रिकरण या पुस्तकात केलेले आहे. या पुस्तकाला श्री. अनुपम खेर यांची प्रस्तावना लाभली आहे. हे पुस्तक वाचून आपणही थोडंसं शिकू या!

**आगामी**




# याला जीवन ऐसे नाव

**संजीव परळीकर**

गोष्टीची पुस्तके आपल्याला नेहमीच आवडतात. छोट्या छोट्या गोष्टींचा संग्रह जर एकाच पुस्तकात मिळाला तर आपल्याला आणखीनच आवडते, त्यातूनही त्या पुस्तकात जर प्राण्यांच्या गोष्टी असतील तर मग काय विचारता! ह्या पुस्तकात छोट्या छोट्या चौदा गोष्टी आहेत. काही गोष्टी काल्पनिक आहेत, काही सत्यकथा आहेत, काही प्राण्यांच्या गोष्टी आहेत, तर काही इमेलद्वारे पोहोचल्या आहेत. ह्या गोष्टींतून जे मोठे धडे घ्यायचे ते तात्पर्यामध्ये लिहिले आहेत, पण हे धडे अमलात आणले तर आयुष्यावर दूरगामी परिणाम काय होतील. हे गोष्टींचे पुस्तक तुम्हाला निश्चित आवडेल.

**आगामी**




# अंतरीचा दिवा

**वि. स. खांडेकर**

**संपादक**

**डॉ. सुनीलकुमार लवटे**

वि. स. खांडेकर आणि त्यांच्या साहित्याबद्दल मराठीत खूप लिहिलं गेलं आहे.

मात्र, त्यांच्या चित्रपटसृष्टीतील कामगिरीबद्दलचा इतिहास झाकोळलेलाच राहिला.

याचं प्रमुख कारण होतं,

त्यांच्या पटकथांची अनुपलब्धता.

आता प्रथमच त्यांच्या पटकथांचा संग्रह 'अंतरीचा दिवा' मराठी वाचकांच्या हाती येत आहे. मराठी चित्रपटसृष्टीची मरगळ दूर होत असताना प्रज्वलित होणारा हा साहित्यिक नंदादीप पुन्हा एकदा ध्येयधुंद चित्रपटांची सांजवात पेटवत मराठी चित्रपटसृष्टीचा कायाकल्प घडवून आणील!

वि. स. खांडेकरांना मराठीचे मॅक्झिम गॉर्की, प्रेमचंद, शरच्चंद्र का म्हटलं जातं, हे समजून घ्यायचं तर हा 'अंतरीचा दिवा' एकदा का होईना,

आपल्या हृदयी मंद तेवत ठेवायलाच हवा.

आगामी




# गीतांजली

**रवींद्रनाथ टागोर**

**अनुवाद**
**डॉ. अमिता गोसावी**

हे छोटंसं फूल पटकन खुडून घे, विलंब करू नकोस! अन्यथा ते कोमेजून जमिनीवर धुळीत पडेल, अशी मला भीती वाटते.

त्याला तुझ्या गळ्यातील हारात जागा मिळाली नाही तरी चालेल; पण तुझ्या हाताने खुडून घेताना होणाऱ्या वेदनेने बहुमानित कर आणि खुडून घे.

मी सावध होण्याआधी बघता-बघता दिवस ढळेल आणि तुझ्या अर्चनेसाठी अर्पण होण्याची वेळ निघून जाईल, अशी मला भीती वाटते.

ह्या फुलाचा रंग जरासा उडालेला असला आणि गंध मंद झाला असला, तरी त्याला तुझ्या पूजेत सहभागी व्हायची संधी दे. वेळेतच त्याला खुडून घे.

**आगामी**




# कृष्णदेवराय

एका सम्राटाच्या दक्षतेची यशोगाथा

## डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली

विजयनगर साम्राज्य म्हणजे भारतीय हिंदुसंस्कृतीचा, हिंदवी स्वराज्य स्थापनेचा 'महोन्नत महामेरू' म्हणून ओळखले जाते. धर्म, संस्कृती, नृत्य, नाट्य, साहित्य, संगीत या संदर्भांत या साम्राज्याचे फार मोठे योगदान आहे. या साम्राज्याच्या इतिहासातील सर्व सम्राटात 'कृष्णदेवराय' हा अतुलनीय असा सम्राट होता. त्याच्या कारकीर्दीत विजयनगरची सेना दिग्विजयी गणली गेली. श्री चैतन्य महाप्रभू, वल्लभाचार्य, संत कनकदास, संत पुरंदरदास आदी सत्पुरुषांना त्याने सन्मानित केले. प्रख्यात मध्वाचार्य श्री व्यासतीर्थ हे त्याचे गुरू होते.

कृष्णदेवराय हा केवळ लष्करी बाण्याचा सम्राट नव्हता, तो लोकहितदक्ष राजाही होता. त्याने आपल्या प्रजेच्या सुखासाठी, लोकहितासाठी अनेक कामे केली. त्याच्या सामाजिक-सांस्कृतिक कार्याविषयी तत्कालीन परकीय पोर्तुगीज प्रवाशांच्या वृत्तांतातून विश्वसनीय माहिती व तपशील उपलब्ध झाले आहेत. या प्रवाशांनी विजयनगरला भेट देऊन तेथे काही दिवस वास्तव्य केले होते. तसेच कृष्णदेवरायाने खोदलेल्या शिलालेखातूनही त्याच्या कार्याची माहिती मिळते.

विजयनगरपासून बेळगाव, गोवा, कटक ते श्रीलंकेपर्यंत त्याने राज्य केले. कन्नड, तेलुगु, तमिळ, संस्कृत या विविध भाषांतून त्याने ग्रंथलेखन केले. आंध्रचा 'भोजराजा' म्हणून त्याची ख्याती सर्वदूर दरवळली.

त्याच्या दरबारात अष्टदिग्गज कवी होते. 'तेलुगु कालिदास' म्हणून सर्वश्रुत असलेल्या 'श्रीनाथ' कवीची त्याने सुवर्णतुला केली. अवघ्या एकोणीस वर्षांच्या कारकिर्दीत त्याने तिसाहून अधिक लढाया केल्या आणि सर्व जिंकल्या. त्याने लिहिलेल्या 'अमुक्तमाल्यदा' या काव्यग्रंथाची गणना तेलुगूतल्या सर्वश्रेष्ठ अशा पंचकाव्यात होते. शस्त्र आणि शास्त्र यांच्यावर अभूतपूर्व हुकमत गाजवणारा असा दुसरा सम्राट झाला नाही.




*** महाराष्ट्र टाईम्स - सुवर्णमहोत्सव**

महाराष्ट्रातील अग्रगण्य मराठी दैनिक महाराष्ट्र टाईम्स सुरू होऊन १८ जून २०१२ रोजी पन्नास वर्षे पूर्ण झाली. महाराष्ट्र टाईम्सने आणि विशेषत: त्याच्या रविवार पुरवणीने अफाट लोकप्रियता संपादन केली आणि मराठी वृत्तपत्रसृष्टीचा चेहरामोहरा बदलून टाकला. म.टा. च्या रविवार पुरवणीने मराठी साहित्य, संस्कृती आणि कला यांना प्राधान्य देऊन, त्यावेळच्या नवीन लेखकांना व कलावंतांना प्रोत्साहन देऊन वृत्तपत्रसृष्टीमध्ये नवे चैतन्य निर्माण केले. मराठी पुस्तके सर्वसामान्य वाचकांपर्यंत जावीत यासाठीही अनेक उपक्रम सुरू केले. तर या रविवार पुरवणीचे संपादन आरंभापासूनच श्री. शंकर सारडा हे करीत होते. सुवर्णमहोत्सवी खास अंकात महाराष्ट्र टाईम्सच्या आरंभीच्या यशाचे मुख्य शिलेदार म्हणून संपादक द्वा. भ. कर्णिक, पत्रकार माधव गडकरी आणि शंकर सारडा यांचा गौरव करण्यात आला आहे. यासंबंधी दिनकर गांगल यांनी आपल्या लेखात म्हटले आहे, 'पहिले संपादक द्वा. भ. कर्णिक हे विलक्षण उत्साही आणि सजग संपादक होते. माधव गडकरी यांनी जिल्ह्याजिल्ह्यातील राजकारणाचा मागोवा घेतला. शंकर सारडा यांनी महाराष्ट्राच्या साहित्यिक व सांस्कृतिक वातावरणाचे मर्म रविवार पुरवणीच्या माध्यमातून वाचकांसमोर मांडले. त्यांनी मराठी पत्रकारितेत आणलेली ही कालानुरूपता अजोड ठरली. म.टा. ची प्रतिष्ठा सर्वोच्च मानली जाऊ लागली. कर्णिक, गडकरी, सारडा या त्रिकुटाने म.टा.चे रूप घडविले. म.टा हे त्यावेळच्या प्रतिभाशाली नव्याजुन्या लेखक, कलावंतांचे अग्रगण्य व्यासपीठ बनले. सारडा हे समकालीन मराठी-इंग्रजी साहित्याचे अभ्यासक होते त्यामुळे त्यांना जगभरचे वाङ्मयीन प्रवाह परिचयाचे होते. त्याचे प्रत्यंतर म.टा. च्या रविवार पुरवणीद्वारे सर्वांना आले. विजया राजाध्यक्ष यांनी

आपल्या लेखात लिहिलंय की, ''मराठी लेखकांकडून कथा, कादंबरी, नाटक यासारख्या साहित्य प्रकारात भर पडत होती. म.टा. मधून शंकर सारडा यांनी त्याची समर्थपणे दखल घेतली. ते महत्त्वाच्या कथा कादंबऱ्यांवर विस्तृत परीक्षणे लिहीत. त्या परीक्षणांना ठळक मथळे असत.'' मराठी साहित्याच्या प्रचारप्रसारासाठी त्यांनी अनेक अभिनव उपक्रम राबविले. अनेक नवोदित लेखकांची बलस्थाने जाणून त्यांच्यावर लेखन केले. मराठी दैनिकांच्या रविवार पुरवण्यांना वाङ्मयीन परिमाण देऊन नवसाहित्याबद्दल आस्था आणि स्वागतशील वातावरण परिपुष्ट केले. चांगली पुस्तके घरोघर जावीत म्हणून स्वस्त पुस्तक योजना राबवली. हजारो वाचकांनी त्या योजनेतील पुस्तके घेऊन प्रकाशनक्षेत्राला लोकाभिमुख केले. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक जीवनात मटाने केलेले कार्य अभूतपूर्व आहे. आद्यसंपादक द्वा.भ. कर्णिक, गोविंद तळवलकर, कुमार केतकर या सर्व संपादकांनी म.टा.ची पताका उंच फडकवत ठेवली. सुवर्णमहोत्सवानिमित्त म.टा.ला शुभेच्छा.

*** मराठी विश्वकोश : सी-डॅक जिस्टकडून दोन खंडांचे लोकार्पण**

ज्ञानोपासनावृत्तीचा ऱ्हास झाल्यास समाजाचे काय होईल, अशी खंत ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांनी मराठी विश्वकोशाच्या सातव्या आणि आठव्या खंडाच्या लोकार्पण सोहळ्यात व्यक्त केली.

पर्सिस्टंट सिस्टिमचे डॉ. आनंद देशपांडे, विश्वकोश महामंडळाच्या अध्यक्षा डॉ. विजया वाड, सी-डॅक जिस्टचे महेश कुलकर्णी आदी यावेळी उपस्थित होते. जाधव म्हणाले, ''ज्ञानाच्या बळावर पुढे जाण्याचे हे युग असताना आपला समाज मात्र योग्य मार्गावर आहे असे दिसत नाही. त्यामुळे मला जास्त चिंता वाटते. असे हे वाळवंट पुढे दिसत असताना मला विश्वकोश म्हणजे ओॲसिसच वाटतो. विश्वकोश थेट माहितीच्या महाजालाद्वारे सर्वसामान्यांपर्यंत नेता येईल, याची कल्पनाही आमच्या पिढीने कधी केली नव्हती. मात्र, काळाशी सुसंगत असे धोरण स्वीकारल्याने हे शक्य झाले; अन्यथा ही पुस्तके गोडाऊनमध्ये पडून राहण्याचा धोकाही चिंता




**संकेत** / रणजित देसाई    **३री आवृत्ती**

वीतभर रुंदीच्या फण्याची, हिरव्या कंच डोळ्याची नागीण आपली पिवळीजर्द मान वळवत दुधारी जीभ काढून वैजूकडे पहात डोलत होता. त्या उमद्या जनावराकडे वैजू कौतुकाने पहात होता. तिच्यापुढे हात नाचवित होता.

**९०रु. पोस्टेज २०रु.**

निर्माण करतो.''

डॉ. देशपांडे म्हणाले, ''सी-डॅक जिस्टमुळे अद्ययावत तंत्रज्ञानाने दोन्ही खंडांचे लोकार्पण करता आले. महामंडळाने पन्नास वर्षांपासून केलेल्या मेहनतीचे चीज हे सर्व खंड ऑनलाइन झाल्यास होईल. त्याचा सर्वाधिक लाभ मुलांना आणि तरुण अभ्यासकांना होईल.'' डॉ. वाड यांनी विश्वकोशाला सर्वाधिक हिट्स २५ ते ४५ या वयोगटातील तरुणांकडून मिळत असल्याचे सांगितले.

*** मसाप वर्धापन दिन समारंभ**

''मराठी समाजाला एकत्र बांधून ठेवण्याचे, भाषेबाबत अभिमान जागविण्याचे मोलाचे कार्य साहित्य संस्थांनी केले. ही वाटचाल पुढे चालू राहावी, यासाठी साहित्य संस्थांनी नव्या पिढीला जोडून घ्यावे. कार्यकर्त्यांची फळी निर्माण करावी,'' अशी अपेक्षा अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या १०६ व्या वर्धापन दिनानिमित्ताने आयोजित समारंभात लेखक श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांना मसाप सन्मान पुरस्कार, तर 'ग्रंथाली'चे दिनकर गांगल यांना 'भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार' प्रा. तांबे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

गांगल म्हणाले, ''साहित्यसंस्था चैतन्यमय राहाव्यात यासाठी नवीन प्रवाह आत्मसात करून घ्यायला हवे. मोबाईलच्या छोट्या पडद्यापासून संगणकाच्या पडद्यापर्यंत माहिती मिळते, तेही एक प्रकारचे साहित्यच आहे. अशा अनेक बदलांचा अभ्यास करावा लागेल. हा माहोल समजून घ्यावा लागेल.''

*** डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचा सत्कार**

''भाषा ही महत्त्वाची असते ही गोष्ट आता आपण विसरत चाललो आहोत. इंग्रजी आली म्हणजे सर्व प्रश्न सुटतील, असा आपला समज झाला असून तो





**हुंकार** **१०वी आवृत्ती**

**व. पु. काळे**

तारुण्यातील बेरीज - वजाबाकीचा आलेख

**१२०रु. पोस्टेज २५रु.**

चुकीचा आहे.'' असे मत साहित्यिक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी व्यक्त केले.

'मराठी भाषा सल्लागार समिती'च्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल विश्वसाहित्य कलावर्धिनी आणि प्रगती प्रकाशनतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ, डॉ रंजना फडके, डॉ. मंदा खांडगे, घन:श्याम पाटील, सुरेश जैन यावेळी उपस्थित होते.

डॉ. रंजना फडके यांनी लिहिलेल्या 'चरित्रात्मक कादंबरी-लेखिकांचे योगदान' या पुस्तकाचे प्रकाशनही झाले.

डॉ. कोत्तापल्ले म्हणाले, ''आपल्या समाजजीवनात वेगवेगळ्या भूमिकांसाठी पुरुष मंडळी प्रथम पुढे आली. त्यामानाने स्त्रिया उशिरा आल्याने त्यांचा वेगळा विचार करावा लागतो. त्यात स्त्रियांची चूक नाही. समीक्षक मंडळी प्रामुख्याने पुरुष असल्याने स्त्रियांच्या लेखनाकडे सहानुभूतिपूर्वक पाहावे, असे त्यांना वाटत नसावे.''

संशोधनाविषयी ते म्हणाले, ''सध्या पीएचडीच्या वाटा सोप्या झाल्या आहेत. पीएचडीसाठी सोपा विषय निवडला जातो. त्यामुळे प्रबंधातील आकडे, नावे बदलतात, परंतु निष्कर्ष मात्र तेच राहतात. संशोधन ही जबाबदारीने करायची गोष्ट असते. ज्ञानात भर पडावी या हेतूने संशोधन केले पाहिजे.''

विद्या बाळ म्हणाल्या, ''सध्या विचार करण्याची इच्छा नष्ट होऊ लागली आहे. पुष्कळ चांगले प्रबंध पीएचडी नंतर धूळ खात पडलेले असतात. ते वाचकांसाठी उपलब्ध व्हायला हवेत.'' उद्धव कानडे यांनी सूत्रसंचालन केले.

### * धर्मकोशाचे प्रकाशन

ज्येष्ठ विचारवंत व प्राज्ञपाठशाळा मंडळाचे भूतपूर्व अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या १८व्या स्मृतिदिनानिमित्त २७ मे रोजी प्राज्ञपाठशाळा मंडळाने तयार केलेल्या धर्मकोशाच्या वर्णाश्रमधर्मकांडाच्या पाचव्या भागाचे प्रकाशन टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दीपक टिळक यांच्या हस्ते झाले. प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या अध्यक्षा डॉ. सरोजा भाटे अध्यक्षस्थानी होत्या.



**वुइ, दि पीपल** **६वी आवृत्ती**

**नानी पालखीवाला / अनु. वि. स. वाळिंबे**

भारताच्या राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक समस्यांवरील अभ्यासपूर्ण विवेचन

**२९५रु. पोस्टेज ३०रु.**

प्राज्ञपाठशाळा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती यांनी१९२५ मध्ये धर्मकोश प्रकल्पाचा आराखडा तयार केला. आजपर्यंत विविध कांडांचे एकूण २४ भाग प्रसिद्ध झाले आहेत आणि २० भाग प्रकाशित होणे बाकी आहेत. या लौकिकप्राप्त संदर्भग्रंथांचे मोल देशातील आणि विदेशातील पंडितांनी मान्य केलेले आहे. समाजपरिवर्तन विचाराचा एक महत्त्वाचा भाग म्हणूनच या ग्रंथप्रकल्पाची ख्याती आहे.

या ग्रंथरचनेला केवलानंद सरस्वती, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रा. मे. पुं. रेगे आणि डॉ. सरोजा भाटे यांचे मोलाचे योगदान लाभले आहे. याचा वापर संशोधक-अभ्यासक करतात; एवढेच नव्हे तर अमेरिका, जर्मनी, फ्रान्स, जपान, ऑस्ट्रेलिया आदी देशांतील विद्यापीठांकडून यास सातत्याने मागणी आहे. फ्रेंच पंडित लुई रेनाँ याने हा संदर्भग्रंथ प्रकल्प युरोपीय प्राच्यविद्याविशारदांना चकित करणारा आहे प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

*** भारतीय विद्यार्थ्याने उलगडले साडेतीनशे वर्षांहून जुने गणिती कोडे**

शौर्य रे या भारतीय वंशाच्या १६ वर्षाच्या विद्यार्थ्याने साडेतीनशे वर्षांपेक्षा जुन्या गणिती कोड्याची उकल केली आहे.

जर्मनीतील ड्रेस्डेनचा रहिवासी असलेल्या शौर्यने 'फंडामेन्टल पार्टिकल्स डायनॅमिक्स' विषयीच्या दोन सिद्धांतांची उकल केली. सर आयझॅक न्यूटन यांच्यानंतर ही उकल करणारा शौर्य हा दुसराच गणिततज्ज्ञ आहे.

शौर्यने उकललेल्या या कोड्यामुळे, एखादा चेंडू हवेत फेकल्यानंतर त्याचा हवेतील मार्ग वैज्ञानिकांना मोजता येईल. तसेच तो चेंडू भिंतीवर कशा प्रकारे आदळेल व नंतर उसळी मारेल हेदेखील समजण्यास मदत होईल. ड्रेस्डेन विद्यापीठाची सहल करताना शौर्यने हे कोडे सोडविण्याची इच्छा व्यक्त केली. अनेक दिग्गज प्राध्यापकांनाही ज्याची उकल करता आली नाही ते कोडे त्याने सहजगत्या सोडविले, असे या विद्यापीठातील एका प्राध्यापकाने सांगितले.

भारतीय अभियंत्याचा मुलगा शौर्य हा कोलकत्त्यातील चार वर्षांपूर्वी जर्मनीत





**बिझिनेस महाराजे** **९वी आवृत्ती**

**अनु. अशोक जैन**

बिझिनेस महाराजे म्हणजे भारतातील आठ विख्यात उद्योगपतींच्या यशाची उत्कंठावर्धक कहाणी

**२५०रु. पोस्टेज ३०रु.**

स्थलांतरित झाला होता. त्याने अल्पावधीतच जर्मन भाषेवर प्रभुत्व मिळवले.

### * तृतीयपंथीयांच्या जगण्याचा वेध

उत्तम तांत्रिक मूल्य आणि आशयावर लक्ष देत असताना मराठी सिनेमा चाकोरीबाहेरचे विषयही धाडसाने हाताळू लागला आहे. तृतीयपंथीयांच्या जगण्याचा वेध घेणारा 'आम्ही का तिसरे' हा सिनेमा त्यापैकीच एक!

ज्येष्ठ लेखिका पारू मदन नाईक यांच्या 'मी का नाही' या कादंबरीवर हा सिनेमा बेतला आहे. सिनेमाचे पटकथा लेखन आणि दिग्दर्शन राष्ट्रीय पुरस्कार विजेते रमेश मोरे यांनी केले असून, मिलिंद गवळी प्रमुख भूमिकेत आहेत. मंगेश मोकाशी, अतुल आगलावे, संदेश जाधव, उदय सबनीस, अनिल गवस, प्रमोद पवार, संजीवनी समेळ इतर भूमिकांमध्ये दिसतील. तृतीयपंथीयांना स्वतंत्र ओळख नाही. त्यांना समाजात नेहमीच हीन वागणूक मिळते, त्यांच्याविषयी गैरसमज आहेत. व्यवस्थेत राहूनही बाजूला पडलेल्या या समाजाला स्वत:विषयी आणि स्वत:च्या अस्तित्वाविषयी आता काही प्रश्न पडू लागले असून, त्याची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न तो करू लागला आहे. त्यासाठी संघर्ष करावा लागत आहे.

समीर आठल्ये (सिनेमॅटोग्राफी), मनोहर आचरेकर (कला दिग्दर्शन), वसंत कुबल (एडिटिंग), आणि अभिनेत्री अलका कुबल-आठल्ये (निर्मिती) यांचा त्यात सहभाग आहे.

लक्ष्मी नारायण त्रिपाठी या सिनेमाविषयी म्हणतात,''सगळे काही सामान्यांसारखे असूनही आम्हाला 'तिसरे' म्हणून का हिणवले जाते हा खरा प्रश्न आहे आणि त्यामुळेच आमची घुसमट होते आहे. या सिनेमामुळे लोकांचा आमच्या समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यास मदत होईल अशी आशा आहे.''

''या सिनेमातून एक दुर्लक्षित विषय हाताळण्याचा प्रयत्न केला आहे. अतिशय अवघड पद्धतीचं जीवन या समाजाला जगावं लागत आहे. ते आम्ही दाखवले आहे.'' असे दिग्दर्शक मोरे म्हणाले.





**इन्टिमेट** **११वी आवृत्ती**

**व. पु. काळे**

अभिनव कल्पनांच्या सहाय्यानं
मानवी स्वभावाचं बहुरंगी दर्शन

**१२०रु. पोस्टेज २५रु.**

*** मोबाईलवर मराठी वाहिन्या**

टेलिव्हिजन पाहण्यासाठी नुसत्या टीव्ही संचावर आता अवलंबून रहावे लागणार नाही. अगदी डेस्कटॉप, टॅबलेट, मोबाइल आणि लॅपटॉपवरही मराठी वाहिन्यांचे थेट प्रक्षेपण पाहता येणार आहे. डिट्टो टीव्हीने पारंपरिक पद्धतीने टीव्ही संचासमोर बसून पाहण्याचा ट्रेंड मोडून काढला असून, आता ॲप आणि इंटरनेटच्या माध्यमातून वाहिन्या कोणत्याही ठिकाणाहून पाहता येतील अशी सेवा कंपनीने उपलब्ध करून दिली आहे.

विंडोज, मॅक आणि अँड्रॉईड मोबाईलवर डिट्टो टीव्हीचे ॲप वापरून वाहिन्यांचे थेट प्रक्षेपण पाहता येईल. कंपनीने यासाठी मराठी वाहिनी झी२४ तास पासून सुरवात केली आहे. त्याचप्रमाणे झी मराठी वाहिनीचेही थेट प्रक्षेपण या ॲपचा वापर करून पाहता येईल. लवकरच आणखी मराठी वाहिन्यांचा समावेश या ॲप्ससाठी करण्यात येणार असल्याचे कंपनीच्या एका अधिकाऱ्याने सांगितले.

या ॲपच्या माध्यमातून सध्या सोनी, सब टीव्ही, टेन स्पोर्ट, टेन क्रिकेट, बीबीसी वर्ल्ड आणि सोनी मिक्स यांसारख्या वाहिन्याही डिट्टो टीव्हीने उपलब्ध करून दिल्या आहेत. विशेष म्हणजे ॲपल ॲप स्टोअर, अँड्रॉईड मार्केट, ब्लॅकबेरी ॲप्लिकेशन वर्ल्ड येथे हे ॲप उपलब्ध करून देण्यात आले आहेत. नेटिजन्सची सवय ओळखून कंपनीने अधिकाधिक वाहिन्या मोबाईलवरून थेट प्रक्षेपित करण्यास सुरवात केली आहे. इंटरनेट एनेबल उपकरणावर डिट्टो टीव्हीचे ॲप्लिकेशन डाऊनलोड झाल्यानंतर प्रेक्षकांना त्यांचा मोबाईल क्रमांक लॉग इन करण्यासाठी वापरावा लागेल. एकदा लॉग इन झाले की वाहिनीचे थेट प्रक्षेपण सुरू होईल. विंडोज आणि मॅक पीसीसाठी www.dittotv.com या संकेतस्थळावर जाऊन ॲप्लिकेशन डाऊनलोड करता येईल.

*** रंगकर्मींच्या ध्वनिफिती**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पुणे शाखेच्या वर्धापन दिनानिमित्त





**फक्कड गोष्टी** — **६वी आवृत्ती**

**शंकर पाटील**

शंकर पाटील यांचं ग्रामीण 'माणूस' समजावून घेण्याचं कसब दाखवणारे कथासंग्रह

**१२०रु. पोस्टेज २५रु.**

डॉ. लागू, श्रीकांत मोघे, लालन सारंग, सावकार आणि प्रभाकर पणशीकर या ज्येष्ठ रंगकर्मींच्या ध्वनिचित्रफितींचे लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी महापौर वैशाली बनकर, ज्येष्ठ अभिनेते श्रीराम लागू, प्रसाद सावकार, आमदार उल्हास पवार, नाट्यपरिषदेचे अध्यक्ष डॉ. सतीष देसाई, विजया पणशीकर आदी उपस्थित होते.

लालन सारंग म्हणाल्या, ''हा उपक्रम खूप पूर्वीच हाती घेणे गरजेचे होते. आज क्रीडा क्षेत्र व त्यातही क्रिकेट विषयी फार बोलले जाते. मात्र, कलाकारांविषयी काहीच बोलले जात नाही. चित्रपटातील कलाकार हे चित्रपटाच्या माध्यमातून रसिकांना पुढेही दिसतात. पण रंगकर्मींच्या बाबतीत असे घडत नाही. रंगकर्मींना ध्वनिचित्रफितीच्या माध्यमातून साठवून ठेवले नाही तर नाटकांचा इतिहास पुढे जाणार नाही. 'सखाराम बाईंडर', 'रथचक्र' ही माझ्या कारकीर्दीतील महत्त्वाची नाटके होती. मात्र या नाटकांचे कोणतेच डॉक्युमेंटेशन न झाल्यामुळे माझ्या हातात आता काहीच नाही. पण आता ही सुरवात झाली आहे. नाट्य परिषदेने इतर कलाकारांच्या ध्वनिचित्रफितीही लवकर तयार कराव्यात.''

*** सामर्थ्यवान माता**

अमेरिकेच्या परराष्ट्रमंत्री हिलरी क्लिंटन यांची जगातील सर्वात सामर्थ्यवान मातांच्या यादीत पहिल्या क्रमांकावर निवड झाली आहे. २० जणींच्या या यादीत पेप्सीकोच्या सचिव इंद्रा नुयी यांची तिसऱ्या क्रमांकावर तर काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांची सहाव्या क्रमांकावर निवड झाली आहे. जागतिक मातृदिनानिमित्त फोर्ब्ज मासिकाने ही यादी जाहीर केली. राजकारण, उद्योग, मनोरंजन अशा विविध क्षेत्रांतील महिलांची यात निवड करण्यात आली. ब्राझीलच्या ६४ वर्षे वयाच्या अध्यक्ष डिल्मा रोसेफ यांनी यादीत दुसरा क्रमांक पटकावला आहे.

'मीटिंगमध्ये मुलांचा फोन आला, तर मी फोन आधी उचलते,' असे ५६ वर्षे वयाच्या इंद्रा नुयी यांनी सांगितले.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांच्या पत्नी ७व्या तर म्यानमारच्या आँग



**गोष्टी माणसांच्या** **१५वी आवृत्ती**

**सुधा मूर्ती / अनु. लीना सोहोनी**

सुधा मूर्ती यांना भेटलेली माणसे, अस्सल अनुभव यांचे मार्मिक चित्रण

**१४०रु. पोस्टेज २०रु.**

सान स्यू की यादीत २०व्या स्थानावर आहेत.

बिल आणि मेलिंदा गेट्स फाऊंडेशनच्या सहसंस्थापक मेलिंदा गेट्स यांचाही यादीत समावेश आहे.

### * 'प्रथम बुक्स'ची मराठी प्रकाशने

माधुरी पुरंदरे यांच्या 'काकूचं बाळ' आणि 'बाबाच्या मिशा' या प्रथम बुक्स च्या दोन पुस्तकांचे प्रकाशन शिक्षणतज्ज्ञ मीना चंदावरकर यांच्या हस्ते झाले. मूळ मराठीतील या पुस्तकांसोबतच इंग्रजी, हिंदी, कन्नड, तेलगू या भाषांतील अनुवादही निघणार आहेत.

बाबांची गोष्ट सांगितल्यावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देताना मुलामुलींनी धमाल केली. तुमचे बाबा घरी भजी तळतात का या प्रश्नावर तर श्रोतृवर्गातील मुलामुलींनी त्यांच्या बाबांचे स्वयंपाकघरातील 'स्थान' उघड केले. आमचे बाबा भजी, चिप्स तळतात... त्यांना स्वयंपाकही चांगला येतो... याशिवाय ते ओरडतात, आमच्या सोबत दंगा करतात, त्यांच्या पोटावर पाय ठेवायला आवडते अशा खुमासदार उत्तरांनी उपस्थितांची चांगलीच करमणूक झाली.

### * 'अवध्य' व 'चॅलेंज' आता पुस्तकरूपात

स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांचे व्यक्तिमत्त्व उलगडण्याचा प्रयत्न 'अवध्य' आणि 'चॅलेंज' या दोन एकांकिकांमधून करण्यात आला होता. या दोन एकांकिकांनी आत्तापर्यंत अनेक स्पर्धांमध्ये पारितोषिके मिळवली असून, 'अवध्य'चा प्रयोग थेट अंदमानमध्येही झाला होता. दिक्पाल लांजेकर यांनी या दोन्ही एकांकिकांचे लेखन केले आहे. परेश एजन्सीच्या आभा प्रकाशनातर्फे प्रकाशित झालेल्या या एकांकिका संग्रहाला विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांची प्रस्तावना आहे.

लेखक दिक्पाल लांजेकर म्हणाले, ''हा संग्रह प्रकाशित करण्यामागे कोणताही व्यावसायिक हेतू नाही. सावरकरांचे विचार आजच्या काळातही सुसंगत वाटावेत





**एका पानाची कहाणी** **४थी आवृत्ती**

**वि.स.खांडेकर**

खांडेकरांसारख्या प्रतिभावंत लेखकाची प्रांजळ आत्मकथा

**२९५रु. पोस्टेज ३०रु.**

इतके पुरोगामी होते. सावरकर जहाल विचारवंत म्हणून सगळ्यांना माहित आहेत. मात्र त्यांचे माणूसपण उलगडणारी बाजू कधी समोर आली नव्हती. या दोन्ही एकांकिका त्यांच्या माणूसपणाची ओळख करून देतात.''

*** सोपी मराठी ज्ञानेश्वरी इंटरनेटवर**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या 'भावार्थ ज्ञानेश्वरी'च्या ओव्यांचे बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील लाखनवाडा येथील विजय पांढरे यांनी सोप्या मराठीत केलेले रूपांतर ठाणे येथील ई-साहित्य प्रतिष्ठान मार्फत www.esahitya.com या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्याला महाराष्ट्राबरोबर स्पेन, रशिया, स्वित्झर्लंड, सिंगापूर, इस्त्राईल आदी २५ देशांतील तीन लाख मराठीजनांनी भेट दिली आहे.

श्री. पांढरे म्हणाले, ''जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा एक ग्रंथ आहे.शके १२१२ मध्ये प्रचलित प्राकृतबहुल मराठीत लिहिलेली ज्ञानेश्वरी सध्याच्या काळातील मराठीजनांना समजणे काहीसे कठीण जाते. त्यामुळे ती सोप्या मराठीत रूपांतरित करण्यात आली आहे. अमृतानुभव, चांगदेव पासष्टी आदींचेही सोप्या मराठीतले भाषांतर वेबसाइटवर टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध करणार आहे.''

*** बालभारतीची ई-पाठ्यपुस्तके**

जूनमध्ये शाळा सुरू होण्यापूर्वी पाठ्यपुस्तके मिळावी, अशी विद्यार्थ्यांची अपेक्षा पूर्ण होतेच असे नाही. मात्र बालभारतीने पहिली ते आठवी पर्यंतची सर्व पुस्तके आपल्या वेबसाइटवर उपलब्ध करून दिली असल्याने, छापील स्वरूपातील पुस्तके मिळाली नाहीत, तरी अभ्यासात खंड पडण्याचे कारण नाही.

राज्यभरातील विद्यार्थ्यांसाठीच्या पुस्तकांची छपाई केली जात असल्याने काही वेळा बालभारतीकडून काही पुस्तके उशीराने बाजारात येतात. विशेषत: एखाद्या वर्षी अभ्यासक्रम बदलला तर विलंब होतो. त्यामुळेच गेल्या वर्षी शाळा सुरू होण्यापूर्वी





**जगप्रसिद्ध व्हा** **२री आवृत्ती**

**डॉ. अरूणा कौलगुड**

विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी यांच्यापासून सर्व वयोगटातील लोकांसाठी व्यक्तिमत्त्व विकासाचा नवा कानमंत्र

**१८०रु. पोस्टेज २५रु.**

पहिली ते तिसरीची काही पुस्तके प्रायोगिक स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली. त्याला विद्यार्थी-पालकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. पुढे टप्प्याटप्प्याने सर्व पुस्तके www.balbharati.in या वेबसाइटवर टाकण्यात आली.

आता पहिली ते आठवीपर्यंतची सर्व पुस्तके बालभारतीच्या वेबसाइटवर 'पीडीएफ' स्वरूपात उपलब्ध आहेत. मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजराथी, कन्नड, सिंधी, तेलगू आणि उर्दू अशा आठ माध्यमांची पुस्तके ऑनलाइन पाहण्याची आणि डाऊनलोड करून घेण्याची सोय झाली आहे.

*** 'नकोशी?' अल्बमचे प्रकाशन**

''स्त्री-भ्रूणहत्या रोखण्यासाठी महिलांनी क्रांती करण्याची गरज आहे. त्यासाठी पुरुषांनी, सरकारने त्यांना साथ द्यावी. स्त्री-भ्रूणहत्येसाठी मृत्युदंड हीच शिक्षा असावी.'' असे मत संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांनी व्यक्त केले.

स्त्री-भ्रूणहत्या या विषयावर शिवसम्राटने काढलेल्या 'नकोशी?' या अल्बमचे प्रकाशन झाले. समाजसेविका विद्या बाळ, अभिनेत्री लीला गांधी, दिग्दर्शिका सुमित्रा भावे, प्रसन्न ऑटिझम केंद्राच्या अध्यक्षा पद्मजा गोडबोले, गीतकार श्याम निकम, संगीतकार हर्षित अभिराज, अजित शिरोळे आदी उपस्थित होते.

मंगेशकर म्हणाले, ''स्त्रियांना कमी महत्त्व दिले जाते, त्यांचा विचार घेतला जात नाही हा आपल्या संस्कृतीतील दोष आहे. कोणत्याही हत्येला मृत्युदंड ही शिक्षा दिली जाते. तशीच भ्रूणहत्या करणाऱ्यांनाही द्यावी.''

मुलींना माणूस म्हणून खिजगणतीत घेतले जात नाही, हा दृष्टिकोन चुकीचा आहे असे विद्या बाळ यांनी नमूद केले. त्या म्हणाल्या, ''मुलगी काय कामाची? असे पालक समाजाला वाटते. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा ही कल्पना मनातून काढली पाहिजे. मनात समता असल्यास मुलगा की मुलगी हा फरक पडत नाही.''

गांधी म्हणाल्या, ''आमच्या काळी नाचणाऱ्या, चित्रपटात काम करणाऱ्या महिलांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन वाईट होता. पण मी, त्यातूनही मार्ग




**छंदातून विज्ञान** / डी. एस. इटोकर **९वी आवृत्ती**

निरुपयोगी वस्तूंपासून वैज्ञानिक उपकरणे कशी बनवायची याची मनोरंजक माहिती

**८०रु. पोस्टेज २०रु.**

काढत पुढे आले. सध्या अगदी लहान बाळांवरही अत्याचाराच्या बातम्या येतात. अशा राक्षसी लोकांना कडक शिक्षा झाली पाहिजे.''

''ऑटिझम हा मेंदूचा विकार झालेल्या मुलांना काही प्रमाणात उपचार मिळतात; पण बऱ्याच मुलींना मात्र असे उपचार मिळत नाहीत. मुलांकडे उद्याची गुंतवणूक म्हणून पालक पाहतात,'' असे गोडबोले यांनी सांगितले.

स्त्री-भ्रूणहत्येविरोधात महिलांनी पुन्हा धैर्याने उठावे, असे आवाहन सुमित्रा भावे यांनी केले. स्त्री अत्यंत सशक्त आहे. वेळ आल्यावर ती ताकदीने उभी राहते, असेही त्यांनी सांगितले.

*** पं. विजय सरदेशमुख यांचा सत्कार**

''संस्काराने समृद्ध असणारे आणि सूरतालात बुडून जाणारे गायक अलीकडे कमी दिसतात. या गायकांच्या परंपरेचा वारसा पंडित कुमार गंधर्वांचे शिष्य पं. विजय सरदेशमुख यांनी जपला आहे,'' असे गौरवाद्गार प्रसिद्ध तालयोगी पं. सुरेश तळवलकर यांनी काढले.

प्रसिद्ध गायक सरदेशमुख यांचा षष्ट्यब्दिपूर्तीनिमित्त पंडित तळवलकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात अला. आशय फिल्मचे वीरेंद्र चित्राव, 'रंग इव्हेंट'चे आनंद भांडवलकर, डीएसके चे धनंजय पाठकर, अभिनेता अजय पूरकर आदी यावेळी उपस्थित होते. या सत्काराने भारावून गेल्याची भावना पं. सरदेशमुख यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमात पंडित कुमार गंधर्व यांच्यावरील जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेली 'हंस अकेला' ही डॉक्युमेंटरी दाखविण्यात आली.

*** जगदीश खेबूडकर महोत्सव**

गीतकार आणि कवी जगदीश खेबूडकर यांच्या जयंतीनिमित्त नेहरू युवा केंद्र, राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय, खेबूडकर प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय




३री आवृत्ती

**शेवटची लढाई** / डॉ. आनंद यादव

सामाजिक, राजकीय विसंगतीचे दर्शन घडविणाऱ्या खुमासदार कथा

**१२०रु. पोस्टेज २०रु.**

महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

"गीतकार खेबूडकर यांचे मराठी चित्रपट संगीतामधील योगदान अमूल्य आहे. त्यांनी अनेक प्रकारची गाणी लिहिली. अत्यंत अभ्यासपूर्ण आणि वेगाने काम करण्याची त्यांची क्षमता थक्क करणारी होती," असे संगीतकार पंडित प्रभाकर जोग म्हणाले. यावेळी  महापौर बनकर यांच्या हस्ते लीला गांधी यांचा सत्कार करण्यात आला.

महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी खेबूडकरांनी रचलेल्या कवितांचे वाचन प्रदीप निफाडकर, अनिल कांबळे, दुर्गेश सोनार, अंजली कुलकर्णी, मोनिका जोशी यांनी केले. खेबूडकरांच्या आवाजातील गाण्यांच्या चित्रफितीही या वेळी दाखवण्यात आल्या. माझ्या घरात घरात सुख गाऊ दे सूरात, घडले ते विसरून जा आदी कवितांनी प्रेक्षक भारावून गेले.

### * १४ कोटी ९३ लाखांचा कॅमेरा

लायका हा १९२३ सालच्या सुरवातीला बनलेल्या २५ कॅमेऱ्यांपैकी एक आहे.

हा पहिला व्यावसायिक दृष्ट्या यशस्वी कॅमेरा असून ३५ एमएम फिल्मसाठी वापरला जाई.  लायका कंपनीची स्थापना १८४९ मध्ये झाली. ती लेन्स आणि सूक्ष्मदर्शकासाठी प्रसिद्ध होती.

या कंपनीचे लेन्स इंजिनिअर ऑस्कर बर्नाक फावल्या वेळात खूप चांगली फोटोग्राफी करीत असत. दम्याच्या विकारामुळे ऑस्करना एक छोटा आणि कमी वजनाचा कॅमेरा हवा होता. या त्यांच्या गरजेतून लायकाचा जन्म झाला.

३५ एमएम फिल्मची ताकद ओळखून बर्नाकने १९०८ ते १९२३ सालच्या दरम्यान आपल्या व्यक्तिगत वापरासाठी लायका कॅमेऱ्यांचे डिझाइन केले.

बर्नाकने आपली कल्पना वरिष्ठांकडे मांडली, तेव्हा अंतर्गत चाचणीसाठी शून्य सीरिजच्या २५ कॅमेऱ्यांची निर्मिती करण्यात आली.

या संदर्भात कंपनीला संमिश्र प्रतिक्रिया आल्या. कंपनीने धोका पत्करून




**ययाति** / वि. स. खांडेकर **३२वी आवृत्ती**

कै. विष्णु तथा भाऊसाहेब खांडेकर यांच्या एकूण साहित्यकृतींच्या रत्नमाळेतील 'ययाति'चे स्थान मेरुमण्यासारखे आहे.

**२५०रु. पोस्टेज ३०रु.**

१००० लायका कॅमेऱ्यांची निर्मिती केली.

वैशिष्ट्यपूर्ण लेन्सच्या या कॅमेऱ्याची विक्री १९२५ मध्ये सुरू झाली. १९३२ पर्यंत तब्बल ९० हजार कॅमेऱ्यांची विक्री झाली.

ही कंपनी आजसुद्धा कॅमेरा बनवणारी सर्वात मोठी कंपनी आहे.

*** '१२-१२-१२'च्या मुहूर्तावर नाट्य संमेलन**

शतकातून एकदाच येणारा '१२-१२-१२'चा अपूर्व योग साधून केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांना त्यांच्या वाढदिवसाची भेट देण्यासाठी यंदाचे नाट्यसंमेलन बारामतीत आयोजित केले जाणार आहे.

बारामती येथे यापूर्वीचे नाट्यसंमेलन शरद पवार राज्याचे मुख्यमंत्री असताना १९९५ मध्ये झाले होते. त्यावेळी पवार हेच संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते तर राजा गोसावी नाट्यसंमेलनाध्यक्ष होते.

*** 'ज्वालाग्राही पाकिस्तान'चे प्रकाशन**

हिंदू-मुस्लिम कधीही एकत्र नांदू शकत नाहीत, हा गैरसमज पाकिस्तानमध्ये पुरेपूर रुजल्यामुळे हाच मुद्दा दोन्ही देशांच्या संबंध सुधारण्यातील मोठा अडथळा ठरत आहे, असे प्रतिपादन ख्यातनाम पत्रकार एम. जे अकबर यांनी केले.

'ज्वालाग्राही पाकिस्तान' या अकबर यांच्या मराठी अनुवादाचे प्रकाशन मुख्यमंत्री पृथ्वीराज  चव्हाण यांच्या हस्ते झाले. 'सरहद'ने आयोजित केलेल्या या समारंभात व्यासपीठावर ज्येष्ठ पत्रकार अरविंद व्यं. गोखले, संजय नहार, रेखा देशपांडे, भारत देसरडा, आदित्यराज शहा उपस्थित होते.

अकबर म्हणाले, सर्वांना शांतता हवी आहे, मात्र पाकिस्तानाबाबतच हा प्रश्न निर्माण होतो. दोन देशांमध्ये असायला हवेत असे सौहार्दपूर्ण संबंध भारत-पाकिस्तानमध्ये नव्हते. आपण मानवतेच्या भूमिकेतून पाहात असलो, तरी पाकिस्तान मात्र केवळ द्विराष्ट्रवादाच्या भूमिकेतून भारताकडे पाहात असतो. याउलट बांगला देशचे उदाहरण देता येईल. त्या देशाने स्वत:ला बदलले, धर्माचे अस्तित्व मर्यादित केले. पाकिस्तानवरून





**१४वी आवृत्ती**

**घर हरवलेली माणसं** / व. पु. काळे

मनातलं, स्नेहाचं, प्रेमाचं, आत्मगौरवाचं घर हरवलेल्या माणसांच्या कथा

**१४०रु. पोस्टेज २५रु.**

एक बाब स्पष्ट होते की, केवळ धर्माच्या आधारे राष्ट्राची निर्मिती होऊ शकत नाही. दोन्ही देश एकाच दिवशी स्वतंत्र झाले असताना परस्परांच्या वाटा इतक्या भिन्न का, असाही प्रश्न निर्माण होतो. लोकशाही शासनप्रणाली, धर्मनिरपेक्षता, स्त्री-पुरुष समानता आणि दारिद्र्य निर्मूलन यामुळे आपली वाटचाल प्रगतीकडे होत आहे. त्या तुलनेत पाकिस्तान खूप मागे आहे. १९३७ साली मुस्लिम लीग निवडणुकीत हरली आणि त्यानंतर बॅरिस्टर जिनांनी आपली मूळची भूमिका बदलून स्वतंत्र पाकिस्तानच्या मागणीचा उच्चार केला असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री चव्हाण म्हणाले, १९४७ सालच्या फाळणीनंतरही भारतामध्ये मुसलमान गुण्यागोविंदाने राहात आहेत. धर्मनिरपेक्ष राष्ट्राची संकल्पना यशस्वी होत आहे, याचाच पोटशूळ पाकिस्तानमधील काही जणांना आहे. आपला विकासही वेगाने होत आहे; तो होऊ नये या हेतूनेही तेथील राज्यकर्त्यांनी थेट युद्धाऐवजी अप्रत्यक्ष युद्धाची रणनीती भारताविरुद्ध अवलंबली आहे. याउलट दोन्ही देशांमध्ये व्यापार, उद्योग, गुंतवणूक, सांस्कृतिक संबंध यांच्यात वाढ झाल्यास त्याचे फायदे दोन्ही देशांना होणार आहेत. त्या दिशेनेच आपली वाटचाल असावयास हवी.

*** फेरीवाल्यांचे नवे जग**

रस्त्याच्या कडेला छोट्याशा जागेतच भाजीपाला, फळे व अन्य वस्तू विकणारे फेरीवाले, हातगाडीवाले आणि पथारीवाले... गुंड, अतिक्रमण विभागाचे कर्मचारी व पोलिस यांचे सतत सावज होणारे फेरीवाले नागरिकांच्या टीकेचे धनी होतात. तसेच असुरक्षितता आणि कौटुंबिक समस्यांनाही त्यांना तोंड द्यावे लागते. अशा फेरीवाल्यांचे जीवन 'फेरीवाल्यांचे नवे जग' या लघुपटाद्वारे उलगडणार आहे.

शहरातील ४० हजारांहून अधिक हातगाडीवाले, फेरीवाले व पथारीवाले यांच्या प्रश्नांवर हा लघुपट प्रकाश टाकतो. लघुपटासाठी फर्ग्युसन महाविद्यालयाच्या आदिती मदाली या विद्यार्थिनीने दिग्दर्शनापासून ते छायाचित्रणापर्यंतचे काम केले आहे. पुणे विद्यापीठाच्या कम्युनिकेशन स्टडीजचा विद्यार्थी हृषीकेश आर्वीकर याचे संकलनासाठी सहकार्य लाभले आहे.




**अस्तित्व/** सुधा मुर्ती **१०वी आवृत्ती**

अनु. प्रा. ए.आर. यार्दी

भारतीय संस्कारांची साक्ष देणारी उत्कंठावर्धक कहाणी

**९०रु. पोस्टेज २०रु.**

आदिती म्हणाली, ''फेरीवाल्यांचे वास्तव आयुष्य या लघुपटातून मांडण्यात आलेले आहे. सामाजिक दृष्टिकोन समोर ठेवून बनविण्यात आलेल्या या लघुपटासाठी विलास चाफेकर, संजय शिर्के व सुनीता गुप्ता यांच्याकडून मार्गदर्शन मिळाले.''

जाणीव संघटनेचे कार्यवाह संजय शिर्के म्हणाले, ''फेरीवाल्यांचा १९५२ पासूनचा इतिहास लघुपटाद्वारे मांडण्यात आला आहे. त्यांचे प्रश्न, हक्क व कायदे याबाबत जनजागृती करण्यासाठी आदितीने केलेल्या लघुपटाचा मोठ्या प्रमाणात उपयोग होणार आहे.''

*** ज्ञानप्रबोधिनी विद्यार्थ्यांचे प्रकल्प गुगलच्या मॅपवर**

गुगलवर सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळतात असा 'समज' असला तरी त्यापेक्षा भन्नाट प्रश्नांवर थेट संशोधन करून पुणेकर विद्यार्थी जागतिक स्तरावर झळकू शकतात हे ज्ञानप्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांनी सिद्ध करून दाखवले आहे. गुगलतर्फे आयोजित गुगल सायन्स फेअर मध्ये ज्ञानप्रबोधिनीच्या दोन प्रकल्पांची एशिया-पॅसिफिक रिजनमध्ये पहिल्या दहा प्रकल्पांमध्ये निवड झाली आहे.

वर्गातील गोंगाटामुळे लक्ष केंद्रित होत नसल्याने अभ्यासाचे कसे 'खोबरे' होते यावर संशोधन करून आवाजाचे रूपांतर गोंगाटात झाल्यावर त्वरित वाजेल असा खास अलार्म या शाळेतील पाच विद्यार्थिनींच्या गटाने तयार केला आहे. पौर्णिमा शिंदे, पायल वरे, श्रद्धा कुकडे, प्रेरणा गुरव, आयुषी केळकर यांचा या प्रकल्पात सहभाग होता.

दुसऱ्या प्रकल्पात वातावरणात वाढत असलेल्या कार्बन डायऑक्साइडचा जलवनस्पतींच्या वाढीवर होणारा दुष्परिणाम अभिषेक देढे आणि श्रावण पाटणकर या विद्यार्थ्यांनी अभ्यासला आहे.

गुगलतर्फे पुढील महिन्यात अंतिम विजेते जाहीर करण्यात येतील. सर्व शाळांना स्पर्धेत ऑनलाइन सहभागी होण्याची संधी असून, याची सविस्तर माहिती गुगल सायन्स फेअर या लिंकवर उपलब्ध आहे.





**पर्व** **९वी आवृत्ती**

डॉ. एस.एल. भैरप्पा /अनु. उमा कुलकर्णी

महाभारताचा व त्यातील दैवी व्यक्तिरेखांचा वास्तव आणि मानवी दृष्टीकोनातून घेतलेला परामर्ष

**४००रु. पोस्टेज ३०रु.**

## * 'नादरूप'चे 'कथक इनफिनिट'

प्रख्यात कथक नृत्य कलाकार आणि गुरु शमा भाटे यांनी स्थापन केलेल्या 'नादरूप' या संस्थेला नुकतीच २५ वर्षे पूर्ण झाली. सर्जनशील कलाकार घडविण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या या संस्थेने रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त 'कथक इनफिनिट' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. ७ ते ८ वर्षे कथक नृत्यशैलीचे प्रशिक्षण घेतलेल्या ६० कथक नृत्यकलाकारांचा यात समावेश होता. संपूर्ण कार्यक्रम रेकॉर्डेड ट्रॅकवर सादर झाला. त्यातील काही गाणी पारंपरिक तर काही नवी होती. त्या गाण्यांना नरेंद्र भिडे यांनी संगीत दिले आहे. 'लय सोपान' ही वैशिष्ट्यपूर्ण थीम या कार्यक्रमात सादर झाली.

याच वर्षीच्या नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात होणाऱ्या 'कॉन्फ्ल्युएन्स' या नृत्याविष्कारात कस्तुरबा गांधी यांच्या जीवनप्रवासाचा वेध घेण्यात येणार आहे. त्या वेळी ऑस्ट्रियन जॅझ कलाकारांचा एक ग्रुपही सादरीकरण करणार आहे. २०१३ च्या मे महिन्यात 'मेलडी इनकार्नेट' या थीमवर लता मंगेशकर यांच्या काही गाण्यांवर नृत्य सादर करण्यात येणार आहे.

## * सावरकरांचा जीवनपट

मातृभूमीपासून लांब असताना आणि ब्रिटिशांचा ससेमिरा मागे असताना स्वातंत्र्यवीर सावरकरांना 'ने मजसी ने परत मातृभूमीला' हे गीत सुचले. हे गीत मातृभूमीवर असलेल्या अतीव प्रेमाची प्रचीती देते, असे विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांनी सांगितले.

सावरकरांच्या जयंतीनिमित्त आदित्य प्रतिष्ठानतर्फे 'स्वतंत्रते भगवती : एक अनोखा अविष्कार' या कार्यक्रमाचे आयोजन यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात करण्यात आले होते. सावरकरांच्या गीतांना संगीत देऊन समाजासमोर आणणाऱ्या हृदयनाथ मंगेशकर यांचा या कार्यक्रमात सहभाग होता. अभ्यंकर यांनी त्यांच्या विशिष्ट शैलीतल्या निरूपणातून उपस्थितांसमोर सावरकरांचे जीवन व प्रतिमा उभी केली. 'हे




५वी आवृत्ती

**आधुनिक भारताचे प्रेषित स्वामी विवेकानंद**

गौतम घोष/ अनु. माधव मोर्डेकर

स्वामीजींची अद्वितीय तेजोमयी जीवनगाथा

**२००रु. पोस्टेज २५रु.**

हिंदू नृसिंहा.... प्रभो शिवाजी राजा...' वगैरे गीते मंगेशकरांसमवेत गायिका विभावरी आपटे, जितेंद्र व आदित्य अभ्यंकर यांनी सादर केली.

### * 'आरके'चे चित्रपट होणार डिजिटल

दिवंगत राज कपूर यांच्या 'आर. के फिल्म्स'ने अनेक चांगल्या चित्रपटांची निर्मिती केली होती. 'आरके'चे हे क्लासिक चित्रपट आता डिजिटल पद्धतीने सुरक्षित करण्याचे कार्य 'यूएफओ डिजिटल'ने हाती घेतले आहे. भारतीय चित्रपटसृष्टीच्या १०० वर्षांच्या इतिहासातील लोकप्रिय आणि गाजलेल्या चित्रपटांची 'डिजिटल लायब्ररी' बनवण्याची जबाबदारी 'यूएफओ डिजिटल'ने हाती घेतली आहे. त्यामध्ये 'आरके'च्या अनेक चित्रपटांचा समावेश आहे. आत्तापर्यंत ५००० हून अधिक चित्रपटांचे 'डिजिटलायझेशन' पूर्ण झाले असून त्यामध्ये ३८०० हिंदी चित्रपटांचा समावेश आहे.

### * 'समर बोनान्झा' बालचित्रपट महोत्सव

मुलांसाठी खास बनविण्यात आलेले दर्जेदार बालचित्रपट मुलांना पाहता यावेत, यासाठी भाषा फाउंडेशन व चिल्ड्रेन फिल्म सोसायटीने दोनदिवसीय 'समर बोनान्झा' महोत्सवाचे आयोजन केले होते. बाल कलाकार केतकी माटेगावकर हिच्या हस्ते या महोत्सवाचे उद्घाटन झाले. यावेळी भाषा फाउंडेशनच्या अध्यक्षा स्वाती राजे व मिलेनियम इंजिनिअर्सचे नंबियार उपस्थित होते. महोत्सवासाठी चारशे मुलांबरोबरच वस्त्यांमधील दीडशेहून अधिक मुलांनीदेखील बालचित्रपटांचा आस्वाद घेतला.

''मी अभिनय करत असले तरीही गाणे ही माझी आवड आहे. आईने मला लहानपणी खूप पुस्तके वाचायला लावली. त्यामुळे गाणे व अभिनय या दोन्ही गोष्टी मी करू शकते. तुम्हीदेखील पुस्तकांचे मोठ्या प्रमाणावर वाचन करा. त्यामुळे तुमच्यात खूप बदल होऊ शकेल.'' अशा शब्दात केतकीने उपस्थित मुलांशी संवाद साधला.



**अरुणाची गोष्ट** ३री आवृत्ती

पिंकी विराणी / अनु. मीना कर्णिक

''आय वॉन्ट ॲन एन्ड टु धिस लाईफ'' असं देखील सांगू न शकणाऱ्या अरुणा शानबागची गाजलेली ही जगावेगळी सत्यकहाणी

**१८०रु. पोस्टेज २५रु.**

‘क्रिश ट्रीश बाल्टी बॉय’चे दिग्दर्शक तिलकराज शेट्टी म्हणाले. ‘‘घरातल्याच लोकांकडून ऐकून किंवा पुस्तके वाचल्यामुळे कथा सुचत जाते. पुस्तकांचे वाचन कल्पनाशक्ती वाढवते. फिल्म बनवताना कथा, संवाद, ध्वनिमुद्रण या गोष्टी झाल्यावर त्या स्टोरीबोर्डवर आणल्या जातात. पुढे एका-एका तुकड्यात तयार केलेली चित्रे जोडून ‘क्रिश ट्रीश बाल्टी बॉय’, ‘बच्चोंसे बाते’ आणि ‘चरणदास चोर’ यांसारखे चित्रपट पाहून उत्साहित झालेल्या बच्चे कंपनीने ‘काका तुम्हाला कथा कशी सुचते? ॲनिमेशन फिल्मसाठी किती दिवस लागतात? फिल्म कशी बनवली जाते? तुम्ही हिंदी पेक्षा मराठीतून फिल्म का नाही केली? यांसारखे प्रश्न विचारत बालचित्रपटांच्या दिग्दर्शकांना अक्षरश: भंडावून सोडले. नंतर त्याला आवाज दिला जातो. त्यामुळे ती पडद्यावर जिवंत वाटतात.’’

*** इंग्रजी पाठ्यपुस्तक**

इंग्रजीचे पाठ्यपुस्तक म्हणजे धडे-कविता नंतर अवघड शब्दांचे अर्थ आणि प्रश्नोत्तरे असे पारंपरिक स्वरूप बदलत विद्यार्थी थेट ‘कनेक्ट’ होतील, असे स्वागतार्ह बदल महाराष्ट्र बोर्डाच्या पाठ्यपुस्तकात करण्यात आलेले आहेत. इंटरनेटपासून, ॲडव्हेंचर आर्ट्सपर्यंत आणि ब्रेकिंग न्यूजपासून जनरल नॉलेजपर्यंत वैविध्यपूर्ण विषय आणि साहित्यप्रकारांचा समावेश असलेले ए फोर साइज रंगीत पाठ्यपुस्तक लवकरच बोर्डाच्या साइटवर पाहता येईल.

इंग्रजी तृतीय भाषा असलेल्या, मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी शिक्षणाच्या गरजा-आव्हाने डोळ्यासमोर ठेवून या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे. गद्य आणि पद्य असे विभाजन मोडीत काढत वेगवेगळ्या साहित्य प्रकारांची सरमिसळ करण्यात आली आहे. ब्रिटिश काउन्सिल, एक्सीईआरटी, पुणे विद्यापीठ, इंग्लिश अँड फॉरेन लँग्वेज-हैदराबाद अशा प्रतिष्ठित संस्थांनी या पुस्तकाच्या दर्जावर शिक्कामोर्तब केले आहे.

‘हसत खेळत शिक्षण (जॉयफुल लर्निंग), हा या नवीन पाठ्यपुस्तकाचा गाभा





**वलय** / व. पु. काळे

**१२वी आवृत्ती**

गुंतवून टाकणाऱ्या, विचार-भावनांची
वलये निर्माण करणाऱ्या कथा

**१२०रु. पोस्टेज २०रु.**

आहे. या पुस्तकात आशयाप्रमाणेच प्रभावी मांडणीवर भर देण्यात आला आहे. सीबीएसईसह अन्य बोर्डांची पुस्तके पारंपरिक असताना महाराष्ट्र बोर्डाने या पुस्तकाद्वारे फोर कलर ए-फोर आकाराच्या अद्ययावत पाठ्यपुस्तकाची निर्मिती केली आहे.

विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाची गोडी निर्माण व्हावी यासाठी पुस्तकाच्या सुरवातीलाच काही हलके-फुलके विनोद आहेत. इंग्रजी लेखकांच्या साहित्याबरोबरच बाबा आमटे, ग. प्र. प्रधान, सुधा मूर्ती, तेजस्विनी सावंत, शीतल महाजन यांच्या यशोगाथांचा समावेश केला गेला आहे. प्रा. गोवर्धन सोनावणे यांनी संशोधन अधिकारी म्हणून पुस्तकाच्या निर्मितीची जबाबदारी सांभाळली.

***   गहुंजेजवळ तुकोबारायांचे स्मारक**

अखिल भारतीय वारकरी मंडळाच्या वतीने आणि महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या सहकार्याने गहुंजे येथील सुब्रतो रॉय स्टेडियमजवळ संत तुकाराम महाराजांच्या वैकुंठगमनाचे स्मारक उभारण्यात येणार आहे. गहुंजे येथील सुब्रतो रॉय क्रिकेट स्टेडियमच्या प्रवेशद्वारास संत तुकाराम महाराजांचे नाव द्यावे अशी मागणी अखिल भारतीय वारकरी मंडळाने केली होती. अखिल भारतीय वारकरी मंडळाचे अध्यक्ष नंदकुमार भसे, सचिव संतोष शेलार, मुकुंद राऊत, निर्गुण बोडके यांची महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजय शिर्के, तेजपाल शहा, सुधाकर शहनवाज आदींबरोबर नुकतीच बैठक झाली. यात स्टेडियमच्या पूर्वेस वनविभागाच्या जागेत संत तुकाराम महाराजांचे वैकुंठगमन स्मारक उभारण्यावर एकमत झाले. जागेबाबत आदिवासी विकासमंत्री बबनराव पाचपुते यांच्याशी वारकरी मंडळाचे अध्यक्ष नंदकुमार भसे, संतोष शेलार, मुकुंद राऊत यांची पैठण येथील वारकरी मंडळाच्या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी चर्चा झाली. संबंधित जागा मागणी प्रस्तावाची फाईल वनविभागाला सादर करण्यास पाचपुते यांनी सांगितले. त्यासाठी सहकार्य करू, असे आश्वासन त्यांनी दिले.




**सखी** / व. पु. काळे

**१२वी आवृत्ती**

''वपुंची कथा हीच एक सखी आहे, असे वाटावे अशा कथा

**१४०रु. पोस्टेज २५रु.**

### * 'साहित्यप्रेमी'च्या अध्यक्षपदी ज्योत्स्ना आफळे यांची निवड

साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या अध्यक्षपदी डॉ. ज्योत्स्ना आफळे यांची निवड झाली. यामिनी रानडे (कोशाध्यक्ष), कविता भालेराव (सहकोशाध्यक्ष), मीरा शिंदे (कार्यवाह), डॉ. रंजना फडके, शलाका माटे (सहकार्यवाह), कविता मेहेंदळे, कुमुद राळे, डॉ. उज्ज्वला गोखले, वैशाली मोहिते, चंचल काळे (कार्यकारिणी सदस्य), डॉ. मंदा खांडगे (संशोधन विभागप्रमुख) यांची निवड करण्यात आली.

### * ग. प्र. प्रधान स्मृतिदिन

''ग. प्र. प्रधान सरांनी आयुष्यभर कार्यकर्त्यांचे वैचारिक अधिष्ठान बळकट करण्याचा ध्यास घेतला होता.'' असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांनी ३० मे रोजी केले.

प्रधान यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त एस. एम. जोशी सोशालिस्ट फाउंडेशनतर्फे इस्लामविषयक, मराठी ग्रंथांचे दालन खुले करण्यात आले. आबेदा इनामदार, डॉ. नरेंद्र दाभोळकर, अन्वर राजन, प्रवीण चव्हाण, व्यंकटेश सामराणी यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. प्रशांत गावंडे, नीलेश गुरव, मांगीलाल राठोड, युवराज पोटरे या स्पर्धा परीक्षातील यशवंतांचा सत्कार यावेळी करण्यात आला. सुदाम सातव प्रतिष्ठानतर्फे शांताबाई सातव यांनी राष्ट्रसेवा दल आणि फाउंडेशनला आर्थिक मदत केली.

वैद्य म्हणाले, ''पूवी प्रत्येक पक्षाचा अभ्यासगट असे व तो कार्यकर्त्यांना वैचारिकदृष्ट्या परिपक्व करीत असे. दुर्दैवाने आज कम्युनिस्ट पक्षासह अन्य पक्षांमध्येही कार्यकर्ता तयार करण्याची प्रक्रिया संपली आहे. त्यामुळे राजकीय पक्ष बेगडी होत आहेत.'' विचारांची प्रतिष्ठा ज्या देशात संपते तेथील लोकशाही धोक्यात येते, असे प्रतिपादन दाभोळकर यांनी केले. ग्रंथालये ही चळवळीचे केंद्र ठरावीत, अशी अपेक्षा अन्वर राजन यांनी व्यक्त केली. गंगाधर पटणे, विलास वाघ, प्रतिभा शिंदे आदी उपस्थित होते फाउंडेशनचे सचिव सुभाष वारे यांनी सूत्रसंचालन केले. आंतरधर्मीय विवाहाबद्दल निकुंज पटेल आणि शानिया या दांपत्याचा सत्कारही यावेळी करण्यात



**आलेख** / रणजित देसाई

**५वी आवृत्ती**

रणजित देसाईंच्या बहारदार कथा

**१६०रु. पोस्टेज २५रु.**

आला.

### * संत नामदेवांवर माहितीपट

'पुणे विद्यापीठातील संत नामदेव अध्यासनाच्या वतीने नामदेवांच्या देशभरातील स्मृतिमंदिरांविषयी माहितीपट तयार करण्यात यणार आहे. संत नामदेवांच्या कार्यअभ्यासासाठी समर्पित अध्यासन फक्त पुणे विद्यापीठातच आहे. नामदेव मराठी गाथेचे गुरुमुखी लिप्यंतर पूर्ण झाले असून त्यांचे चरित्र सर्व भारतीय भाषांमध्ये उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न चालू आहेत असे अध्यासनाच्या प्रमुख डॉ. वीणा मनचंदा यांनी सांगितले. उत्तर भारत आणि महाराष्ट्रातील सुमारे ५० स्मृतिमंदिरांची माहिती आत्तापर्यंत संकलित करण्यात आली आहे. 'संत नामदेवांविषयीच्या सामाजिक, सांस्कृतिक इतिहासाचे पुनर्लेखन करण्यासाठी या प्रकल्पाची सुरवात करण्यात आली आहे. या प्रकल्पाला नामदेव शिंपी, वारकरी, शीख समाजातील लोक मदत करत आहेत. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता साधण्याचे कामही होणार आहे. पंजाब व राजस्थानमधील २५ नामदेव अभ्यासकांशी चर्चा करण्यात येत आहे.'

### * नॉलेज इकॉनॉमी विकसित करणे ही भविष्याची गरज

''देशासमोर उभ्या ठाकलेल्या सर्व आव्हानांवर मात करण्याची क्षमता अद्ययावत तंत्रज्ञानामध्ये आहे. अद्ययावत तंत्रज्ञानाच्या वापरातून देशाची प्रगती साधण्यासाठी तितक्याच प्रशिक्षित मनुष्यबळाचीही गरज आहे. त्या आधारे भारताला जागतिक पातळीवर एक 'नॉलेज इकॉनॉमी' म्हणून उभे करणे ही भविष्याची गरज आहे,'' असे मत मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी 'डिफेन्स इन्स्टिटय़ूट ऑफ ॲडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी'च्या (डीआयएटी) सहाव्या पदवीदान समारंभामध्ये व्यक्त केले. संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे (डीआरडीओ) महासंचालक आणि संरक्षण मंत्र्यांचे वैज्ञानिक सल्लगार डॉ. व्ही. के. सारस्वत, 'डीआयएटी'चे कुलगुरू डॉ. प्रल्हाद आणि इतर प्राध्यापक यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी २१० विद्यार्थ्यांना एमटेक, पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.





२०वी आवृत्ती

**रुचिरा भाग२ /** कमलाबाई ओगले

गृहिणींचा स्वयंपाकघरातील सच्चा मित्र

**१९५रु. पोस्टेज ३०रु.**

''देशाला ज्ञानावर आधारित जागतिक महासत्ता बनविणे, हे आपल्यासमोरचे आव्हान आहे. त्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न हवेत. दहशतवाद, अंतर्गत सुरक्षेसमोरील आव्हानांसोबतच ऊर्जासुरक्षा, अन्नसुरक्षा, आरोग्यसुरक्षा या क्षेत्रातील समस्यांवर मात करण्यासाठीही तंत्रज्ञानाचा वापर व्हायला हवा. सामरिक क्षेत्राच्या विकासासाठी आपल्याकडे मोठ्या प्रमाणामध्ये आर्थिक तरतुदी उपलब्ध आहेत. त्यातूनच या क्षेत्रामधील शिक्षण आणि संशोधन करता येणे शक्य आहे,' असे चव्हाण यांनी सांगितले.

डॉ. सारस्वत म्हणाले, ''सामरिक विकासाच्या बाबतीत भारताला कायमच इतर देशांच्या तंत्रज्ञानावर अवलंबून राहणे परवडणारे नाही. आपली प्रगती 'टेक्नो-फॉलोअर' ते 'टेक्नो-लीडर' अशीच व्हायला हवी. विद्यापीठांनीही देशाच्या सुरक्षिततेसाठीच्या संशोधनांमध्ये लक्ष घालायला हवे. सामरिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या मनुष्यबळाच्या गुणवत्तेवरच देशाचा या क्षेत्रातील विकास अवलंबून आहे. ही बाब लक्षात घेत विद्यार्थ्यांनी आपले ज्ञान अद्ययावत करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.''

### * चेन्नई येथे 'विनोद मेजवानी' कार्यक्रम

महाराष्ट्र मंडळ, चेन्नई या नामवंत संस्थेमध्ये प्राचार्य श्याम भुर्के व गीता भुर्के यांचा मराठी विनोदाची परंपरा सांगणारा 'विनोद मेजवानी' हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास श्रोत्यांनी भरभरून प्रतिसाद दिला.

'मराठी साहित्य कार्यक्रमाद्वारे गेली ३८ वर्षे रसिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम करणारे एकमेव दांपत्य, अशा शब्दात महाराष्ट्र मंडळातर्फे भुर्के दांपत्याचा सत्कार करण्यात आला.

### * राज्य मराठी व्यावसायिक नाट्यस्पर्धेचा निकाल

'श्री चिंतामणी या संस्थेच्या 'मी रवती देशपांडे' या नाटकाला चोवीसाव्या महाराष्ट्र राज्य मराठी व्यावसायिक नाट्य स्पर्धेत प्रथम पारितोषिक जाहीर करण्यात


**पार्टनर** / व. पु. काळे **२३वी आवृत्ती**
एकदा वाचून समाधान होणार नाही
अशी फर्मास-दिवाणी कहाणी
**१३०रु. पोस्टेज २०रु.**

आले. पाच लाख रुपयांचा हा पुरस्कार आहे. तसेच 'शुभम स्पर्श' या संस्थेच्या 'लग्नबंबाळ' या नाटकाला द्वितीय; तर 'गणरंग' या संस्थेच्या 'इदं न मम अर्थात हे माझे नव्हे' या नाटकाला तृतीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. या पुरस्कारांची रक्कम अनुक्रमे तीन व दोन लाख रुपये आहे.

अन्य निकाल :

दिग्दर्शन : प्रथम पारितोषिक - विजय केंकरे (लग्नबंबाळ), द्वितीय - कुमार सोहोनी (मी रेवती देशपांडे), तृतीय - प्रदीप राणे (इदं न मम अर्थात हे माझे नव्हे)

नाट्यलेखन : प्रथम पारितोषिक - शेखर पाटील (मी रेवती देशपांडे), द्वितीय - मधुगंधा कुलकर्णी (लग्नबंबाळ), तृतीय - प्रदीप राणे (इदं न मम अर्थात हे माझे नव्हे)

नेपथ्य : प्रथम पारितोषिक - प्रदीप मुळ्ये (सुखांशी भांडतो आम्ही), द्वितीय - नितिन नेरुरकर (मी रेवती देशपांडे), तृतीय - राजन भिसे (लग्नबंबाळ)

अभिनय : (रौप्यपदक - प्रत्येकी २५ हजार) पुरुष कलाकार - आनंद इंगळे (लग्नबंबाळ), गिरीष साळवी (लव्हबर्डस), मोहन जोशी (मी रेवती देशपांडे), शैलेश दातार (बॅरिस्टर), संजय शेजवळ (प्रिया बावरी),

स्त्री कलाकार : मधुरा वेलणकर (लग्नबंबाळ), अमृता सुभाष (लव्हबर्डस), नंदिता धुरी (इदं न मम अर्थात हे माझे नव्हे), इला भाटे (बॅरिस्टर), रेश्मा गोखले (मी रेवती देशपांडे)

## * 'मयूरपंख'चे प्रकाशन

''पूर्वी फक्त साहित्याचे अभ्यासक, तसेच भाषा विषयांचे प्राध्यापकच लेखन करत. परंतु आता इंजिनीअरिंग, मेडिकल, लीगल अशा क्षेत्रात कर्तृत्व गाजवलेली मंडळी साहित्यात येत आहेत. त्यामुळे नवनवीन क्षेत्र विषयक साहित्य उपलब्ध होत आहे, ही स्वागतार्ह बाब आहे,'' असे मत ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले. स्वरमहिमा प्रकाशनातर्फे ब्रिजलाल नाईक यांच्या 'मयूरपंख' या





**उत्तम स्मृतीचा कानमंत्र** **४थी आवृत्ती**

अनंत पै / अनु. चारुलता पाटील

अद्ययावत अभ्यासप्रक्रियेने स्मरणशक्ती तल्लख करण्याचे यशस्वी तंत्र सांगणारे पुस्तक

**८०रु. पोस्टेज २०रु.**

कथासंग्रहाचे आणि शरद अत्रे यांच्या 'नक्षत्रांची फुले' या कवितासंग्रहाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. म. श्री. दीक्षित व स्वरमहिमा प्रकाशनाच्या चारुशीला बेलसरे या उपस्थित होत्या. ''निर्मिती ही माणसाची सहजप्रेरणा आहे. सौंदर्य पाहून कुणालाही निर्मिती करण्याची इच्छा होणे स्वाभाविकच आहे. परंतु समाजातील विषमता, द्वेष, असुंदरता पाहून माझ्या निर्मितीतून मी ही असुंदरता दूर करेन या भावनेतून साहित्यिकांनी साहित्य निर्मिती करावी,'' अशी अपेक्षा डॉ. कुलकर्णी यांनी व्यक्त केली. 'प्रत्येकाच्या मनात एक कवी असतो, फक्त व्यवहाराच्या दडपणाने तो दबून राहतो,' असेही त्यांनी सांगितले.

डॉ. अरविंद नेरकर यांनी सूत्रसंचालन केले. नंतर चारुशीला बेलसरे यांनी 'दिंडी चालली चालली' हा कार्यक्रम सादर केला.

### * 'भारतीय'साठी श्रेया घोषाल

राष्ट्रीय पुरस्कारविजेत्या देवीशा फिल्म्सच्या 'भारतीय' चित्रपटासाठी श्रेया घोषालने एक धम्माल गाणे गायले आहे. याचे रेकॉर्डिंग मुंबईच्या सुरेश वाडकर यांच्या आजीवासन स्टुडिओमध्ये झाले.

'भारतीय' या चित्रपटाचे संगीत अजय-अतुल यांनी केले आहे. 'तब्बल तीन वर्षांनंतर परत एकदा मराठीसाठी काम करताना आम्हाला फार आनंद होत आहे' असे अजय म्हणाला.

श्रेया म्हणाली, ''मी मराठीत आणि हिंदीतही अजय-अतुल सोबत काम केलंय, आणि त्यांच्यासोबत काम करणे हा एक छान अनुभव असतो. त्यांच्या गाण्याला मातीचा सुगंध आहे. या चित्रपटाची गाणी गुरू ठाकूर आणि संदीप खरे यांनी लिहिली आहेत.''

गाण्यांविषयी बोलताना गुरू म्हणाला, ''चित्रपटात कर्नाटक आणि महाराष्ट्र असे संदर्भ असल्याने गाण्यांमध्ये जाणीवपूर्वक दोन्ही भाषांचा वापर केला आहे.'' हे गाणे तेजश्री खेळे, जितेंद्र जोशी, सुबोध भावे, मिता सावरकर यांच्यावर कोल्हापुरातल्या भुदरगड येथे चित्रित करण्यात आले.




**निसटलेले** / आशा बगे **४थी आवृत्ती**

नात्यांना समजाऊन घेताना खूप काही ''निसटलेले'' असते. जीवनाचे हे सूत्र मांडणाऱ्या कथा

**१५०रु. पोस्टेज २५रु.**

## * नक्षत्र डॉट कॉम

साहित्य, कला, चित्रपट, ज्योतिष यासह अनेक क्षेत्रांत डॉ. मधुसूदन घाणेकर सातत्याने कार्यरत आहेत. 'नक्षत्र डॉट कॉम' या चित्रपटात २७ तारकांसह काम काम करत त्यांनी नवा विक्रमच केला आहे.

एकपात्री कलाकार संस्थेतर्फे 'नक्षत्र डॉट कॉम' या चित्रपटाच्या सीडीचे अनावरण मंगेश तेंडुलकर आणि सुनील महाजन यांच्या हस्ते करण्यात आले.

## * अंध विद्यार्थ्यांसाठी ई-बुक्स

अंध विद्यार्थ्यांना अध्ययनाची प्रक्रिया सुलभ व्हावी यादृष्टीने पदवी-पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी आठ हजार ई-बुक्सची निर्मिती करण्यात येत आहे.

पुणे विद्यापीठात कोणत्याही विभागात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सीडीवर ही पुस्तके उपलब्ध असतील. 'अंध विद्यार्थ्यांमध्ये करिअरबाबत अनेक गैरसमज आहेत. अंध विद्यार्थ्यांना अभ्यास, साहित्यामध्ये ई-बुक, ऑडिओ बुक आणि ब्रेल बुक असे तीन पर्याय असतात. मात्र ब्रेल पुस्तकांसाठी मोठ्या प्रमाणावर कागद लागत असल्याने ब्रेलपेक्षा ऑडिओ आणि ई-बुकवर भर दिला जातो,' असे केंद्राचे समन्वयक धनंजय भोळे यांनी सांगितले.

भोळे हे स्वत: अंध असून, बीएस्सी, एमएस्सी (बायोइन्फर्मेटिक्स), एमबीए (एचआर) हे शिक्षण त्यांनी जिद्दीने पूर्ण केले आहे. आयआयटी पवई मध्ये पीएचडी करीत आहेत.

## * गुरुतुल्य व्यक्तिमत्त्व घडवितो तोच खरा गुरू

गुरू-शिष्यांना नेहमी परीस आणि लोखंडाची उपमा देतात. परीस दुसरे परीस घडवू शकत नाही. मात्र गुरू तो असतो जो दुसरे गुरुतुल्य व्यक्तिमत्त्व घडवितो, असे मत ज्येष्ठ भरतनाट्यम नृत्यांगना पं. सुचेता चाफेकर यांनी संस्कारभारती पुणे महानगर आयोजित 'अनुग्रह' या कर्यक्रमात केले.




**महाश्वेता** **९वी आवृत्ती**

सुधा मुर्ती / अनु. उमा कुलकर्णी

संकटांशी सामना देणाऱ्या समर्थ स्त्रीची कहाणी

**१४०रु. पोस्टेज २५रु.**

उत्तरार्धात तालयोगी पं. सुरेश तळवलकर आणि त्यांच्या शिष्यांनी, तबला, संवादिनी, सतार, ढोलकी असा ताल कीर्तनाचा कार्यक्रम सादर केला. 'पूजासे पावन हो मन' या बंदिशीवर विलंबित झपतालात चक्रधर तिहाई, लयकी उर्च्छना; तर 'शाम छबी अती बने' या बंदिशीवर तीनताल सादर केला.

*** तुकाराम**

''संत तुकारामांचे व्यक्तिमत्त्व खरोखरीच आकाशाएवढे होते. त्यांची भूमिका साकारताना अजिबात भीती वाटली नाही. गाथा, वेगवेगळ्या साहित्यकृती आणि संशोधन करून लिहिलेल्या संहिता यांच्या वाचनामुळेच 'तुकाराम' साकारता आले. ही भूमिका माझ्या आयुष्यातील सुवर्णसंधी आहे,'' अशी भावना अभिनेता जितेंद्र जोशी याने व्यक्त केली. चंद्रकांत कुलकर्णी यांनी दिग्दर्शित केलेला 'तुकाराम' चित्रपट जून मध्ये प्रदर्शित झाला.

''संत तुकारामांची वेगवेगळी रूपे अभिनयाच्या माध्यमातून उलगडणे, हे आव्हान होते. ते जितके गंभीर होते, तितकेच भक्तिरसाने ओथंबलेले होते. त्यांच्यात प्रचंड सहानुभूति, माणुसकी होती. अशी रूपे साकारण्यासाठी मला त्यांच्यावरील निवडक साहित्यकृतींची, आणि गाथेची मदत झाली.''

*** विश्वकोश ऑन स्क्रीन**

मराठी विश्वकोश सी-डॅकच्या सहकार्याने विश्वकोशाचे युनिकोडमध्ये रूपांतर करीत आहे. मराठी विश्वकोश डॉट इन या वेबसाइटच्या ऑनलाइन वाचकांची संख्या कित्येक लाखांत आहे. अमेरिकेत स्थायिक झालेल्या वैभव पुराणिक आनि आशिष महाबळ या दोन मराठी तरुणांनी विश्वकोशाच्या पुढील खंडांचे युनिकोडमध्ये रूपांतर करण्याचे काम कोणत्याही मोबदल्याशिवाय करण्याची तयारी दर्शविली आहे.

मंडळाच्या अध्यक्ष डॉ. विजया वाड म्हणाल्या, ''आठ महिन्यांपूर्वी वेबसाइट सुरू झाली तेव्हा विश्वकोशाचा पहिला खंड त्यावर उपलब्ध होता. त्यानंतर दर महिन्याला एक याप्रमाणे आम्ही विश्वकोशाचे एकेक खंड वेबसाइटवर टाकत





**११वी आवृत्ती**

**खुळ्याची चावडी** / शंकर पाटील

शंकर पाटलांच्या खास कथा

**१४०रु. पोस्टेज २५रु.**

आहोत. आता नवव्या खंडाचे काम सुरू आहे.''

## * 'आकाश - २' टॅब्लेट संगणक

जगातील सर्वात स्वस्त अशा 'आकाश-२' या टॅब्लेट संगणकाच्या तांत्रिक आराखड्याला या महिना अखेरीस अंतिम स्वरूप दिले जाईल आणि त्यानंतर लगेच निर्मिती सुरू होईल, असे केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री कपिल सिब्बल यांनी सांगितले. पुढील पाच वर्षात देशातील प्रत्येक शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्याकडे टॅब्लेट संगणक असेल आणि प्रत्येकाला तो उपलब्ध होईल.''

देशातील ६०४ विद्यापीठे आणि सुमारे ३५ हजार महाविद्यालये 'नॅशनल नॉलेज नेटवर्क'शी जोडली जातील. आतापर्यंत १४ हजार महाविद्यालये जोडली गेली असून माहितीची देवाणघेवाण सुरू आहे अशी माहिती त्यांनी दिली.

## * बनावट पुस्तके विक्रत्यांना अटक

के. सागर प्रकाशनाच्या पुस्तकांच्या फोटोकॉपी काढून त्यांची विक्री केल्याबाबत अलका टॉकिज परिसरातील दोन झेरॉक्स दुकानदारांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून पुस्तकांच्या कॉपी जप्त केल्या आहेत.

या प्रकरणी के. सागर प्रकाशनाचे जनसंपर्क अधिकारी मिहिर थत्ते यांनी तक्रार दिली होती. त्यानुसार संभाजी पोलिस चौकीचे उपनिरिक्षक हाटकर यांच्या पथकाने अलका टॉकिज चौकातील 'कॉपी लिंक' आणि 'अजिंक्य कॉपिअर्स' या दुकानांवर धाडी टाकून बनावट पुस्तकांचा साठा जप्त केला. तसेच या प्रकरणी किशोर हुकुमचंद गांधी, राजेंद्र बबन जाधव, संजय वालजी देसाई पटेल, रुपेश बाबुराव सातलग या चौघांना अटक केले.

एमपीएससी परीक्षांसाठीच्या विक्रीकर निरीक्षक मुख्य परीक्षा पेपर दोन, पोलिस उपनिरीक्षक मुख्य परीक्षा भाग दोन, कृषी विषयक घटक तसेच महाराष्ट्रातील समाजसुधारक या व्ही. एस. क्षीरसागर यांच्या पुस्तकांच्या बनावट प्रती या दुकानांतून जप्त करण्यात आल्या. ''आमच्या पुस्तकांच्या बनावट प्रती विकल्या जात असल्याची





**वपुर्वाई** / व. पु. काळे

**८वी आवृत्ती**

वपुंच्या खास कथांची अपूर्वाई

**१००रु. पोस्टेज २०रु.**

माहिती आम्हाला समजली. त्यानुसार आम्ही पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी छापा टाकून त्यांना अटक केली आहे. यात पन्नास लाखांचे नुकसान झाले आहे. ‘पुण्याबरोबरच लातूर, नांदेड, औरंगाबाद येथेही बनावट प्रती विकल्या जात आहेत, असे क्षीरसागर म्हणाले.

*** कामगार साहित्य परिषद**

१ मे १९९१ या आंतरराष्ट्रीय कामगार दिनी कविवर्य नारायण सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली पुरुषोत्तम सदाफुले, अरुण बोऱ्हाडे, हरी नरके आणि तत्कालिन उपकल्याण आयुक्त एम.एच. परांडेकर यांनी कामगारांमधील साहित्यप्रतिभा आणि कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र कामगार साहित्य परिषदेची स्थापना केली. मालक, कामगार, श्रममंत्रालयाचे प्रतिनिधी व कामगार नेते यांना एकत्र आणून दरवर्षी श्रम-उद्योग परिषदेचे आयोजन केले जाते. त्यामुळे औद्योगिक संबंधातील एक नवी संस्कृती निर्माण होण्यास मदत झाली आहे. सुर्वे यांच्या निधनानंतर फ. मुं. शिंदे यांनी परिषदेची धुरा खांद्यावर घेतली आहे. परिषदेच्या माध्यमातून कामगारांच्या साहित्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न झाला.अनेक कामगारांना लिहिते होण्यासाठी संधी मिळाली. कामगार साहित्य संमेलन हे व्यासपीठ निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य परिषदेने केले आहे. लेखनाला अधिकाधिक पुष्टी देण्याचा परिषदेचा प्रयत्न राहिल.

❐




९वी आवृत्ती

**चाणक्य** / भा. द. खेर

मौर्य साम्राज्याचा निर्माता

**२८०रु. पोस्टेज ३०रु.**

**नवे कोरे**

अनलाइकली हिरो

# ओम पुरी

**नंदिता सी. पुरी**

अनुवाद

**अभिजित पेंढारकर**

२२०रु. - सभासदांना सवलतीत




'अनलाइकली हिरो' या पुस्तकात ओम पुरी यांचे खासगी आयुष्य, त्यांनी केलेला संघर्ष, त्यांची अस्वस्थता, त्यांच्या हृदयातील वेदना यांचे दर्शन घडते. पंजाबातून डोळ्यांत स्वप्ने घेऊन आलेला मुखदुर्बळ कलाकार, 'एनएसडी'मधील जातिवंत 'फ्लर्ट', खाण्याचा शौकीन व उत्तम कूक आणि पूर्णत: कुटुंबवत्सल माणूस! ओम पुरी यांची ही विविध रूपे या पुस्तकात पाहायला मिळतील. कुटुंबातील सदस्यांबरोबरच्या गमतीदार प्रसंगांची मालिका, भारतीय आणि ब्रिटिश चित्रपटसृष्टीतील व्यक्तींच्या सहवासातील अनेक धक्कादायक घडामोडी, प्रेमप्रकरणे यांचा उलगडा या पुस्तकातून होईल.

दुर्मीळ आणि वैशिष्ट्यपूर्ण छायाचित्रांचाही आस्वाद घेता येईल.

मार्मिक, प्रामाणिक आणि उत्साहपूर्ण शैलीत लिहिलेली कहाणी.

'सिटी ऑफ जॉय' या चित्रपटात ओम पुरींसोबत काम केलेल्या पॅट्रिक स्वेझ या दिवंगत अभिनेत्याने त्यांचा त्याच्या आयुष्यावर पडलेला प्रभाव पुस्तकात सांगितला आहे. प्रसिद्ध समीक्षक डेरेक माल्कम यांनी ओम यांची अफाट गुणवत्ता आणि कलेचा प्रचंड परीघ यांचा आढावा घेतला आहे.

नसीरुद्दिन शाह यांनी 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा'पासून सुरू झालेल्या मैत्रीच्या आठवणींना उजाळा दिला आहे.

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चित्रपटांच्या क्षितिजावर ओम पुरी या ताऱ्याचा उदय होण्याची कहाणीही पुस्तकात वाचायला मिळेल.




## * ‘शब्दचर्चा’ला उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेतर्फे दिला जाणारा उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार डॉ. म. बा. कुलकर्णी लिखित, मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित ‘शब्दचर्चा’ या पुस्तकाला मिळाला आहे.

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था गेल्या शंभर वर्षांहून अधिक काळ मराठीतील उत्कृष्ट ग्रंथांना पारितोषिके देण्याचे कार्य करीत आहे.

## * ‘महाराजा यशवंत होळकर’ पुरस्कार

‘‘आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी मागास समाजात वर्णी लागावी, अशी मागणी अनेकांकडून होत आहे; त्यामुळे देशाला सध्या मागासपणाचे डोहाळे लागले आहेत,’’ असे मत प्रा. हरी नरके यांनी १ जून रोजी व्यक्त केले. महाराजा यशवंतराव होळकर समितीतर्फे नरके यांना यशवंतराव होळकर पुरस्कार मराठी अर्थशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष प्रा. सु. दा. तुपे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. धनगरी फेटा, घोंगडी, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. प्राचार्य डॉ. सुधाकर जाधव, महादेव जानकर, शुद्धोदन आहेर, राजाराम पाटील, समितीचे अध्यक्ष संजय सोनवणी, सचिव प्रकाश खाडे याप्रसंगी उपस्थित होते. नरके म्हणाले, ‘‘पूर्वी कमी लेखल्या जाणाऱ्या जातीतील लोकांचे शोषण केले जात असे; तेव्हा ते लोक उच्च समजली जाणारी जात चोरत होते. मात्र, आता त्या उलट परिस्थिती आहे. आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी मागास समाजातील जात चोरली जात आहे. संपूर्ण राजकारण त्याभोवती फिरत आहे.’’

बहुजन समाजात ज्ञानाचा 'बॅकलॉग' प्रचंड आहे. तो भरून काढण्याचे अर्धा टक्का कामही आमच्या सारख्यांकडून झाले तरी खूप आहे. या ज्ञाननिर्मितीच्या कामात अडथळा आणतील ते जन्माने कोण, हे शोधण्यापेक्षा ते ज्ञानविरोधी आहेत, अशी भूमिका बहुजन समाजाने घेतली पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### * डॉ. रामचंद्र देखणे यांना तुकाराम महाराज पुरस्कार

श्री तुकाराम महाराज सेवा प्रतिष्ठानच्या वतीने हॅपी कॉलनी सभागृहात संत तुकाराम महाराज व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. प्रतिष्ठानच्या वतीने श्री संत तुकाराम महाराज सेवाभूषण पुरस्कार डॉ. रामचंद्र देखणे यांना डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी उपमहापौर दीपक मानकर, नगरसेवक राजाभाऊ बराटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यादरम्यान आयोजित केलेल्या व्याख्यानमालेच्या पहिल्या दिवशी डॉ. संजय उपाध्ये यांचे व्याख्यान झाले. 'समाज प्रबोधन तुकारामांचे' या विषयावर डॉ. मुकुंद दातार यांचे, 'भारताची गौरवगाथा' या विषयावर प्रा. अविनाश हळबे यांचे ,'तुका आकाशाएवढा' या विषयावर डॉ. प्रभाकर काळे यांचे व्याख्यान झाले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुमंतजित ओतुरकर, कार्याध्यक्ष संभाजी खोमणे यावेळी उपस्थित होते.

### * श्याम भुर्के यांना राम गणेश गडकरी पुरस्कार

कसबा युवा मंच तर्फे देण्यात येणारा राम गणेश गडकरी पुरस्कार बापूजी देशपांडे यांच्या हस्ते साहित्यिक श्याम भुर्के यांना प्रदान करण्यात आला. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व रु. २००० असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

खुमासदार अत्रे, पु.ल एक आनंदयात्रा, आनंदाचं पासबुक, पुणं एक साठवण, मंत्र श्रीमंतीचा, बँकेत शेखर सुमन, माईंड जिम, मॅनेजमेंट गुरु जगन्नाथ शंकरशेठ, १०१ प्रासंगिक व्याख्याने, सभेत कसे बोलावे, क्रेडिट कार्डचे मायाजाल, स्टार प्रिन्सिपल ही श्याम भुर्के यांची पुस्तके लोकप्रिय ठरली आहेत. त्यांच्या साहित्यिक कार्याबद्दल पुणे मराठी ग्रंथालयाचा ना. ह. आपटे पुरस्कार, आचार्य अत्रे पुरस्कार, नाथमाधव पुरस्कार, बिझनेस एक्सप्रेसचा अथश्री पुरस्कार, काँग्रेस ऑफ लायब्ररीज अमेरिका यांचे सन्मानपत्र त्यांना प्राप्त झाले आहे.

मराठी साहित्यावर आधारित २००० वर कार्यक्रम त्यांनी भारतात व परदेशात सादर केले आहेत.

### * सिद्धार्थ जाधव यांना 'कलागौरव पुरस्कार'

शाहीर मधू कडू यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ नटरंग ॲकॅडमीने 'नटरंग प्रतिष्ठान

कलागौरव पुरस्कार' अभिनेते सिद्धार्थ जाधव यांना प्रदान केला. पाच हजार रुपये रोख, पुणेरी पगडी, सन्मानचिन्ह, गौरवपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी आमदार गिरीश बापट, माधुरी मिसाळ, उपमहापौर दीपक मानकर, अभिनेत्री मधू कांबीकर, राघवेंद्र कडकोळ, संतोष पवार, शाहीर दादा पासलकर, बालकलाकार अथर्व कर्वे, ऋतुराज माजालिम, वैष्णवी पाटील वगैरे कलाकार उपस्थित होते. उपस्थित होते.

### * 'उमेद पुरस्कार'

सदाबहार गायिका आशा भोसले यांच्यासह हिंदी-मराठीतील काही प्रसिद्ध कलाकारांना 'वरदलक्ष्मी'च्या वतीने उमेद पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

प्रसिद्ध दिग्दर्शक महेश टिळेकर यांच्या 'वरदलक्ष्मी' प्रॉडक्शन तर्फे यंदा ज्येष्ठ अभिनेते सदाशिव अमरापूरकर, गणेश यादव, प्रतीक बब्बर, उमेश कामत, रवीना टंडन, तेजस्विनी पंडित आणि मसाला किंग धनंजय दातार यांना जलसंपदा मंत्री सुनील तटकरे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले.

### * कवी रणदिवे यांना 'जीवनगौरव'

''रिमिक्सच्या जमान्यात तरुण पिढीला कविता व गझलचा विसर पडत चालला आहे. कवी रमण रणदिवे यांनी ४५ वर्षे सातत्याने केलेले गझलनिर्मितीचे कार्य गौरवास्पद आहे,'' असे मत विधानसभा अध्यक्ष दिलीप वळसे पाटील यांनी व्यक्त केले.

अलौकिक परिवारातर्फे रणदिवे यांना वळसे पाटील यांच्या हस्ते 'जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार चंदू बोर्डे, उद्योजक विश्वास दळवी, साहित्यिक फ्रान्सिस वाघमारे, दीपक लोंढे, अलौकिक परिवाराचे दयानंद ठोंबरे उपस्थित होते. रणदिवे यांच्या साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल उद्योजक दळवी यांच्यातर्फे त्यांना एक लाखांचा निधी प्रदान करण्यात आला. वळसे पाटील म्हणाले, ''तरुण पिढी वेगळ्या दिशेने वाटचाल करत आहे. कविता व गझल हे आपल्या भावना व संदेश पोचवण्याचे उत्तम साधन आहे. रणदिवे आपल्या गझलांमधून सातत्याने मानवतेचा विचार तरुणांपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न करत आहेत.''

रणदिवे म्हणाले, ''कवी शब्दांचे मूल्य टिकवण्याचे काम करतो, तेच काम करण्याचा प्रयत्न सातत्याने करत आहे. जीवन गौरव पुरस्कार म्हणजे केलेल्या कार्याबद्दल मिळालेली कौतुकाची थाप आहे.''

## * शिवाजी पाटील यांना शाहीर योगेश पुरस्कार

जळगाव येथील शाहीर शिवाजीराव पाटील यांना यंदाचा शाहीर योगेश पुरस्कार १६ मे रोजी निगडी-प्राधिकरणातील स्वातंत्र्यवीर सावरकर सदनात डॉ. न. म. जोशी यांच्या हस्ते देण्यात आला. भाऊसाहेब भोईर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. अकरा हजार रुपये, स्मृतिचिन्ह, मानाचा फेटा आणि श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

## * महादेव हेरेकर पुरस्कार

कै. महादेव हेरेकर यांच्यासारख्या सीमाभागातील दुर्लक्षित राहिलेल्या साहित्यिकाच्या नावे दिले जाणारे पुरस्कार सीमाभागात राहून साहित्यसेवा करणाऱ्या साहित्यिकांना देण्यात येतात ही सीमावासीयांची मने सांधणारी ही घटना आहे, असे प्रतिपादन बेळगावच्या राणी चन्नम्मा विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख आणि सीमाभागातील ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. विनोद गायकवाड यांनी केले.

पुण्याच्या गुरुकुल प्रतिष्ठानच्या वतीने सौ. सुशिला मोडक स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा महादेव हेरेकर साहित्य पुरस्कार जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते प्रा. डॉ. विनोद गायकवाड यांना प्रदान करण्यात आला. यावेळी 'मीरा :साहित्य प्रवास' आणि 'आत्मनाद' या मीरा तारळेकर संपादित दोन ग्रंथांचे प्रकाशन जिल्हाधिकारी देशमुख यांच्या हस्ते झाले. या ग्रंथांची ओळख डॉ. व्यंकटेश कोटबागे, डॉ. सुधाकर गोकाककर आणि चंद्रकांत जोशी यांनी करून दिली.

## * अभिजित घोरपडे यांना पहिला 'कृष्ण मुकुंद पुरस्कार' प्रदान

सर्वसामान्यांकडून विविध निरीक्षणांच्या आधारे होणारे संशोधन महत्त्वाचे असून, त्याच गोष्टींवर संशोधनासाठी पुन्हा खर्च करण्याऐवजी लोकसंशोधनाचा उपयोग करून घ्यायला हवा, असे मत प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. पंडित विद्यासागर यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने मराठी भाषेतील वैचारिक व संशोधनात्मक पुस्तकाला दिला जाणारा 'कृष्ण मुकुंद पुरस्कार' यावर्षी दै. लोकसत्ताचे वरिष्ठ सहसंपादक अभिजित घोरपडे यांना 'संथ वाहते' या पुस्तकासाठी देण्यात आला. सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्रक व दहा हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्काराचे हे पहिलेच वर्ष आहे. डॉ. प्र. चिं. शेजवलकर अध्यक्षस्थानी होते.

''घोरपडे यांच्या पुस्तकात जागतिक, स्थानिक पातळीपासून पातळीचा आवाका आहे. त्यांनी त्यासाठी लोकांच्या निरीक्षणांचा उपयोग करून घेतला आहे.'' याचा संदर्भ देत डॉ. विद्यासागर म्हणाले, हे संशोधन महत्त्वाचे आहे. सर्वसामान्यांकडून

होणाऱ्या संशोधनावर पुन्हा खर्च करून नवे संशोधन केल्यासारखे दाखवले जाते. पण मूळ लोकसंशोधनाचा उपयोग करून घ्यायला हवा. घोरपडे यांचे पुस्तक यासाठी उपयुक्त आहे.

''निसर्गातील साधनसंपत्ती आपण हिशेब न करता वापरतो. नदीप्रदूषण, वाळूचा उपसा अशा वेगवेगळ्या प्रकारांनी आपण तिला खराब करतो. निसर्गाचे आपण कसे शोषण करतो याचे नदी हे प्रातिनिधिक उदाहरण आहे. हेच सर्व बाबतीत घडते. या शोषणाचाच परिणाम म्हणून पर्यावरणाच्या अनेक समस्या उद्भवल्या आहेत. आपण असेच वागत राहिलो तर पुढे आपल्या मूलभूत गरजासुद्धा पूर्ण होणार नाहीत. सध्या महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळाच्या मुळाशीसुद्धा हीच कारणे प्रामुख्याने आहेत. याचा निसर्गातील संसाधने मोठ्या प्रमाणात वापरणाऱ्या प्रत्येकाशी संबंध आहे. तो लक्षात घेऊन आपण या संसाधनांचा काटकसरीने वापर केला तरच या समस्या कमी होतील.'' असे घोरपडे म्हणाले.

## * डॉ. प्र. चिं. शेजवलकर यांना 'जीवनगौरव'

''विद्यार्थ्यांमुळेच मला समाजमान्यता मिळाली आहे. विद्यार्थ्यांमधील क्षमता जाणून घेत त्याचा उपयोग माझ्या आयुष्यात केल्यामुळेच मला खरे यश मिळाले,'' अशा शब्दांत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. प्र. चिं. शेजवलकर यांनी विद्यार्थ्यांबद्दलची कृतज्ञता व्यक्त केली.

हरित मित्र परिवारातर्फे डॉ. शेजवलकर यांना 'जीवनगौरव'पुरस्कार ॲड. भास्करराव आव्हाड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

ललित राठी, सुलक्षणा खलाटे, सुरेश परांजपे व संजय धावटे यांना सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार देण्यात आला.

डॉ. शेजवलकर म्हणाले, ''वारकरी जसा विठ्ठलाला आपले दैवत मानतो; तसा मी विद्यार्थ्यांना दैवत मानतो. समाजात कोणताही भेदभाव न करता सामाजिक बांधिलकी मानणे आवश्यक असते.''

ॲड. आव्हाड म्हणाले, ''आई-वडील मुलांना मोठे करतात. मात्र, शिक्षक विद्यार्थ्यांना घडवून आदर्श नागरिक बनवण्याचा प्रयत्न करतात; त्यामुळेच आई-वडिलांपेक्षा शिक्षकांचे कार्य मोठे ठरते. फक्त ज्ञानाला शिक्षण म्हणत नाहीत, तर संस्कारांमधूनही शिक्षण मिळते. पुस्तकातील शिक्षण आयुष्यात उतरविता आले, तरच तो माणूस यशस्वी होतो.''

❐




**नवे कोरे**

# अण्णा हजारे

संपादक **प्रदीप ठाकूर/ पूजा राणा**

अनुवाद

**धनंजय बिजले**

१२५रु. - सभासदांना सवलतीत

भारतीय राजकारणातील भ्रष्टाचार दूर करण्यासाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पुकारलेल्या लढ्याचा सर्वांगीण ऊहापोह या पुस्तकात करण्यात आला आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध कडक पावले उचलण्यासाठी, भ्रष्ट नोकरशहांना लगाम घालण्यासाठी आतापर्यंत कोणती विधेयके आणण्यात आली याचा इतिहास या पुस्तकात दिला आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध कडक कायदा आणण्यात ज्यांनी अडथळे आणले त्यांच्याविरुद्ध अण्णा हजारे यांनी व्यापक जनआंदोलन केले. यामुळे यासंदर्भातील विधेयक संसदेत मांडणे किती तातडीचे आणि आवश्यक आहे, हे खासदारांना उमगले. सार्वजनिक क्षेत्रात भ्रष्टाचार करणाऱ्या लोकांविरुद्ध कारवाई करण्यास सध्याच्या कायद्यात कशा त्रुटी आहेत, यावरही हे पुस्तक प्रकाश टाकते.

अहमदनगर जिल्ह्यातील राळेगणसिद्धी या गावातील यादवबाबा मंदिरास लागून असलेल्या एका छोट्या खोलीत अण्णा राहतात आणि केवळ खादी परिधान करतात. मात्र अण्णा हजारे जेव्हा आंदोलन सुरू करतात तेव्हा मुंबईपासून दिल्लीपर्यंत सर्व नेत्यांना त्याची दखल घ्यावीच लागते. देशभरातील सामान्य लोकांना एकत्रित करण्याची आणि सरकारला हादरा देण्याची क्षमता केवळ या एका व्यक्तीमध्ये आहे, ही वस्तुस्थिती त्यांचे विरोधक टीकाकारही मान्य करतात. १९७५मध्ये सार्वजनिक जीवनात आल्यापासून त्यांनी अनेक वेळा उपोषणे, आंदोलने करीत महाराष्ट्र पिंजून काढला. याचा त्यांचा शरीरावर तसेच प्रकृतीवरही परिणाम झाला. मात्र मानवसेवा हे त्यांच्या जीवनाचे ध्येय कायम राहिले. अण्णा हजारे भ्रष्टाचारविरोधी लढ्याचे प्रतीक बनले आहेत. 'आधुनिक भारताचे गांधी' अशीच त्यांची ओळख झाली आहे.




# झॅप्ड

वीजपुरवठा खंडित झाल्याने न्यूयॉर्क शहर काळोखात बुडते आणि नाट्यपूर्ण घटनांनी सगळी रात्र गजबजून जाते.




मूळ लेखक **कॅरोल हिगिन्स क्लार्क** /अनुवाद **जयंत गुणे**

१४०रु. - सभासदांना सवलतीत

मेरी हिगिन्स क्लार्क ही एक नामवंत अमेरिकन रहस्यकथाकार. तिची कन्या कॅरोल कॉलेजमध्ये बीए चा अभ्यास करीत असताना मेरीशी रहस्यकथांबाबत चर्चा करून तिला कथांच्या पुनर्लेखनाच्या कामात मदत करीत असे. कथेतील रहस्य अधिक रंगतदार व्हावे म्हणून नवनवीन कल्पना सुचवत असे. पुढे कॅरोल आपल्या आईप्रमाणेच स्वत:ही रहस्यकथा लिहू लागली.

पोलीस इन्स्पेक्टर रॅली रेगन या गुप्तहेर नायिकेला केंद्रस्थानी ठेवून कॅरोलने बऱ्याच रहस्यकथा लिहिल्या. आईच्या रहस्यकथांचा नायक जॅक रेगन हा न्यूयॉर्क पोलिस डिपार्टमेंटचा मेजर केस स्क्वॉडचा प्रमुख असतो. तो पुरुषी अहंकाराचा पुतळा आहे. कॅरोलने मात्र रॅलीला नायिका करून तिच्यामार्फत अनेक गुंतागुंतीच्या प्रकरणांचा उलगडा करून दाखवला आहे. जॅक आणि रॅली या दोघांमध्ये ती स्पर्धा वा दुरावा कधी दाखवत नाही. परस्परपूरक असेच हे दांपत्य दाखवले आहे. कुठलेही प्रकरण हाताळताना जॅक आणि रॅली आवश्यक तेव्हा एकमेकांची मदत घेतात. कॅरोलच्या कथांमध्ये रंजकता आणि गतिमानता असते. हलक्याफुलक्या विनोदी प्रसंगांची रेलचेल असते. फार्सप्रमाणे योगायोगांचा सुळसुळाट असतो. न्यूयॉर्कच्या पार्श्वभूमीवरच्या तिच्या रहस्यकथांमध्ये तेथील स्थळे, उद्याने, उपाहारगृहे, चित्रपटगृहे, नाट्यगृहे, करमणूकस्थळे, बार आणि नाट्यगृहे यांची वर्णने येतात. तिची कथानके एखाद्या कथावस्तूचा सरळसोट पाठपुरावा करण्याऐवजी वेगवेगळ्या दोनतीन उपकथानकांना चपखलपणे सामावून घेतात. कॅरोलच्या बऱ्याच रहस्यकथांमध्ये नाट्य-चित्रपट अभिनेत्यांच्या व्यक्तिरेखा येतात. ती स्वत: नाटक-सिनेमात कामे करते. गेम शो मध्ये भाग घेते त्यामुळे त्या कलाक्षेत्रातील घटनांचे पडसाद स्वाभाविकपणे तिच्या रहस्यकथांमध्ये उमटतात. नाट्यपूर्ण, आकर्षक मध्यवर्ती घटना निवडून कॅरोल त्या घटनेभोवती एकापेक्षा अधिक रहस्यपूर्ण प्रसंगांची मालिका गुंफते. त्यामुळे वाचकांना तिच्या कथा चटकदार वाटतात.

'झॅप्ड' ही कॅरोलची अकरावी रहस्यकथा. रॅली ही एका विकृत मनोरुग्ण तरुणीच्या तावडीतून 'चिप' या तरुणाला वाचवते, हे मुख्य कथासूत्र. एका रात्रीत घडलेली ही कथा. भरीला अचानक वीजपुरवठा बंद झाल्याने न्यूयॉर्कमध्ये ब्लॅक आऊट झालेले. पेट्रोल पंप बंद. कुठे कुठे लिफ्ट मध्ये अडकलेले लोक, कारमधील पेट्रोल संपले की कार रस्त्यात उभ्या करण्यावाचून गत्यंतर नाही. त्यामुळे ट्रफिक जॅम. पंखे, एअरकंडिशनर्स बंद. त्यामुळे लोक घरात बसून राहण्यापेक्षा रस्त्यावर उघड्यावर येणे पसंत करतात. हॉटेलात गर्दी करतात. रस्ते गर्दीने ओसंडून वाहतात. नाट्यगृहात कॉमेडी शो, चित्रपट यांनाही प्रचंड गर्दी.

रॅली आणि जॅक हे केप कॉडला जॅकच्या वडिलांच्या वाढदिवसाच्या पार्टीला हजर राहून न्यूयॉर्कला परत येतात. त्यांच्या फ्लॅटला लागून असलेल्या कॉनरॅड

स्प्रेकल्प याचा फ्लॅट विकत घेऊन दोन फ्लॅट मधील भिंत काढून एक मोठी प्रशस्त ड्राइंग रूम करण्याचे आणि एकूणच फ्लॅटचे नूतनीकरण करण्याचे काम चालू असते. कॉनरॅडचा चॉकलेटचा व्यवसाय असतो. कॉनरॅडने आपल्या पहिल्या पत्नीला, पेनीला पंचवीस वर्षांच्या वैवाहिक जीवनानंतर घटस्फोट देऊन लॉरेन-लिली या नवोदित तरुण नटीशी दोन वर्षांचा विवाहपूर्व करार केलेला असतो.लॉरेन त्याच्यापेक्षा वीस वर्षांनी लहान. कॉनरॅडची मुलगी तिच्यापेक्षा थोडीच लहान होती. लॉरेन नटी म्हणून अजून स्थिर झालेली नव्हती; आपण आयुष्यात स्थिर होईपर्यंत कॉनरॅड बरोबरचे संबंध टिकून रहावेत अशी तिची अपेक्षा होती. लंडनला एका नाटकात भूमिका मिळाल्यामुळे लॉरेन लिली तीन महिने कॉनरॉड पासून दूर राहिली. त्या काळात कॉनरॉडचे तिच्याबद्दलचे आकर्षण ओसरले. तिला राहण्यासाठी आणि वापरण्यासाठी दिलेला मॅनहॅटनमधील फ्लॅट त्याने रेगन दांपत्याला विकला आणि लॉरेनला घटस्फोट देण्याचा निर्णय घेतला. लॉरेन लंडनहून परत आली. विमानतळावरून टॅक्सी घेऊन तिने कॅनरॅडला फोन केला, तेव्हा कॉनरॅडने तिला स्पष्ट सांगितले, ''मी घटस्फोटासाठी अर्ज दिलाय. मॅनहटनमधील फ्लॅटही विकलाय. त्या फ्लॅटवर तुला आता राहता येणार नाही. तू एखाद्या हॉटेलमध्ये उतर. अर्थात ते तुझ्या मर्जीवर अवलंबून आहे. यापुढे माझा वकीलच माझ्यातर्फे बोलेल.'' लॉरेन त्यामुळे काळजीत पडली. त्या फ्लॅटमधील लॉफ्टवर तिने एका तिजोरीत वीसतीस हजार डॉलर्स आणि काही खाजगी पत्रे ठेवलेली होती. ती रॅली व जॅक रेगन या पोलिस खात्यातील व्यक्तींच्या हाती पडली तर तिचे नटी म्हणून अस्तित्वच धोक्यात येणार असते. तेव्हा टॅक्सीतूनच ती आपल्या एका नट मित्राला सांगते, ''त्या फ्लॅटमधील लॉफ्टवरील तिजोरीतून मला पत्रे आणून दे. तिजोरीतील डॉलर्स तू घे.'' पैशाची गरज असलेला नट क्ले नॉर्डेलिन तिला हो म्हणतो. ती चक्क चोरी आहे हे त्याला ठाऊक असते.तिजोरी उघडणाऱ्या आर्थरची तो मदत घेतो.

लॉरेन लिली टॅक्सी ड्रायव्हरला हॉटेलकडे टॅक्सी घ्यायला सांगते. नवीनच निघालेल्या ट्री टॉप्स हॉटेलात तिला रूम मिळते. टीव्हीचे वार्ताहर तिची लंडनमधील नाटकाबद्दल मुलाखत घेऊन लाइव्ह ब्रॉडकास्ट करतात.

रॅली फ्लॅटवर पोचते. आणि न्यूयॉर्कमधील दिवे जातात. सगळीकडे ब्लॅक आऊट होतो.

टेरेसवर जाताना कोणीतरी तेथे असावे असा तिला भास होतो. चोर तर नसावा अशी तिला शंका येते. पेनच्या आकाराची एक स्टेनगनही तिला सापडते. ती हैराण होते. जॅक रेगन नंतर येतो. तो बॅटरी घेऊन सर्वत्र शोधतो. चोर काही सापडत नाही.

त्याचवेळी लिलीला तिची मैत्रीण किट हिचा फोन येतो. एका अपघातामुळे तिला कुबड्या घेऊन चालावे लागते. ती सांगते, ''मी एका बाईबरोबर कॉमेडी

क्लबमध्ये शो बघायला आले होते. ती मला एकटीला सोडून पळाली. मला कुबड्याशिवाय चालता येत नाही. येथे टॅक्सी मिळायची शक्यता नाही. तू इकडे येऊन मला तुझ्या फ्लॅटवर घेऊन जा.  आजची रात्र तुझ्याकडे काढू देशील का?'' ती होकार देते. क्लबचा पत्ता घेते.

तेवढ्यात जॅकला पोलिस स्क्वॉडच्या कार्यालयातून फोन येतो. ''सोहो मधील नव्या गॅलरीत चोरी झालीये. लाखो डॉलर्सची काचशिल्पे चोरीला गेलीत. लाइट नसल्याने अलार्म वाजला नाही.''

जॅक आणि रॅली दोघेही बाहेर पडतात.

किट रॅलीच्या कारमध्ये बसल्यावर सांगते, ''अगं, माझ्याबरोबर आलेल्या बाईची हकीकत भयंकर आहे. तिचं नाव जॉर्जिना . सोनेरी केसांची पण ती पक्की चोर आहे. शॉपिंग मॉलमध्ये ती चोऱ्या करते. क्लबमध्ये आलेल्या तरुण मुलांना घेऊन हिंडते.  त्यांना गुंगीच्या औषधाने बेशुद्ध करून एखाद्या निर्जन ठिकाणी घेऊन जाते. त्यांच्या हातावर तापलेल्या तारेने मी साप आहे असे गोंदवते. नंतर पळ काढते. आज ती क्लब मधून बाहेर गेली तेव्हा चिप जोन्स हा तरुण तिच्याबरोबर होता. त्याचेही केस सोनेरी होते. त्या चिपची काय अवस्था होणार मला कळत नाही. त्याला वाचवायला हवे.''

रॅली चिप्स जोनचा फोन नंबर डिरेक्टरीमधून शोधून काढते. तसेच जॅकलाही फोन करून सर्व सांगते.

जॅक रेगन गॅलरीतील चोरीच्या प्रकरणाची चौकशी करतो.

रॅली जॉर्जिनाच्या हॉटेल मधल्या ४२व्या मजल्यावरच्या खोलीला भेट देते. तिच्या आजीचा फोटो मिळतो.

आर्थर आणि त्याचा सहकारी वॅली हत्यारे घेऊन ट्रीबेकातील लॉरेनच्या फ्लॅटकडे कारने जातात. पण वाटेत पेट्रोल संपते.

एक माणूस पळत जाताना जवळची बॅग रस्त्यावरच टाकून देतो. आर्थर ती बॅग उघडून बघतो. तिच्यात काचेची शिल्पे असतात. तो ती बॅग घेतो.

.... अशी वेगवेगळ्या आघाड्यांवर मोर्चेबांधणी होते.

- जॉर्जिनाचे पुढे काय होते? चिप जोन्स वाचतो की नाही?
- लॉफ्टवरच्या छुप्या तिजोरीतील पत्रे कोणाच्या हाती लागतात?
- गॅलरीतील काचशिल्पांचे काय होते?
- रॅलीच्या फ्लॅटमधील स्टेनगनचे रहस्य काय असते?

सकाळी हडसन नदीवर सूर्याची प्रथम किरणे पडतात तेव्हा या सगळ्या प्रश्नांचा उलगडा झालेला असतो.

कॅरोल क्लार्कच्या या थरारकथेचा झपाटा एकूण औरच आहे




# मराठीतील बारामास काव्ये

दूरदेशी गेलेल्या पतीच्या विरहामुळे
स्त्रीमनाला अस्वस्थ करणारे जाचक ऋतुचक्र




लेखक **डॉ. वसंत स. जोशी**

१२०रु. - सभासदांना सवलतीत

डॉ. वसंत स. जोशी यांनी आपल्या सहस्त्रचंद्रदर्शनाच्या टप्प्यावर 'मराठीतील बारामास काव्ये' हे संशोधनपर पुस्तक प्रकाशित करून आपल्या संशोधकीय कारकिर्दीवर कळस चढवला आहे. मराठीत बारामास काव्यप्रकार हा फारसा फोफावला वा रुजला नाही. परंतु उत्तर भारतातील भोजपुरी, राजस्थानी, गुजराती, बंगाली, पंजाबी वगैरे भाषांमध्ये तो प्रचलित आणि प्रतिष्ठित आहे. उपजीविकेसाठी घर-गाव सोडून परप्रांतात पतीला जावे लागते. तेव्हा त्याच्या विरहामुळे तळमळणाऱ्या पत्नीला एकेक दिवस, एकेक ऋतू त्याची आठवण काढत घालवावा लागत असे; निसर्गातील बदलते रंगरूप तिच्या तनामनातील अस्वस्थतेला तीव्र उत्कट करीत तिला भावनाव्याकुळ करत असे; अशा वेळी तिच्या भावभावनांना काव्यरूप लाभत असे. त्यांचा निर्देश बारामास काव्य असा होतो. लोक साहित्यात अशा विरहभावनेचा अकृत्रिम, आर्त आविष्कार प्रकट करणाऱ्या बारामास गीतांचे उत्तर भारतीय भाषांमध्ये वैपुल्य आहे. गाथासप्तशतीमध्ये अशा काही गाथा सापडतात. पण आज त्या मोजक्याच उपलब्ध आहेत. डॉ. वसंत जोशी यांना योगायोगाने एका हस्तलिखित बाडात एक बारामास काव्य मिळाले. त्यामुळे त्यांचे कुतूहल चाळवले गेले. धुळ्यापासून तंजावरपर्यंत पंधरावीस वर्षांच्या कालावधीत शोध घेतल्यावर त्यांना दहा काव्ये मिळाली. त्यात काव्यगुण बेताचेच होते. त्या रचनांच्या मर्यादाही त्यांना जाणवल्या. परंतु शार्लोट वॉडविल या फ्रेंच संशोधिकेने भारतीय भाषांतील बारामास काव्यांचा अभ्यास करून लिहिलेला बारहमास इन इंडियन लिटरेचर हा प्रबंध डॉ. वसंत जोशी यांना मराठी बारामास काव्याचा अभ्यास वाचकांसमोर ठेवण्यास प्रेरणा देणारा ठरला. महाविद्यालयीन शैक्षणिक जबाबदाऱ्यांतून निवृत्त झाल्यावरही हा विषय त्यांना खुणावत राहिला; त्यामुळेच वयाच्या ऐंशीव्या वर्षी का होईना, हे पुस्तक कर्तव्यभावनेने त्यांनी नेटाने पूर्ण केले.

डॉ. जोशी यांनी संशोधनपर लेखन-अभ्यासात उभी हयात घालवल्याने या छोटेखानी पुस्तकातही त्यांच्या नेटक्या ॲकॅडमिक शिस्तीचे प्रत्यंतर येते.

'मराठीतील बारामास काव्ये - शोध आणि स्वरूप' या प्रकरणात बारामास काव्याचा उगम, लोकजीवनातून प्रेरणा, प्राचीन बारहमास काव्य, बारामास काव्याचे प्रकार, फाग-रास्ते काव्य, चौमासा आणि विरहगीत, पंथीय तत्त्वप्रसाराचे माध्यम, उत्तर भारतीय भाषांतील बारहमासा, राजमती बारहमासा यांचे प्रारंभी विवेचन केले असून मराठीतील बारामास काव्याचे स्वरूप, लौकिक काव्ये, मराठी सण आणि कुळाचार, साहित्य, संगीत, नृत्य, नाटक आणि शिल्प या ललितकलांच्या माध्यमांतून प्रकट झालेल्या राधाकृष्ण प्रेमाच्या छटा, यांचा मागोवा घेतला आहे. अमृतरायाचे द्वादशमास वर्णन, रुक्मांदकृत अभिनव बारामास, नारायण प्रभुकृत षड्रित, सयाजिबाकृत बारामास वर्णन, द्वादशमास (अनेकविकृत कविता-संपादक मोडक), बारामास (संकेश्वर

बाड), बारामास वर्णन (तंजावर), बारामास (धुळे श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर), अशा नऊ बारामास काव्यांची धावती ओळख करून दिली आहे. (पृष्ठे २० ते ४२ ) याच काव्यांच्या संहिता उर्वरित ४० पृष्ठांत दिल्या आहेत. संदर्भ ग्रंथांच्या यादीत बारहमासा इन इंडियन लिटरेचर (शार्लोट वॉडविल), बारहमासा पेंटिंग्ज (डॉ. देशमुख), बारहमासा पेंटिंग्ज (कमल चव्हाण) या इंग्लिश पुस्तकांचा आणि भारतीय संस्कृतिकोश वगैरे ग्रंथांचा समावेश आहे.

बारामास काव्याच्या संदर्भात त्यांना जाणवलेली काही वैशिष्ट्ये वाचकांना विचारप्रवण करतील.

* बारामास काव्याची निर्मिती आणि प्रसार प्रामुख्याने उत्तर भारतात झाला. लोकमानसातून त्याची निर्मिती झाल्याने पिढ्यानुपिढ्या त्यांचे गायन-प्रसारण होत राहिले.

डॉ. जे.सी.घोष, जी.ए.ग्रियरसन, बी.सी.सेन, सुकुमार सेन, डी. इबाविटेल, (बंगाली काव्य), एन. ब्राऊन, एच. सी. भायानी, ओ.डी. दलाल (गुजराती काव्य), बी. जे. संदेसरा (राजस्थानी), कृष्णदेव उपाध्याय (भोजपुरी), यांनी या काव्यप्रकारावर संशोधन, लेखन केले आहे.

* धार्मिक, राजकीय, लष्करी किंवा अन्य कारणांसाठी उत्तरेत गेलेल्या मराठी कवींनी तिकडील भाषांतील बारामास रचनांवरून प्रेरणा घेतली असावी.

* संस्कृतमधील षड्‌ऋतूवर्णन किंवा कालिदासकृत ऋतुसंहार यापासून बारामास काव्याने प्रेरणा घेतली असे म्हणणे अवास्तव ठरेल. हे दोन्ही समांतर पण स्वतंत्र काव्यप्रकार आहेत.

* बारामास हा घाट प्राकृत अपभ्रंश वाङ्‌मयातून संस्कृत व अन्य साहित्यात आला असावा. कधी स्वतंत्रपणे तर कधी कथात्मक काव्याचे अंग म्हणून ऋतुवर्णनात वर्षातील महिन्यांचे वर्णन येत असते. अशा वर्णनातून विप्रलंभ शृंगाररस व्यक्त होतो. मराठी संतांच्या विराण्यांमध्ये गाथा परंपरेतला विप्रलंभ शृंगार आढळतो.

* लोक परंपरेतील अभिजात साहित्यात आलेला हा रचनाप्रकार म्हणता येईल. सुफी कथाकाव्यात येणारी विरहवर्णने बारामासाच्या धाटणीची असतात. पद्मावत कथाकाव्यात बारामासवर्णन आढळते.

* मराठी बारामास काव्याने सण, उत्सव, ऋतू या बाबतीत आपले मराठीपण टिकवून धरले आहे.

* मराठी बारामास काव्याच्या अनुषंगाने मराठा शैलीतील चित्रे रेखाटण्याचा प्रयत्न कोणीही केलेला नाही.

* सुफी संप्रदायातील जीव-शिवाचे मीलन, भागवतातील राधाकृष्ण विरह, पर्शियन लैला-मजनू सारख्या प्रेमिकांचा विरह यासारखी लौकिक विरह भावनांची

वर्णने मराठीत नाहीत. मराठीतील मधुराभक्तीची गीते आध्यात्मिक पातळीवरील आहेत. व्यवसाय व्यापार, लष्करी मोहिमा वगैरेसाठी परप्रांतात व घरापासून दूर जाणारा नायक, गावात एकटी राहणारी नायिका यांच्यातील विरहाची वर्णने बारामास काव्यात येतात. विरही स्त्री आणि तिची सखी यांच्यातील संवाद, सांत्वन त्यात दिसते.

* भारतीय मन आणि जनजीवन घड्याळाच्या काट्याप्रमाणे चालत नाही. ते दिवस रात्र, आठवडे, महिने, ऋतू, वर्ष यांच्या अनुषंगाने चालते. बारामास काव्यातील विरहिणी प्रियकराची प्रतीक्षा करत राहते. नंतर प्रियकर आल्यावर ही प्रतीक्षा संपते. तिच्या विरहाची गीते म्हणजेच बारामास गीते. ऋतूप्रमाणे, निसर्गाप्रमाणे तिचे मनोभाव हिंदकळत राहतात.

* बारामास काव्यप्रकार मध्ययुगात उत्तर भारतात उदयास आला. लोकभाषांतील या रचना काळाच्या ओघात बदलत राहतात.

* नरसी मेहता (१५ वे शतक) यांच्या नावावर विरह बारहमासा काव्य आहे. राधा त्यात विरहाचे वर्णन करते.

* धार्मिक बारामास, शेतकऱ्यांची कृषि गीते, महाकाव्यांतर्गत निवेदनात्मक गीते, वर्षभर दूर असणाऱ्या पतीचे स्मरण करणारी गीते, स्त्रीच्या पावित्र्याची, शीलाची परीक्षा घेणारी गीते असे बारामास गीतांचे पाच प्रकार प्रा. इबाविटेलने सांगितले आहेत. चौमासा, षण्मास, अष्टमासा, बारहमासा यात संख्येला महत्त्व नाही; भावनेला महत्त्व आहे.

* मुस्लीम कवी मुल्ला दाऊद याने १३७५ मध्ये रचलेल्या अवधी भाषेतील मथनी काव्यात लोरिक आणि चंदा या दंतकथेचे निवेदन आहे. त्यात मैनाचा बारामास रंगवण्यात आलेला आहे.

* बिकानेरच्या अगरचंद नहाटा यांनी राजस्थानातील बारहमासांवर अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिला आहे.

* गुजराती भाषेत नेमीनाथ फागू आणि राजमती यांच्या लोककथेवर आधारित विरह बारामासा गीते आढळतात.

* चौमासा म्हणजे पावसाळा. वर्षाऋतूतील एकाकी स्त्रीचे हे विरहगीत आषाढ-श्रावण-भाद्रपदातल तिच्या मनोभावांचे वेदनांचे उत्कट वर्णन घडवते.

* जैन हिंदू, सुफी, शीख, कवींनी आपल्या धार्मिक भावनेचा अविष्कार प्रसार करण्यासाठी बारामास गीतांचा वापर केला आहे.

* मुहमद जायसी या कवीने अवधी भाषेत नागमती बारहमासा लिहिले.

मराठीतील बारामास काव्यातील विरही स्त्रीचा पती व्यापार, सैन्यातील शिपाईगिरी,

तीर्थयात्रा वगैरे निमित्ताने प्रवासाला जातो; वर्षभराने परत घरी येतो. अशा काव्याची सुरुवात चैत्र, श्रावण किंवा कार्तिक महिन्यापासून होते. वर्षभरातील विरह भावनेचे व वेदनांचे विरहिणी स्त्री आपल्या सखीजवळ वर्णन करते; येथे सखी ही प्रामुख्याने श्रोत्याची भूमिका बजावते. या बारामासा काव्यात सण आणि कुळाचार यांचे संदर्भ येतात. गुढीपाडवा, अक्षयतृतीया, वटपौर्णिमा, आषाढी एकादशी, नागपंचमी, गोकुळाष्टमी, श्रावणी सोमवार, गौरी-गणपती, पितृपंधरवडा, दसरा, नवरात्र दिवाळी वगैरे सण-उत्सवांच्या वेळी पतीला स्मरणाने विरहिणींची व्याकुळ अवस्था होणे स्वाभाविकच.

अमृतरायाचे द्वादशमास वर्णन तेरा श्लोकांचे आहे, राधाकृष्ण संदर्भात मराठीतील हे एकमेव काव्य उपलब्ध आहे. तंजावरच्या रुक्मांगद कवीचे अभिनव बारामास १९ श्लोकांचे आणि १९ पदांचे आहे. ते भक्तिशृंगारपर आहे. प्रत्येक महिन्याच्या प्रारंभी त्या ॠतूचे आणि नंतर त्यातील सणांचे वर्णन करून, पतीविना त्यांचा आनंद घेता येत नाही याबद्दलची पत्नीची हळहळ त्यात व्यक्त होते.

नारायण प्रभुरचित 'षड्रितु'मध्ये सहा श्लोक आणि सहा कडवी आहेत. भाषा संस्कृतप्रचुर आहे. ''कांत प्रसूनभर शोभवि गे वनाला, कांतारभूमि कलकंठ वसंत आला''. विरहिणीचे मनोभाव ''मज सोसेना काही रुचेना, होती बहुसाल सीणे'' या सारख्या बोली भाषेत निःसंदिग्धपणे व्यक्त होतात.

सयाजिबाकृत बारामास वर्णनात १३ श्लोक आणि १३ पदे आहेत. यात निसर्गवर्णन, सणवर्णन नाही. विप्रलंभ शृगारातील विरहभाव आणि शेवटी मीलनाची तृप्तता यामुळे काव्य मनाला भिडते.

'द्वादशमास' ४० श्लोकांचे असून त्याचा कवी अनाम आहे.

संकेश्वर भागात सापडलेल्या बारामास मध्ये १४ श्लोक आणि १२ ओवी समूह आहेत. हे काव्य संगीतानुकूल आहे. श्लोक विरहिणीच्या भावना व्यक्त करतात. ओवीसमूह निसर्ग आणि समाजजीवन रंगवतात. प्रारंभी आणि शेवटी राधा-कृष्णाचा उल्लेख आहे, परंतु नायक-नायिका लौकिक जीवनातील भाव प्रकट करतात. उपलब्ध बारामास काव्यात हेच काव्य संपूर्ण उपलब्ध आहे. यातील भाषा व काव्य यांची एक झलक बघा.

*गळा हार घालू नको भार होतो, सख्या वींजण वारिता प्राण जातो.*
*जीवा रे जीवा सर्व श्रींगार साज, मला भेटवा स्वामी गोविंदराजा*

तंजावरच्या बारामास वर्णनात १२ श्लोक आणि १२ पदे आहेत. त्यात मूळ महाराष्ट्रीय सांस्कृतिक जीवनाचा प्रभाव दिसतो. 'षड्रितुवर्णन'मध्ये ७ श्लोक व ७ पदे आहेत. ५८ पदांचे अनाम बारामास हे सर्वात मोठे उपलब्ध बारामास काव्य आहे.

एका उपेक्षित वाङ्मय प्रकाराकडे या पुस्तकामुळे आपले लक्ष जाईल.

❒

नवे कोरे




# नेव्हर टू रिटर्न

**सँडी रीड** /अनुवाद **सुनीता कट्टी**

२४०रु. - सभासदांना सवलतीत

एका हिरावलेल्या बालपणाची अंत:करण पिळवटून टाकणारी सत्यकथा.

समाजकल्याण खात्याने सँडी रीडला आपल्या ताब्यात घेतले. तेव्हा तो फक्त एक वर्षाचा होता. त्या वेळी त्याच्या आईला कल्पनाही नव्हती की, तो परत कधी तिच्या नजरेला पडणार नाही.

'नेव्हर टू रिटर्न' ही स्कॉटलंडमधील टिंकर ह्या भटक्या जमातीत जन्मलेल्या सँडी रीड व त्याची मोठी बहीण मॅगी ह्यांची विलक्षण गोष्ट आहे.

कोवळ्या वयात त्यांना त्यांच्या आई-वडलांपासून व विशिष्ट जीवनपद्धतीपासून दूर केल्यानंतर त्यांच्या आयुष्याची परवड झाली. एका हिवाळ्यातील रात्री समाजकल्याणखात्याचे अधिकारी भटक्या जमातीच्या ह्या लोकांच्या जंगलातील तंबूवर छापा घालून लहान मुलांना ताब्यात घेतात. त्यांना चांगले जीवन देणे. हा उद्देश असला तरी तसे चांगले आयुष्य ह्या मुलांना मिळतच नाही.

इंग्रजी मध्येही उपलब्ध




# नो कम बॅक्स

पाशवी ताकदीपुढे न झुकता, आपल्यावरील अन्यायाचा सूड उगवणाऱ्या अफलातून कल्पनांच्या मायाबाजारातला स्वैर संचार. विलक्षण करामतींच्या कथा




मूळ लेखक **फ्रेडरिक फॉर्सिथ** /अनुवाद **विजय देवधर**

४४५रु. - सभासदांना सवलतीत

फ्रेडरिक फोरसीथच्या थरारकथांनी मराठी वाचकांना चांगलेच झपाटून टाकले आहे. दि डे ऑफ द जॅकल, दि ओडेसा फाइल, दि फोर्थ प्रोटोकॉल, दि डॉग्ज ऑफ वॉर, द अफगाण वगैरे त्याच्या थरारकथा मराठीतही बेस्टसेलर ठरलेल्या आहेत.

दि डे ऑफ द जॅकल आणि दि ओडेसा फाइल या थरारकथांनी भारतातील आणीबाणीच्या काळात शासकीय दडपशाहीच्या सन्नाट्यातून आपल्या लेखन स्वातंत्र्याच्या हक्काचा उच्चार करण्याचा एक छुपा दरवाजा खुला केला होता. याची विस्मृती होऊ नये.

फोरसीथ हा ब्रिटिश पत्रकार. बीबीसीचा राजकीय वार्ताहर. नायजेरियातील यादवी युद्धाची बीबीसीसाठी वार्तापत्रे पाठवताना बायफ्राची जी छळणूक चालली होती ती त्याला भयंकर क्लेशकारक वाटली. बीबीसीची नोकरी सोडून तो पुन्हा बायफ्राला गेला आणि तेथील युद्धाचे तपशील मोठ्या धाडसाने, आपला जीव धोक्यात घालून मिळवून 'दि बायफ्रा स्टोरी' हे पुस्तक त्याने लिहिले. हे त्याचे पहिले पुस्तक. शोध पत्रकारितेसाठी वापरण्यात येणाऱ्या तंत्राचा वापर करून मिळवलेली बरीचशी माहिती वृत्तपत्रे वा बीबीसीसारखी माध्यमे वापरू शकत नाहीत; ती वापरण्यासाठी राजकीय थरारकथा हे माध्यम सर्वाधिक सोयीचे ठरेल हे त्याच्या लक्षात आले.

एका दहशतवादी गटाने फ्रान्सचे अध्यक्ष चार्ल्स द गॉल यांची हत्या करण्याचा कट रचला या प्रत्यक्षात घडलेल्या घटनेचा आधार घेऊन कल्पना व सत्य यांची सांगड घालून दि डे ऑफ जॅकल या थरारकथेची त्याने उभारणी केली. ही थरारकथा अल्पावधीतच जागतिक बेस्टसेलर ठरली. तिला एडगर ॲलन पो यांच्या नावाने ठेवलेला सर्वोत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला. या कादंबरीवरील चित्रपटही गाजला. फ्रेडरिक फोरसीथने आपल्या अचाट प्रतिभेच्या बळावर, शोध पत्रकारितेच्या तंत्राचा वापर करून एकापेक्षा एक सरस थरारकथांचा झपाटा लावला. वर्षाला एक तरी थरारकथा व्हावी असा जणू निर्धार करून अनेक लोकविलक्षण कथावस्तूंनी वाचकांना झुलवत ठेवले.

'दि ओडेसा फाइल्स'मध्ये पूर्वाश्रमातील एका माजी नाझी अधिकाऱ्याचा शोध घेणाऱ्या पत्रकाराची कहाणी आली आहे. होलोकास्टमधून वाचलेल्या एका ज्यूच्या डायरीमुळे त्या काळातील अनेक भीषण घटनांचा पत्ता लागतो.

एका आफ्रिकन देशातील प्लॅटिनमचे प्रचंड साठे आपल्याला सहजपणे मिळावेत म्हणून एक खाणमालक त्या देशात क्रांती घडवून आणण्यासाठी धंदेवाईक मारेकऱ्यांना सुपारी देतो, अशी 'दि डॉग्ज ऑफ वॉर'ची मध्यवर्ती कल्पना आहे.

'दि डेव्हिल्स अल्टरनेटिव्ह मध्ये रशियातील भयंकर दुष्काळ आणि अमेरिकेची लष्करी आणि इतर मदतीची तयारी या कथाकल्पनेला फुटलेले आंतरराष्ट्रीय संघर्षाचे फाटे आपल्याला भीषण वास्तवाची चुणूक दाखवतात.

'दि फोर्थ प्रोटोकॉल'मध्ये रशियातील काही हिंसक गट इंग्लंडमधील अमेरिकन विमानतळ बॉम्बस्फोटाने उद्ध्वस्त करण्याची योजना आखतात. ब्रिटनमधील आगामी निवडणुकांचा रागरंग बदलून ब्रिटनमध्ये रशियाधार्जिणे सरकार सत्तेवर यावे असा उद्देश समोर ठेवून हे सर्व करण्याचे कारस्थान शिजते.

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या मुलाचे अपहरण करून त्याला सोडण्यासाठी वाटाघाटी करण्याचे काम एका मध्यस्थावर सोपवण्यात येते, असे 'दि निगोशिएटर' या थरारकथेचे सूत्र आहे.

असे हे भाडोत्री मारेकऱ्यांचे, दहशतवाद्यांचे, नाझी हस्तकांचे, सत्तापिपासूंचे, दुष्ट कारस्थानी खलनायकांचे, दुर्जनांचे जग फोरसीथला समकालीन कृष्णकृत्यांच्या लीला दाखवते आणि फोरसीथ हा त्यांना निष्प्रभ करून सुखी सत्प्रवण जगाचे मानवतावादी अधिष्ठान देऊ पाहतो.

फ्रेडरिक फोरसीथच्या 'नो कमबॅक्स' या कथासंग्रहातील दहा कथा म्हणजे एका अफलातून मायाबाजारातला स्वैर संचार आहे. तीन चारशे पृष्ठांच्या त्याच्या थरारकथेमध्ये तपशीलाचे आणि घटनांचे जे नाट्यात्मक वैविध्य आढळते तेच वैविध्य त्याच्या नो कमबॅक्स मधील प्रत्येकी ३०-४० पृष्ठांच्या कथांमध्ये आढळते. ज्यांनी त्याच्या थरारकथा अजून वाचलेल्या नाहीत, त्यांनी 'नो कमबॅक्स' या कथासंग्रहापासून सुरुवात केली तर- त्याच्या लोकविलक्षण कथाकथनाच्या जादूची करामत बघून ते मंत्रमुग्ध झाल्याशिवाय राहणार नाहीत.

१९८४ साली प्रसिद्ध प्रथम संग्रहरूपाने प्रसिद्ध झालेल्या या कथा फोरसीथच्या कथाकथन कौशल्याने आजही तेवढ्याच प्रभावी वाटतात. यातील प्रत्येक कथेचे आशयसूत्र आणि भावविश्व वेगवेगळे आहे. प्रत्येक कथेचे आशयसूत्र एक दोन ओळीत सांगता येईल इतके सरळ, साधे आहे. परंतु त्या आशयसूत्राच्या अनुषंगाने फ्रेडरिक फोरसीथ अत्यंत धूर्त धोरणीपणाने, चलाखीने जे अभेद्य शिल्प उभे करतो ते आपल्याला थक्क करते. आपल्या मायापाशात गुंतवून टाकते.

एका परीने या सर्व सूडकथा आहेत. आपल्यावर झालेल्या अन्यायाचे परिमार्जन व्हावे किंवा आपली आकांक्षा पूर्ती व्हावी म्हणून या कथांचे नायक अत्यंत थंड डोक्याने, अगदी हिशेबीपणाने, आपल्या अल्प ताकदीने परंतु जबरदस्त मनोबळाने जे काही योजनापूर्वक करतात, त्याला तोड नाही. प्रत्येक तपशील या कथाशिल्पाच्या कलात्मकतेला परिपुष्ट करतो. कोणी वाचक-समीक्षक या कथांना नीतिकथा (मॉरॅलिटी टेल्स) म्हणतात, त्यातही तथ्य आहे. कारण आपल्या असहायतेचा कोणी गैरफायदा घेऊन आपल्याला सतावत असेल तर त्याने दबून न जाता त्याचा प्रतिकार करणे, त्याचा बदला घेणे, जशास तसे उत्तर देणे, ठकासी व्हावे महाठक हे धोरण अंगीकारणे हे आपले कर्तव्य आहे, असा नि:संदिग्ध बोध या कथा वाचकाच्या मनावर ठसवतात.

या कथांची आशयसूत्रे काय आहेत?

बायकोच्या आजारपणामुळे शरीरसुखाला पारखा झालेला सॅम्युएल नटकिन हा एक सामान्य कारकून. कर्मचारी. त्याच्या हाती एक सेक्सी मासिक लागते. त्यात एका सेक्सी तरुणीची कंपॅनियन पाहिजे अशी जाहिरात असते. फोन नंबरही असतो. सॅम्युएल फोन करतो. अमुक हॉटेलात अमुक वाजता भेटू या असे ठरते. भेट होते. नंतर तिच्या घरी... पुढे त्याला फोन येतो. ब्लॅकमेल. दहा हजार पौंड दे, नाहीतर फोटो तुझ्या बायकोकडे पाठवू. तो जमवाजमव करतो. ते पैसे देण्यासाठी जागा ठरवतो - आणि -

या कहाणीला एकदम कलाटणी मिळते.

एका भारतीय तरुणाला आयर्लंडमधला एक कॉंट्रॅक्टर खूप वाईट वागणूक देतो. काळ्या म्हणून अपमानित करतो. त्याची मानखंडना करतो. तो तरुण त्या कॉंट्रॅक्टरला धडा शिकवण्याचे ठरवतो. मुंबईला येऊन एका विशिष्ट जातीचा एक विषारी साप घेऊन इंग्लंडला जातो... तो साप त्या कॉंट्रॅक्टरच्या ओव्हरकोटच्या आतल्या खिशात सोडतो- पुढे?

त्याची अपेक्षा पूर्ण होते का? सूड उगवतो का? पुन्हा काही अघटित घडते का?

मार्क सँडरसनला अँजेला आवडते. पण ती विवाहित असते. तिच्या नवऱ्याचा काटा काढल्याशिवाय ती त्याला मिळणे शक्य नसते. तो तिच्या नवऱ्याला मारण्यासाठी एका मारेकऱ्याला सुपारी देतो. तो धंदेवाईक मारेकरी आपले काम चोख करतो. पण - ठरल्याप्रमाणे मार्कला अँजेला प्राप्त होते का?

टिमथी हॅन्सन हा अब्जाधीश. आपली अफाट संपत्ती तो आपल्या नावडत्या बहिणीच्या नावे अनिच्छेनेच करतो. पण तिला त्या संपत्तीचा लाभ खरोखर होतो का?

हायजॅकर मर्फी ब्रँडीच्या नऊ हजार बाटल्या चोरून हजारो पौंडस कमाविण्याचा घाट घालतो. ठरल्याप्रमाणे तो ट्रेलर पळवून नेतो. पण त्याला अपेक्षेप्रमाणे फायदा होतो का?

चार तासांच्या रेल्वे प्रवासात पत्त्यांचा डाव मांडून खेळताना एका न्यायाधीशाला गंडा घातला जातो. परंतु त्याला आपली फसवणूक झाली हे सिद्ध करता येत नाही. असे कसे घडू शकते?

या सर्व कथा अत्यंत चातुर्याने आणि हुशारीने, हिशेबीपणाने आणि काटेकोर तपशीलानिशी सांगण्यात आल्या आहेत. कथाकथनाचे सामर्थ्य त्यात दिसते. वाचक त्या मायाबाजारात हरवत जातो. त्या चक्रव्यूहात अडकत जातो.

आपण वाचावा आणि मित्रांना आवर्जून भेट द्यावा असा हा कथात्मक नजराणा आहे. ❐

**नवे कोरे**




# इंटरव्ह्यू टेक्निक्स आणि प्रेझन्टेशन स्किल्स

## डॉ. अरुणा कौलगुड

इंटरव्ह्यू म्हटले की इंग्रजीतून बोलणे, टाय लावणे, कडक शेकहँड करणे, अशा गोष्टींनाच अनावश्यक महत्त्व दिले जाते. इंग्रजी माध्यमाच्या शाळा-कॉलेजांत शिकलेली मुले जे काही इंग्रजी बोलतात, त्यामुळे लहान शहरांतील, गावांतील मुले-मुली भारावून जातात. आपल्याला इंग्रजी बोलता येत नाही याचा न्यूनगंड त्यांच्या मनात तयार होतो....

नोकरीसाठी अर्ज कसा लिहायचा, स्पर्धा परीक्षेसाठी ग्रुप डिस्कशनची तयारी कशी करायची या सर्व गोष्टींबद्दल त्यांच्यामध्ये अनभिज्ञता असते; त्यामुळे अनेकदा ते आपली माहिती प्रभावीपणे मांडू शकत नाहीत.

म्हणूनच हे पुस्तक महाराष्ट्रातल्या सर्व लहान-मोठ्या गावांमध्ये, तसेच शहरांमध्ये राहणाऱ्या; स्पर्धा परीक्षांची, इंटरव्ह्यूची तयारी करत असलेल्या मुला-मुलींसाठी तयार केले आहे. इंटरव्ह्यू देताना विविध प्रश्नांची उत्तरे कशी द्यायची, इंटरव्ह्यूच्या वेळी पाळायचे शिष्टाचार आणि आवश्यक देहबोली (Body Language) या बद्दलची सविस्तर माहिती या पुस्तकात देण्यात आलेली आहे.

# About the Book

## Paper Cranes

- Cheryl Koenig

*A mother's story of hope, courage and determination.*

At the age of twelve Cheryl Koenig's son Jonathan was involved in a horrific car accident. He was given very little chance of survival, and when he did miraculously pull through, doctors predicted that he would most




likely never walk, talk or even eat again. Cheryl refused to accept this prognosis and set out on a relentless quest to save her son. Her fervent hope that he would one day be well again was poignantly expressed by his many school friends who filled their school prayer room with hundreds of handmade paper cranes, symbols of hope and healing.

Drawing on Cheryl's diary from the time, *Paper Cranes* tells the story of Jonathan's extraordinary courage and the Koenig family's unceasing drive to help him defy the ominous predictions. Set against the backdrop of Cheryl's heartfelt grief, denial and anger, the book outlines their desperate search for knowledge in the area of recovery from traumatic brain injury.



Parents **Phil and Doris Davidoff** own and operate a travel agency and a consulting firm. They have been successful parents and business owners for over thirty years. Together they have written eight textbooks on sales and marketing. They were awarded the prestigious Society of Travel and Tourism Educators' Award. They live in Bowie, Maryland.

**Donald Davidoff**, the eldest son in the family, works with Fortune 500 companies as a consultant.

**Douglas Davidoff** is the middle child. He was the youngest regional sales manager in the history of the Hertz Corporation.

# Book review




## Parenting the Office

- Doris Davidoff, Philip Davidoff,
Donald Davidoff & Douglas Davidoff

*Parenting the Office* is an unique book in the Personnel Management and Self-help category.

The author couple Doris & Philip Davidoff has spent about 40 years in the US Tourism industry in the capacity of the owners of a Travel agency and as the Tourism and Management consultants. Both are the faculties in the department of Tourism Management at George Washington University at Washington D.C., USA and have written a number of books related to Management science and practices.

Their children are the co-authors of this book. The elder son Donald is the Project Manager in the IT industry and the younger son Douglas is a Financial Consultant working with Merill Lynch.

In this book Davidoffs have contributed their rich experiences: at office and at home; in order to draw a meaningful link between the two distinct environments, the family and the office.

As all of us know, our family and our office are two different entities with the distinct characteristics as described below:

The family has informal pattern of relationships with altogether different set of goals to achieve (other than profitability). Unlike family, at office one has to deal with the contractual relationships in the formal business activities that have primarily concerned with the profitability of the business. But the same person has to manage these two different worlds. And this poses a big challenge for us in the today's globalized era.

Here this book has provided an entirely new, modern approach to understand and meet the challenges in both the worlds. The authors have taken the reader through an extensive research work based upon the papers, books and quotes of stalwarts such as Dr. Louise Hart, Management expert Tom Peters, Parenting Expert Dorothy Rich, Self-help 'Guru' Stephan Covey, Behavioral Psychologist R. DeCharmes and many more in the fields of Psychology and Management. The results of their research are fascinating. They have agreed that one faces the different kinds of challenges on both the fronts (the family and the office).

e.g. – Raising , nurturing children is a challenge within a family. Children do not have an option to quit the family. It's the permanent relationship. Whereas in the competitive environments of business, retaining the employees is itself a great challenge.

Yet, the authors have drawn the equation between the family and the office in such a way, suggesting that both require the same set of interpersonal and communication skills. With the help of their experiences in their family and at their offices, they have illustrated the 'Parent –Child relationship' analogy for the 'Boss-subordinate relationship' in the office.

e.g.- In a chapter they have equated the parenting styles with that of the Theory X and Theory Y Managers.

They have identified that the skills such as assertiveness, good delegation skills, negotiation skills, listening skills etc. are useful tools for succeeding as a parent as well as a manager. Further a parent in the family may be an office-parent to the subordinate in the office and at the same time an office-child to the higher authority in the office. Hence understanding the spirit of the parent-child relationship may help enriching both, one's family life and career too. In other words, this book is a Two-in-One Gift to the readers. It has brought a fresh, modern approach of parenting and professional Human resource management together.

The book has been divided into the 2 parts. Part I is focused on the Children (The Subordinates) and Part II is focused on the successful parenting techniques of the Parents (The Bosses).

Through the 14 chapters, the authors have told the real stories that

took place at home and at offices and they have shown how good parenting techniques help managing office staff effectively.

At the end of each chapter, they have summarized the lessons in the form of tips for the managers and tips for the employees. In this way, this book has made the management concepts and theories, easy to understand and practise.

Moreover, they have emphasized upon the family values as the greater source of one's interpersonal aptitude at work. We, Asians are rich in culture and are attached to our value system. Hence I believe that the Asian readers would enjoy reading this book. The book may be proved as a great help to readers to deal with the Human resource management challenges successfully in the global business environment.

# New Books




Gayatri's Maths Mantra




Novgorod Diary




Paper Cranes




Saris on Scooters




# Saris on Scooters

– Sheila McLeod Arnopoulos

Category - Non-Fiction
Type - Paperback
Pages - 348
Price - Rs. 395.00

## Praise

“Small loans can be life-changing. Between 2001 and 2008, author and journalist Sheila McLeod Arnopoulos traveled over the span of 21 months to the most impoverished parts of rural India to investigate the transformative capacity of microfinance in combating poverty. *Saris on Scooters: How Microcredit Is Changing Village India* is the captivating result.” — Elisa Bimbaum, *SEE Change*

“A vivid and fascinating account of the struggles and achievements of remarkable women who, though often illiterate, have overcome great obstacles in building businesses and cooperatives using small loans. The book is also entertaining, thanks to Arnopoulos' quest to understand a vast and baffling country she obviously loves…” — Ann Diamond, Writer

“Sleeping on hut floors and traveling on rickety buses and dusty rickshaws, she writes of her intimate interactions with the women of India with warmth and optimism…” — Sarah Fletcher, *Montreal*

## Backlist




Fifty Years of Silence




Never to Return




One Foot Wrong




Salt & Honey




नवे कोरे

## ‘हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र.’

**डेबरा ब्रेव्हरमन, एम.डी.**

अनुवाद

**डॉ. अश्विनी घैसास**

१६०रु. - सभासदांना सवलतीत

डॉ. डेबरा ब्रेव्हरमन यांची ई.ई.सी.पी.मधील तज्ज्ञ म्हणून देशभर ख्याती आहे. अर्ली शो, टाइम इ.मधील त्यांचा सहभाग सर्वज्ञातच आहे. त्या कॉर्नेल युनिव्हर्सिटी मेडिकल कॉलेजच्या (आताचे वेल मेडिकल कॉलेज ऑफ कॉर्नेल युनिव्हर्सिटी) पदवीधर असून अमेरिकन बोर्ड ऑफ फिजिकल मेडिसिन ॲन्ड रिहॅबिलिटेशनच्या सर्टिफिकेटधारक आहेत. युनिव्हर्सिटी ऑफ पेन्सिल्व्हानिया स्कूल ऑफ मेडिसिनमध्ये त्या असिस्टंट प्रोफेसर आहेत व ब्रेव्हरमन ई.ई.सी.पी. हार्ट सेंटरच्या (पूर्वीचे व्हायटल हार्ट ई.ई.सी.पी. क्लिनिक) संस्थापकही आहेत. देशातील सर्वांत जास्त पेशंटना ई.ई.सी.पी. उपचार देणाऱ्या डॉ. ब्रेव्हरमन फिलाडेल्फियामध्ये स्थायिक आहेत.

नवे कोरे




# कार्गोची कणसं

**नरेंद्र माहुरतळे**

१३०रु. - सभासदांना सवलतीत

गाव, गावकीतील अनेक प्रश्न, विकासाच्या नावानं पुन्हा भकास होताना दिसतात. या भकासपणात होरपळ होते ती गावाखेड्यात राहणाऱ्या सामान्यांचीच! आर्थिक विषमतेमुळे हे भकासपण पुन्हा डोळ्यात सलू लागतं. ‘इमला व पाया’ संस्कृतीत गुंतून पडलेलं हे भीषण वास्तव गावाशी घट्ट जुळलेल्या नाळेपासून वेगळं होण्याचा प्रयत्नही जेव्हा करू देत नाही, तेव्हा पुन्हा भेसूर व्हायला लागतं.



# माझे प्रतिभावंत साहित्यिक काका

ज्येष्ठ साहित्यिक भा. द. खेर यांचं २१ जून २०१२ रोजी वयाच्या ९६व्या वर्षी निधन झाले. प्राप्त झालेल्या प्रदीर्घ आयुष्याचा अतिशय चांगला उपयोग करीत त्यांनी दर्जेदार आणि भरघोस साहित्याची निर्मिती केली. त्यांची ११७ पुस्तके प्रकाशित झाली असून त्या सर्वांची पृष्ठसंख्या जवळ-जवळ २५००० आहे.

लहानपणीच साहित्यिक होण्याचे त्यांचे स्वप्न होते. शाळा कॉलेजमध्ये असल्यापासूनच त्यांनी लेखनाला सुरुवात केली होती. साहित्यिक होण्याचे आपले स्वप्न साकारण्यासाठी पदवीप्राप्त केल्यानंतर अतिशय योग्य दिशेने त्यांनी पावले टाकली.

लोकमान्यांच्या 'केसरी'मध्ये आपण नोकरी केली तर साहित्यातील, समाजकारणातील मातब्बर मान्यवरांचे सानिध्य लाभून लेखनासाठी इथे प्रोत्साहन मिळेल आणि आपल्या अंगभूत लेखन गुणांना इथेच पैलू पडतील; हे त्यांच्या दूरदृष्टीला जाणवले आणि 'दैनिक केसरी'मध्ये त्यांनी प्रयत्न सुरू केले. असंख्य हेलपाटे आणि प्रचंड चिकाटी ठेवल्यामुळे बऱ्याच कालावधीनंतर त्यांना नोकरी मिळाली; आणि त्यांची यशस्वीतेकडे वाटचाल सुरू झाली.

'दै. केसरी'त नोकरीला लागेपर्यंत त्यांचा 'नादलहरी' हा कथासंग्रह, 'विजय' ही कादंबरी, पानशेत पुराच्या पार्श्वभूमीवरील 'नंदादीप' आणि अन्य काही कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या होत्या.

'दै. केसरी'मधील सहसंपादक पदाचं काम सांभाळून त्यांचे स्वतंत्र लेखन झपाट्याने सुरू झाले. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनावर कादंबरी लिहिण्याचे घोषित करून त्यांनी प्रकाशनपूर्व नोंदणीसुद्धा सुरू केली. प्रकाशनपूर्व ११,००० प्रतींची नोंदणी झाली. हा त्या वेळी एक विक्रमच होता.

'**यज्ञ**' या कादंबरीचे वाचकांनी उदंड स्वागत केले. काकांवर कौतुकाचा वर्षाव झाला. या कादंबरीचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे या कादंबरीने मराठी वाचकांना 'चरित्रात्मक कादंबरी' या एका अनोख्या लेखनप्रकाराचा परिचय करून दिला होता. पुढे हा प्रकार मराठी साहित्यात चांगलाच रुजला व लोकप्रिय झाला.

'यज्ञ'च्या यशानंतर चरित्रात्मक कादंबरीचे तंत्र वापरून लाल बहादूर शास्त्रींच्या जीवनावर 'अमृतपुत्र', जवाहरलाल नेहरू कुटुंबावर 'आनंद भवन', डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर 'प्रबुद्ध', चॅर्ली चॅप्लीनवर 'हसरे दुःख', चाफेकर बंधुंवर 'क्रांतिफुले', झाशीच्या राणीवर 'समर सौदामिनी' तुकोबांच्या जीवनावर 'तुका झाला पांडुरंग', 'चाणक्य' अशा सरस कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आणि त्यांचे वाचकांनी भरघोस स्वागत केले.

त्यांच्या लेखनात कुठेही क्लिष्टता नसे. सामान्य लोकांना सहज कळेल, अशा अतिशय सोप्या भाषेत ते लिहित. विद्वज्जनांचे, समीक्षकांचे डोळे दिपून जावेत, अशी पांडित्यपूर्ण भाषासुद्धा ते लिहू शकले असते. तशी त्यांची विद्वत्ता, अभ्यास होता. परंतु विद्वत्तापूर्ण भाषा महत्त्वाची नसून तो विषय सामान्य लोकांपर्यंत जावा, ही तळमळ त्यांना अधिक होती. छोट्या-छोट्या सुटसुटीत बातम्यांमधून जो विषय सर्वांच्या अंत:करणाला भिडेल, अशी एक लिखाणाची पद्धत त्यांनी विकसित केली होती. त्यामुळेच अनेक वीरपुरुषांची चरित्रे सामान्य लोकांच्या घराघरामध्ये वाचली गेली. याच तंत्रामुळे महाभारत आणि रामायणही 'कल्पवृक्ष', 'सारथी सर्वांचा' आणि 'सेतूबंधन' या चरित्रात्मक कादंबऱ्यांमधून घराघरात पोहोचले.

कादंबरीसाठी एखादा विषय सुचल्यानंतर ती कादंबरी प्रकाशित होईपर्यंत त्यांना उसंत नसे. मी कॉलेजमध्ये असताना नोट्स काढणे, प्रुफे काढणे इत्यादी कामात त्यांना मदत करीत असे, त्या वेळी त्यांच्या कामाचा झपाटा बघून थक्क व्हायला होत असे. लेखन सामुग्री गोळा करण्यासाठी ते अतिशय परिश्रम घेत पुस्तकाची निर्मिती करताना सर्व अंगांचा सखोल विचार त्यांनी केलेला असायचा.

पुस्तकाला नाव देण्यासाठी तर ते खूपच परिश्रम घेत. पुस्तकाच्या नावाचा फार मोठा वाटा त्या पुस्तकाच्या विक्रीच्या यशात असतो, असे ते नेहमी म्हणत. पुस्तक लिहून, छापून तयार आहे, पण केवळ योग्य नाव निश्चित झाले नाही म्हणून अनेक दिवस किंवा महिने सुद्धा प्रकाशन लांबणीवर पडल्याची अनेक उदाहरणे मला माहिती आहेत. त्यांच्या पुस्तकांची नावे नवोदित लेखकांनी खरोखरीच अभ्यासावीत.

पुस्तक लिहून झपाट्याने पूर्ण करण्यात त्यांचा हातखंडा होता. दूरदर्शन वर 'चाणक्य' मालिका चालू असताना चाणक्यवर कादंबरी लिहून द्या, असा श्री. अनिल मेहतांकडून निरोप आला आणि ती सुद्धा केवळ दोन महिन्यांत! काकांनी लगेच होकार दिला. आणि ठरल्याप्रमाणे दोन महिन्यांत त्यांच्या हाती कादंबरी सुपूर्द केली.

अशा असंख्य आठवणी मागे सोडून माझे काका अनंताच्या प्रवासाला निघून गेले आहेत. ते कायमचेच!

नितिन खेर
आनंद नगर, पुणे ४११ ०५१.

# कवी-मित्र
# श्री. दत्ताजी हलसगीकर

१० जूनला सकाळी वर्तमानपत्रे वाचली अन् प्रचंड धक्का बसला. मला वडीलबंधू समान असणारे कवी-मित्र श्री. दत्ताजी हलसगीकर यांचे सोलापूरला दु:खद निधन झाले होते. माझे मन एकदम २३-२४ वर्षे मागे गेले. १९८८ साली मी बँक ऑफ इंडियामध्ये सोलापूरला बदली होऊन गेलो व त्यानंतर माझे पहिले पुस्तक 'तुम्ही अन् तुमची मुलं' जुलै १९७९मध्ये प्रसिद्ध झाले. ते दत्ताजींना भेट देण्यासाठी मी गेलो होतो. अर्पणपत्रिका पाहून दत्ताजींनी त्याचे कारण विचारले, तेव्हा 'जिच्या अपार कष्टांमुळे आम्ही हे दिवस पाहिले, त्या माझ्या आईला...' मी माझे पुस्तक अर्पण केल्याचे मी सांगितले. त्यांनीही त्यांची आईवर केलेली कविता मला लगेच वाचून दाखवली. आम्हा दोघांचे डोळे कधी पाणावले हे कळलेच नाही. आम्हा दोघांचे लहानपण अत्यंत दारिद्र्यात, कष्टात व हालाखीत गेले असल्यामुळे आमच्या मनाच्या तारा केव्हा जुळल्या, हे आम्हा दोघांनाही कळले नाही. विचार जुळले, मैत्री वाढली, सहवास वाढला आणि दत्ताजी आमचे 'दादा' केव्हा झाले, हेही कळले नाही.

साहित्य विश्वात मी नुकताच  प्रवेश केला असला तरी, दत्ताजींसारख्या कवींची मैत्री असल्यामुळे सोलापूरमधील साहित्यिक विश्वात मी सहजपणे वावरू लागलो होतो. दत्ताजी मला विविध साहित्यिकांकडे, कवींकडे घेऊन जायचे. आवर्जुन ओळख करून द्यायचे. त्यांच्यामुळे आयुष्यात पहिल्यांदा माझ्या कविता सादर करण्याची संधी मिळाली, तीही  थेट कवी संमेलनातच! रा. ना. पवार यांच्यासारख्या दिग्गज कवी बरोबर मनसोक्त गप्पा मारायचा योगही आला. दत्ताजींच्या घरी आमच्या गप्पांच्या मैफिली जमायला लागल्या. माझ्या पुस्तकाची तीन वर्षांत तिसरी आवृत्ती निघाली, याचे दत्ताजींना खूप अप्रूप वाटले होते. मग त्यांनी आणि माझा एक मित्र जयंत राळेरासकर यांनी पुढाकार घेऊन तिसऱ्या आवृत्तीचा प्रकाशन समारंभ घडवून आणला. त्याच दिवशी नेमकी बाळासाहेब ठाकरे यांची सोलापूरातील पहिलीच सभा (१६ मे १९९३)  जाहीर झाली. आता आमच्या प्रकाशन सोहळ्याला किती लोक येणार या माझ्या शंकेवर दादांनी धीर दिला व आमचा प्रकाशन सोहळा दीड-दोनशे लोकांच्या उपस्थितीत छानपैकी पार पडला. दादांच्याच प्रोत्साहनामुळे मी मी वर्षभर

'दै. तरुण भारत'मध्ये एक मालिका चालवली. ती खूप लोकप्रिय झाली. तिचेच नंतर 'सुसंवाद सहकाऱ्यांशी' हे पुस्तक काढले. पहिल्याच पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या याचे दादांना कौतुक वाटले. त्यांच्या ज्या-ज्या साहित्यिक मित्रांकडे आम्ही जायचो त्यांच्याजवळ ते आवर्जून याचा उल्लेख करायचे व माझी ओळख करून द्यायचे. अत्यंत साधे, सात्विक पण दिलदार व मनमिळाऊ व्यक्तिमत्त्व म्हणजे आमचे दादा.

मी विडंबन गीते करीत असे. दादा मला आवर्जून ती ऐकवायला लावत. व त्यातील त्रुटी, काय हवे, काय नको सांगत. गप्पांच्या ओघात त्यांनी एकदा सहजपणे विडंबन काव्यातील गोम मला समजून सांगितली, त्याचा मला खूप फायदा झाला. आता मी आचार्य अत्र्यांवर विडंबन-गीतांचा कार्यक्रम करतो, याचेही दादांना खूप कौतुक असे. दौंडमधील एका कार्यक्रमामध्ये 'उत्कृष्ट विडंबन काव्या'चे पारितोषिक दादांच्या हस्ते मिळण्याचा योगही आला.

१९८०च्या दशकात जांभूळ पाडा गावात ढग फूटी झाली होती. आसपासची चार-पाच गावे वाहून गेली. त्याठिकाणी नंतर आपद्ग्रस्तांसाठी आश्रम उभे राहिले. त्या आश्रमाच्या व्यवस्थापकांनी दादांची 'उंची' ही कविता आश्रमाच्या प्रवेशद्वारा जवळ लावायची परवानगी मागितली. दादांनी ती तत्काळ दिली. ती कविता तिथे विराजमान झाल्यावर त्या संस्थेवर दानशूर लोकांनी देणग्यांचा असा काही वर्षाव केला की, त्यांची अवस्था 'दुबळी माझी झोळी...' अशी झाली. त्यांच्या या कवितेने दानाची व लोकप्रियतेची अशी काही 'उंची' गाठली की विचारता सोय नाही.

आज महाराष्ट्रातील अनेक सामाजिक व सेवाभावी संस्थांच्या प्रवेशद्वारावर ती विराजमान झाली असून त्या संस्थांवर लाखो रुपयांच्या देणग्यांचा वर्षाव झालेला आहे.

अंतर्नाद मासिकाचे संपादक श्री. भानू काळे यांनी त्यांच्या मासिकांच्या १९९०-९२च्या एका अंकामध्ये या कवितेला मुख-पृष्ठावर मानाचे स्थान सालंकृत दिले होते, याची आज आवर्जून आठवण येते.

१९९४ साली माझी पुन्हा पुण्यात बदली झाली. त्यानंतर दादा केव्हाही पुण्यात आले की, पहिला फोन मला असायचा. 'अविनाश मी पुण्यात आलो आहे. दादांना पुण्यातील वाहतूक, रस्ते, वेगवेगळी ठिकाणे, लांबची अंतरे याबद्दल एक प्रकारची काळजी वाटायची. त्यामुळे मग त्यांना त्यांच्या विविध साहित्यिक मित्रांकडे घेऊन जायची जबाबदारी आपसूक माझ्याकडे यायची.

पुलंच्या ८१व्या वाढदिवसाच्या दिवशी दादांचा सकाळीच फोन आला ''मी पुण्यात आलो आहे, आपल्याला भाईकडे (पु.ल.) जायचे आहे. त्यांचे नवे घर माहीत आहे का?'' अर्ध्या तासात आम्ही पु.लंच्या घरी हजर झालो. पु.ल. तेव्हा

खूप आजारी होते. आम्ही पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिष्टचिंतन केले. दत्ताजींकडे पाहून पु.ल. म्हणाले नाव आठवत नाही. दत्ताजींनी नाव सांगितल्यावर पुलंनी तात्काळ कोटी केली ''हा सलगी करतो असे लोक म्हणतात खरे.'' त्याही अवस्थेत पुलंच्या ह्या तत्काळ कोटीवर उपस्थितांमध्ये जोरदार हशा पिकला.

दादांनी त्यांची 'उन्हातल्या चांदण्यात' व 'चाहूल वसंताची' हे दोन काव्यसंग्रह मला भेट दिले, ती माझी लाखमोलाची ठेव आहे. माझ्या घरी दादा आले की, येथेही गप्पांच्या मैफिली रंगायच्या. एकदा दादांच्या ३-४ गाजलेल्या कविता ('चट-चट चाललेत नाजूक पाय', 'रंगावली', 'आई' व 'उंची') दादांनी गाऊन दाखवली व ती मी रेकॉर्ड करून ठेवली आहेत.

दादांच्या कवितेत भव्य-दिव्य असे नाही, त्याबद्दल त्यांना खंत नाही. पण त्यांच्या कवितेत स्वानुभूति आहे, निसर्गसिद्ध आढ्यता व रसगंध त्यात ओतप्रोत भरलेला आहे. माणसातील सद्भावनेला मनापासून हाक घालणारी, आव्हान करणारी अशी दादांची कविता आहे. वडीलधाऱ्यांवर, जीवनावर, आई आणि गुरूंवर श्रद्धा ठेवणारी आहे, म्हणूनच ती मनाला भावते. आत कुठेतरी मनात जाऊन रुतून बसते हेच महत्त्वाचे. असा आमचा मनमोकळा, सालस, प्रेमळ व दिलदार कवी मित्र आज आमच्यात नसला तरी त्यांच्या असंख्य कविता आपणा सर्वांनाच कायमच्या साथ व आनंद देतील, मार्गदर्शन करतील याबद्दल खातरी आहे. अशा आमच्या दादांना विनम्र श्रद्धांजली.

*ज्यांची बाग फुलून आली*
*त्यांनी दोन फुले द्यावीत*
*ज्यांचे सूर जुळून आले*
*त्यांनी दोन गाणी द्यावीत.*

*ज्यांच्या अंगणात झुकले ढग*
*त्यांनी ओंजळ पाणी द्यावे*
*आपले श्रीमंत हृदय त्यांनी*
*रिते करून भरून घ्यावे.*

*आभाळाएवढी ज्यांची उंची*
*त्यांनी थोडे खाली यावे*
*मातीत ज्यांचे जन्म मळले*
*त्यांना खांद्यावरती घ्यावे.*

दत्ता हलसगीकर

अविनाश भोमे
कर्वे रोड, पुणे ४११ ०३८
फोन : ९८८१६४०४४७

**आगामी**




# वुइ आर पुअर बट सो मेनी

**इला आर. भट्ट**

**अनुवाद**
**सुनीति काणे**

'सेवा' (SEWA - Self Employed Women's Association) हे इलाबेन भट यांचं अलौकिक जीवितकार्य आहे. लहानसहान व्यवसायांवर उपजीविका करणाऱ्या तळागाळातल्या लाखो गरीब स्त्रियांना संघटित करून 'सेवा'नं त्यांना त्यांच्या कुवतीची, हक्कांची आणि संघटित झाल्यामुळे लाभलेल्या बळाची जाणीव करून दिली आणि त्यांना सक्षम बनवून त्यांची परिस्थिती सुधारली. कचरा गोळा करणं, चिंध्यांपासून रजयांच्या खोळी शिवणं, भरतकाम करणं, डिंक गोळा करणं, मिठागरांमध्ये मीठ बनवणं अशा विविध व्यवसायांतल्या स्त्रियांच्या मालाला बाजारपेठ आणि चांगले भाव मिळवून देणं, कर्जाच्या चिखलातून वर काढायला स्वस्त दरानं कर्ज देणं, त्यांना इतर विविध सुविधा मिळवून देणं अशी अनेक कार्यं 'सेवा'नं कशी तडीला नेली, याचा प्रेरणादायी, उद्बोधक अनुभव हे पुस्तक घडवतं.

स्त्री-कल्याण, दारिद्र्य निर्मूलन, नोकरीच्या सुसंधीमध्ये वाढ इच्छिणाऱ्या प्रत्येकानं हे पुस्तक वाचायलाच हवं!




## ‘इट्स ऑलवेज पॉसिबल’
### तिहारचा कायापालट




तिहार सेंट्रल जेलच्या तत्कालीन तुरुंगाधिकारी किरण बेदी यांनी राबवलेल्या अनोख्या प्रयोगांचं चित्रण त्यांच्या ‘इट्स ऑलवेज पॉसिबल’ या पुस्तकात गेलं आहे.

गुन्हेगार ही माणसंच असतात हे जाणून त्यांनी तुरुंगातच विपश्यना शिबिराचं आयोजन केलं. त्याबद्दल त्यांनी लिहिलं आहे,

एक दिवस मी तुरुंगाच्या फेरीला निघाले होते. माझ्यासोबत राजेंद्रकुमार नामक तरुण, सडपातळ असिस्टंट सुपरिटेन्डन्ट होता. गुन्हेगारांना आपण होऊन गुन्हेगारी सोडावी म्हणून काही जादूचा मंत्र वगैरे असता तर किती बरं झालं असतं!’’ मी म्हणाले. त्यावर त्याने मला असा एक उपाय आहे व त्याचं नाव ‘विपश्यना’ आहे, असं सांगितलं. माणसाचं पूर्ण व्यक्तिमत्त्व बदलून टाकण्याची ताकद या विपश्यना तंत्रात होती. मात्र विपश्यना शिबिर हे दहा दिवसांचं निवासी शिबिर होतं. त्याचे नियम अत्यंत कडक होते. यात सहभागी होणाऱ्याला दहा दिवस मौनव्रत पाळण्याची शपथ घ्यावी लागते. (याला नोबल सायलेन्स असे म्हणतात) आपापसात किंवा बाहेरच्या व्यक्तींशी

संवाद करण्याची त्यांना परवानगी नसते. या शिबिराचा दिवस भल्या पहाटे चार वाजताच सुरू होई. ठराविक नेमलेल्या वेळी ध्यानधारणेस बसून आठ तास ध्यान करावे लागे.

दररोज सायंकाळी कैद्यांना व्हिडीओवर एक प्रवचन दाखवायचे होते. हे प्रवचन केवळ सहभागी व्यक्तींपुरतेच मर्यादित नव्हते, तर कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय कर्मचारी व परिस्थितीनुरूप जर शक्य झालं तर आमचे सुरक्षा अधिकारी व पहारेकरी यांनाही आळीपाळीने बोलावून हे प्रवचन ऐकवण्यात येणार होते. जन्मठेपेची शिक्षा झालेल्या त्या कैद्यांच्या सहवासात म्हणजे मग त्या कैद्यांशी मानसिक जवळीक होऊन हे शिबिर भरवण्यामागचा उद्देश त्यांना नीट समजावून देणे शक्य होणार होते.

त्यांच्या मनातील ही उद्दिष्टे कितीही प्रामाणिक असली तरीसुद्धा त्या निर्ढावलेल्या गुन्हेगारांनी सुरुवातीला त्यांच्याकडे संशयी दृष्टीकोनातूनच पाहिलं, कारण संवेदनशीलता, दयाळूपणा, माया इत्यादी भावनांची त्या गुन्हेगारांना मुळातच ओळख नव्हती.

त्यामुळे हे दोघे प्रशिक्षक जेलमध्ये वास्तव्य करून राहिले असता त्यांना सुरुवातीचे २-३ दिवस अत्यंत भयप्रद अनुभवांना सामोरे जावे लागले. त्यांना ते कैदी धमक्या देऊन घाबरवण्याचा प्रयत्न करत. आता या प्रशिक्षकांचा तुरुंगात प्रवेश झाल्यामुळे आपली पहारेकऱ्यांमधील व इतर कैद्यांमधील किंमत कमी होऊ लागली आहे, अशी त्यांची भावना होती.

विपश्यना शिबिरात सहभागी होणाऱ्यांसाठी फार कडक नियम होते. दहा दिवसांच्या अखेरीस या सर्व विपस्विनी (सहभागी व्यक्तींनी) या मौनव्रताचा भंग करून आपले मनोगते केली असता ती मते अक्षरश: थक्क करून सोडणारी होती. प्रत्येकाच्या हृदयात ती ऐकत असताना आनंदाचा पाझर फुटला. एकेकाळच्या या अट्टल निर्ढावलेल्या गुन्हेगारांच्या व्यक्तिमत्त्वात काय आश्चर्यकारक बदल झाला होता. जणू काही त्यांचा पुनर्जन्मच झाला होता.

**अनिरुद्ध अभ्यंकर**

लोकप्रभा, दिनांक -०८/०६/२०१२

❐

# ‘दिवा’

गेली वीस एक वर्ष सातत्यानं सकस कथा लिहिणाऱ्या, त्यासाठी अनेक पारितोषिके पटकाविणाऱ्या लेखिका प्रमोदिनी वडके-कवळे यांचा ‘दिवा’ हा नवा कथासंग्रह.मानवी स्वभाव आणि नाती यांच्या परस्पर वागण्यामागचा कार्यकारणभाव शोधणे हा प्रस्तुत लेखिकेचा आवडता छंद असल्यामुळे की काय, या संग्रहातील बहुतांश कथा मुख्यत्वे या सूत्राभोवती फिरताना दिसतात. प्रस्तावनेत आशा साठे म्हणतात त्यानुसार, यातील स्त्रियांचे प्रश्न मुख्यत: नाते संबंधांशी जोडलेले आहेत. त्याला एक मध्यमवर्गीय जगण्याची चौकट आहे. या परिस्थितीत या स्त्रिया ज्या प्रकारे वागतात, स्वत:ला ओळखत परिस्थितीचा स्वीकार करतात, निर्णय घेतात, प्रतिसाद देतात, सत्य शोधण्याचा, ते मान्य करण्याचा प्रयत्न करतात, त्यामागे लेखिकेची भूमिका स्पष्ट दिसते; आणि तेच या कथांचे वैशिष्ट्य आहे.




भोवतीच्या वातावरणातील पारंपरिक बाज सांभाळताना, त्यांना बदलाची निकडही जाणवते आहे. अशा संधिकालातील ह्या स्त्रिया आहेत.

गेल्या पन्नास साठ वर्षात भारतीय स्त्रियांचं मनोविश्व खूप बदललं आहे. वेगानं बदलत आही तरीही त्यांच्या भोवतीच वातावरण मात्र पूर्ण बदललेलं नाही, समाजाच्या अपेक्षा फारशा बदललेल्या नाहीत. जगण्याची आधुनिक शैली स्वीकारताना त्यातला पारंपरिक बाज मात्र स्त्रियांनीच सांभाळावा आणि त्या विवक्षित मध्यमवर्गीय चौकटीत राहूनच त्यांनी जगाचा वेध घ्यावा, अशी एकूण समाजाची अपेक्षा असते. अशा तळ्यात मळ्यात जगणाऱ्या स्त्रियांचा आणि त्यांनी आपापल्यापरीने सोडविलेल्या काही सामाजिक प्रश्नांचा वेध या कथांमधून घेतल्याचं लक्षात येतं.

अत्यंत समर्पक शीर्षक लाभलेली पहिलीच कथा ‘बोरीबाभळी’ - अनुताई आणि सुधाताई यांचे ‘मी,पणाचे पीळ, परिस्थितिजन्य असे दोघींचे भिन्न स्वभाव, पण आयुष्याच्या संध्याकाळच्या टप्प्यावर मुक्कामाच स्टेशन एकच असल्याचा झालेला साक्षात्कार, त्या जाणीवेपोटी जुळलेले मैत्रीचे समंजस, समजूतदार नाते, दोघींना अस्वस्थ करणारे.

या कथासंग्रहाला ज्या कथेचे नाव दिले आहे त्या ‘दिवा’ कथेविषयी आवर्जून

लिहावेसे वाटले.

कथेतील अविनाश आणि सरोज (शेजारी राहणारे) यांच्या आयुष्यात घडून गेलेल्या मोहाच्या एका क्षणाने, त्या दोघांच्या वर्तनातील उमटलेल्या प्रतिक्रिया अगदी भिन्न व स्वभावानुसार आहेत. स्त्री-पुरुषांच्या एकूण जीवन विषयक भाष्य करणाऱ्या आहेत.  लेखिकेने त्या 'चुकार शारीर क्षणांच्या' घटनेच्या मुळाशी जात, स्त्री-मनाचे उकलून अनेक पदर समर्थपणे उलगडून दाखविले आहेत. त्यासाठी 'दिवा ही कथा मूळातूनच वाचायला हवी.

'काटा रुते' या कथेतील पुरुष मनही सहृदयतेने उभे केले आहे. कथा-विषयही स्तुत्य आहे. एकूण कथांमधील 'उपमा' सहज येतात. प्रसंगानुरूप कथेतील व्यक्तीच्या मूडनुसार, निसर्गाच्या बदलत्या रूपांची झलक उचित परिणाम साधते. आजच्या वेगाने बदलणाऱ्या समाजाची नस पकडीत त्यातील व्यक्तिरेखांचे संघर्ष या पुढील कथासंग्रहात वाचायला मिळतील अशी अपेक्षा.

मिळूनी साऱ्याजणी - जुलै २०१२

❐

**आगामी**




# खुलदाबादच्या खजिना

## मीरा सिरसमकर

खट्याळपणा, खोडकरपणा, खेळकर वृत्ती आणि खळाळणारा उत्साह ही साऱ्याच लहान मुलामुलींची वैशिष्ट्यं –

मग ती शहरातली असो वा ग्रामीण भागातली.
'खुलदाबादच्या खजिन्यात' या अशाच
खास मुलामुलींच्या अनेक गमतीजमती दडलेल्या आहेत.
त्या तुम्हाला खचितच आवडतील.
खरं तर यातील बालकुमार
तुम्हाला कुठेतरी भेटलेही असतील!

# 'व्हिदर जस्टिस'
## महिला कैद्यांच्या करुण कहाण्या

अनादी काळापासून सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक आणि आर्थिक शोषणाला बळी पडत असलेल्या स्त्रियांच्या असंख्य कहाण्या आजवर प्रकाशित झाल्या आहेत. तुरुंगातील महिला कैद्यांवरही अनेक पुस्तके लिहिली गेली आहेत. नंदिनी ओझा यांनी लिहिलेल्या 'व्हिदर जस्टिस' या पुस्तकातील महिला कैद्यांच्या आयुष्यावर टाकलेला प्रकाशझोत मन सुन्न करणारा आहे. पुस्तकातील दहा कहाण्यांमधून गुन्हेगारीचा शिक्का बसलेल्या महिलांवर असे प्रसंग का ओढवले, आणि यात त्यांचा खरोखरीच दोष होता का, हे प्रश्न वाचकांना पडू लागतात. प्रियंका कुलकर्णी यांनी केलेला त्याचा समर्थ मराठी अनुवाद वाचताना वाचक वेगळ्याच विश्वात जातो. समाजसेवेचे पदव्युत्तर शिक्षण घेत असताना नंदिनी ओझा यांना प्रात्यक्षिक प्रशिक्षणासाठी मध्यवर्ती तुरुंगात पाठविण्यात आले होते. तुरुंगातील महिला कैद्यांबरोबर संवाद साधताना त्यांना आलेले अनुभव हृदयद्रावक होते. शोषणाच्या बळी ठरलेल्या या महिलांच्या करुण कहाण्यांनी लेखिकेला अस्वस्थ केले. गुन्हा केला म्हणून या महिलांना शिक्षा झालेली असली तरी तो गुन्हा त्यांनी ठरवून केलेला नव्हता, तो करण्यासाठी त्यांना भाग पाडलं गेलं होतं, हे लेखिकेला कळून आलं. एक स्त्री म्हणून समाजाने या महिलांना दिलेली निर्घृण वागणूकच हे गुन्हे घडण्यासाठी कारणीभूत ठरल्याचं लेखिकेला जाणवलं.




नंदिनी ओझा या 'नर्मदा बचाव आंदोलना'तील सक्रिय कार्यकर्त्या आहेत. आंदोलनातील सहभागामुळे त्यांना अनेकदा अटक होऊन तुरुंगातही जावं लागलं. कच्ची कैद भोगताना त्यांनी सोबतच्या कैदी स्त्रियांसमवेतचा संवाद अधिक वाढवला. त्यांच्या जीवनकथांविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न केला. स्वत: कैदी असल्याने अन्य महिला कैद्यांचा विश्वास संपादन करून एखाद्या बाहेरच्या संशोधकाला वा लेखकाला जे शक्य झाले नसते अशा घटनांचे आकलन त्यांना त्यातून होत गेले.

तुरुंगात त्यांनी अनेकींशी जवळीक साधली. ज्या परिस्थितीने या स्त्रियांवर

गुन्हेगारीचा शिक्का बसून आयुष्यभर वावरण्याची वेळ आली, त्या परिस्थितीविषयी लेखिकेच्या मनातील चीड उफाळून आली. महिला कैद्यांचे हे अनुभव इतरांना कळले पाहिजेत असे त्यांना वाटू लागले आणि 'व्हिदर जस्टिस' पुस्तकाची निर्मिती झाली.

या पुस्तकातील दहाही प्रकरणांतील महिला कैद्यांची नावे काल्पनिक असली तरी त्यांच्यावर ओढवलेले प्रसंग वास्तव आहेत. या कैद्यांची नावे मुद्दाम उघड करण्यात आलेली नाहीत. या पुस्तकाच्या निमित्ताने न्यायालयीन आणि कायदा यंत्रणेत सुधारणा करण्याची जाणीव वाढू लागली आहे. तुरुंगातील स्त्रियांबद्दल समाजात आता सहानुभूतीची भावना वाढत आहे आणि परिस्थितीवश गुन्हेगार होण्याचे प्रमाण पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये अधिक आहे, हेही यात जाणवते. अनेक कैदी स्त्रिया घरात वा कामाच्या ठिकाणी परिस्थितीला बळी पडतात आणि त्यांना शिक्षा देताना याचा विचार करण्याची गरज लेखिकेने मांडली आहे. 'बेघर रेवतीची कथा' यातील चरस बाळगल्याने तुरुंगात जाण्याची वेळ आलेली महिला, 'अंधेरनगरी चौपट राजा'तील दायली, इतरांपेक्षा वेगळी असलेली 'अंतिम इच्छा : शकुंतलेची इच्छा' या कथा वाचताना एक प्रकारचे सुन्नपण जाणवते. या कहाण्यांनी हृदय पिळवटते. कथेतील नाटय़ रंगविण्यात लेखिका कमालीची यशस्वी झाली आहे. शबनमचा उठाव वाचताना परिस्थिती आणि समाज कसा वागतो, हे पाहताना चीड येते. चेटकिणीचा शिक्का बसलेल्या बुध्वावर गुदरलेले प्रसंग, 'रेहानाचा बदला' या कथांमधून समाजापायी अंधारलेले तुरुंगातील महिला कैद्यांचे आयुष्य कळून येते. एकंदरीत 'व्हिदर जस्टिस'ने महिला कैद्यांच्या आयुष्यातील काळोखे जग वाचकांपुढे आणले आहे. ❐


**सभासद वर्गणी भरण्यासाठी, व पुस्तके मागविण्यासाठी खालील पत्त्यावरही संपर्क साधू शकता**

**मेहता बुक सेलर्स**

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८
(शनिवारी बंद)
फोन : (०२३१)२५४२९०१.
टेलिफॅक्स : (०२३१)२५४१८८१.
Email : mehtabooks@eth.net



## ओळख लेखकांची

# विश्वास पाटील

श्री. विश्वास पाटील यांच्या सामाजिक आणि ऐतिहासिक कादंबऱ्या मराठीबरोबरच राष्ट्रभाषा हिंदीमध्ये अतिशय लोकप्रिय ठरल्या आहेत. आज हिंदी भाषेत प्रकाशित होणाऱ्या प्रथम श्रेणीतील समीक्षक आणि वाचकप्रिय लेखकांमध्ये विश्वास पाटील यांचे नाव घेतले जाते.

श्री. विश्वास पाटील यांचे संपूर्ण वाङ्मय मराठी आणि हिंदीबरोबरच गुजराती आणि कन्नडमध्ये प्रकाशित झाले आहे.

त्यांच्या 'झाडाझडती' या कादंबरीस १९९२चा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला होता.

तसेच कलकत्त्याच्या भाषा परिषदेचा पुरस्कार त्यांच्या 'पानिपत' कादंबरीस मिळाला.

'महानायक' ही त्यांची नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनावरील कादंबरी अकरा भाषांमध्ये प्रकाशित झाली आहे.

बंगालचे आजचे आघाडीचे कवी व कादंबरीकार श्री. सुनील गंगोपाध्याय यांनी 'देश' या पाक्षिकामध्ये 'महानायक' कादंबरीवर एक स्वतंत्र लेख लिहून तिच्यातील वाङ्मयीन गुणांची तारीफ केली आहे. ''नेताजींच्या जीवनावर बंगालीमध्येही अशी ललित कलाकृती लिहिली गेली नाही,'' – अशा शब्दांत त्यांनी तिचा गौरव केला आहे.

ज्येष्ठ कन्नड कादंबरीकार एस. एल. भैरप्पा यांनी 'महानायक'चा

'एक उत्कृष्ट कादंबरी' असा गौरव केला आहे; तर सुप्रसिद्ध तामिळ आणि इंग्रजी समीक्षक प्रा. सी. टी. इंद्रा, पाटील यांच्या 'झाडाझडती' या कादंबरीचा 'अक्षर साहित्यातले लेणे' अशा शब्दांत गौरव करतात.

श्री. विश्वास पाटील यांनी लिहिलेल्या आणि चंद्रलेखा संस्थेने प्रकाशित केलेल्या 'रणांगण' या नाटकाचे सुमारे पाचशे प्रयोग देशात आणि परदेशांत झाले आहेत.

श्री. विश्वास पाटील सध्या महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील आय. ए. एस. अधिकारी आहेत.

**विश्वास पाटील यांची आम्ही प्रकाशित केलेली साहित्यसंपदा**

| **पुस्तकाचे नाव** | **किंमत** |
|---|---|
| संभाजी | ४८० |
| नॉट गॉन विथ द विंड | ४१० |
| क्रांतिसूर्य | १३० |







# विश्वास पाटील यांच्या 'संभाजी' पुस्तकातील काही भाग

मध्यरात्रीचा झोंबरा, थंडगार वारा वाहत होता. आज काही केल्या गोदूच्या डोळ्यास डोळा लागत नव्हता. वाड्याशेजारच्या जुनाट पिंपळावरच्या डहाळ्यांतून आणि बाजूच्या बांबूच्या बनात वाऱ्याची भिरभिर सुरू होती. पिंपरणीची इवलीशी फळे आड्यावरच्या हातकौलांवर टप टप आवाज करीत पडू लागली. गोदूने या कुशीवरून त्या कुशीवर मान वळवली. तिच्या मनगटातला हिरवा चुडा अजून उतरला नव्हता. उणापुरा एक महिनाच झाला असेल तिच्या लग्नाला. तिन्हीसांजेची झाकढाळ एकदा उरकली आणि देवघरापुढे सासूबाईंचे अंथरुण टाकले, की गोदू आपल्या खोलीत यायची. ती पलंगावर पाठ टेकते न टेकते तोवर तिच्या खोलीबाहेर नवऱ्याची दबकती पावले वाजायची.

आजची रात्र मात्र गोदूला काहीशी विचित्र वाटत होती. देवघरातल्या समया केव्हाच विझल्या होत्या. पलीकडच्या खोलीतून सासूबाईंच्या घोरण्याचा आवाज ऐकू येत होता. रात्र बरीच झाली होती. मात्र खोलीबाहेर तिच्या नवऱ्याचा, निवासरावचा पत्ता नव्हता. गोठ्यातली जनावरे आणि खुराड्यातली कोंबडीही अजून जागीच होती.

आजची उभी रात्रच गोदूला उगाचच विचित्र, तितकीच विषण्ण भासत होती.

ती मध्येच अंथरुणावरून उठली. एक सोपा ओलांडून तिने हळूच अंगणाकडे नजर टाकली. दिंडी दरवाजाच्या आतल्या बाजूला पडवीवर एक तांबूसलाल मशाल ढणढण जळत असलेली तिने पाहिली. तिथेच खाली पडवीवर कसलीशी एक तातडीची गुप्त मसलत चाललेली दिसत होती. गोदूचे सासरे त्र्यंबकराव चिंताग्रस्त मनाने चवड्यावर बसले होते. त्यांच्या पुढ्यातच निवासराव काहीसा बावरा होऊन बापाकडे टकामका पाहत होता. त्या मसलतीत आणखी तीन अनोळखी, भेसूर चेहऱ्यांची माणसे हजर होती. त्र्यंबकरावकडे बारा गावचे देशपांडेपण. त्यामुळे आला असेल एखादा वाद, असा विचार करीत गोदूने तिकडे कानाडोळा केला.

वाढत्या रात्रीबरोबर वारा वेळूच्या बनात धिंगाणा घालू लागला. कौलांवर पिंपरणीच्या फळांचा नुसता सडा पडत होता. भीतीने गोदूचे काळीज कालवले जात होते. असली कसली म्हणायची ही राजकारणं! तसे गोदूचे माहेर म्हणजे महाडजवळचे एक आडवळणी खेडे. परंतु गोदूचे व्यवहारज्ञान उत्तम होते. तिचे काका छत्रपती शिवाजीराजांच्या अष्टप्रधानातले सुरनवीस अण्णाजी दत्तो प्रभुणीकर. त्यामुळेच काका-मावशीकडे गोदू अनेकदा रायगडला आणि पाचाडला जात असे. शिवशाहीत

नेमके काय चालले आहे, कोणत्या नव्या मोहिमा आखल्या जात आहेत, ह्या साऱ्या गोष्टी तिच्या कानावर यायच्या. छत्रपती शिवरायांवर गोदूची जिवापाड भक्ती होती. आभाळातला सूर्य, चंद्र आणि शिवाजीराजा ह्या तिन्ही गोष्टी तिला प्राणापलीकडे प्रिय होत्या.

काही वर्षांमागे ती बिरवाडीला आपल्या नातेवाईकांकडे राहायला गेली होती. एकदा सायंकाळी पाहुण्यांच्या अंगणात शिळोप्याच्या गप्पा चालल्या होत्या. तेव्हा अचानक एक भयंकर खबर येऊन पोचली होती. पुण्याजवळचा कोंढाणा किल्ला सर करता करता सरदार तानाजी मालुसरे धारातीर्थी पतन पावले होते. शिवरायांनी गड कमावला होता, पण सिंह गमावला होता! या भयंकर बातमीने सर्वांच्या काळजाचा टवकाच उडवला होता! जसे ते वृत्त आजूबाजूच्या वाड्यावस्त्यांमध्ये पसरले, तसा सर्वत्र हलकल्लोळ माजला.

परकरपोलक्यातील गोदू आपले इवलेसे कान देऊन ऐकत होती,

''तानाजी बहाद्दराचा मुडदा पालखीत घातलाय. पालखी इकडंच उंबरठला यायला निघालीय. पालखीला स्वत: शिवाजीराजांनी खांदा दिलाय.''

चर्चा चालू असतानाच काही उत्साही पोरे उठली. त्यांनी पालखीला सामोरे जायचा निर्णय घेतला. तसा पोरांचा तो जथा वानरांसारखा उड्या मारत दरीखोरी ओलांडत मधल्या वाटेनेच जंगलातून कोंढाण्याकडे धावू लागला. जंगलराने तुडवणाऱ्या पोरांना तासाभराने लक्षात आले, त्यांच्यामागे जाळ्या खसखसत होत्या. कोणीतरी हरणीच्या चालीने त्यांच्या पाठोपाठ धावत येत होते. मुले थांबली. पाठीमागे वळून पाहू लागली. आठ वर्षांची इवलीशी गोदू त्यांच्या मागोमाग पळत येत होती.

ती अविस्मरणीय मिरवणूक गोदू कधीही विसरणार नव्हती. एखाद्या बळकट किल्ल्याचा बेलाग बुरूज ढासळून पडावा, तसा तानाजी नावाचा शिवरायांचा हातच निखळून पडला होता. शिवरायांच्या तेज:पुंज चर्येवरची सुतकी कळा पाहवत नव्हती. वाटेतल्या गावांतून लोक झुंडीने गोळा व्हायचे. पालखी थांबवली जायची. तानाजीच्या मुखावरचा शेला बाजूला केला की, त्यांची फुलासारखी कोमेजून गेलेली चर्या दिसायची, अन् शिवाजीराजांसारखा धैर्यवान महापुरुषही हेलावून जायचा. पालखीसोबत निघालेला दोनतीन हजार लोकांचा नदीच्या पाण्यासारखा घोंगावत जाणारा तो लोंढा, ते अतीव दु:ख, बलिदानाच्या भावनेने फुरफुरलेले ते बाहू, गोदूचे ठेचकाळलेले पाय - त्या ठणकत्या वेदना गोदूच्या मन:पटलावरून आजपावेस्तोवर नाहीशा झाल्या नव्हत्या.

अर्धी रात्र सरूनही नवरा बिछान्याकडे माघारी वळला नव्हता. शंकाकुशंकांच्या लाल मुंग्या तिचा मेंदू बधिर करू लागल्या. असली कसली म्हणायची ही खलबतं?

गोदू पुन्हा उठली आणि दाराच्या तोंडाशी येऊन उभी राहिली. मघाची ती बैठक

सरली नव्हतीच. उलट थंडीच्या महिन्यात शेकोटीची धग घ्यायला मंडळी दाटीवाटीने गोलाकार बसावीत, तसे सारे एकदुसऱ्याला खेटून बसलेले. संवादांना कुजबुजीचे स्वरूप आले होते. श्वासोच्छ्वासांना कट-कारस्थानाची धार चढली होती. गोदूचा सासरा त्र्यंबकराव खदखदा हसला. आपले घारे डोळे गोलाकार फिरवत उपहासाने बोलला,

''बस्स, फक्त उद्याचीच दुपार व्हायचा अवकाश. उद्याची रायगडावरची रंगपंचमी भोसल्यांच्या कुळीसाठी शिमगा ठरणार आहे. कोळ्यानं जाळं पेरावं, तसे जागोजागी निधड्या छातीचे चाळीस धारकरी पेरलेत. सकाळी नऊच्या प्रहराला त्या शिवाजीची अंबारी होळीच्या माळाजवळ सरकायचा अवकाश, वाघदरवाजाच्या वाटेवरची तोफ मशालीने शिलगावली जाईल. रंगाच्या फकी उडवू आणि त्याच्या आडोशानं त्या मग्रूर शिवा भोसलेचा कायमचा काटा काढू.''

''आणि काही घोटाळा झाला तर?'' आवंढा गिळत निवासरावाने विचारले.

''बहादूरगडाच्या तळावर जाऊन आम्ही खानसाहेबांशी कटाचं सारं बोलणं केलं आहे. सणाच्या निमित्तानं बारा कट्टर लढवय्ये वीर आधीच रायगडावर जाऊन पोचलेत. एकदा शिवाजी संपला अशी खुणेची तोफ उडायचा अवकाश, बाजूच्या झाडीतल्या मोगली तोफा, पथकं सुसाट बाहेर पडतील. रायगडासकट मराठ्यांचं नाक कापून टाकतील.'' कटाची ती वीण उलगडून सांगताना त्र्यंबकरावचे डोळे भलतेच भेसूर दिसत होते. त्याच्या आत्मविश्वासाने समोरचे ते अपरिचित पाहुणेही चेकाळून गेले होते.

त्र्यंबकरावाने अंगावरचे उपरणे खुशीनं झटकले. आपल्या लांब शेंडीला पीळदार गाठ मारली. अन् समोरच्या अंधाराकडे तो विजयी मुद्रेने पाहू लागला.

गोदूच्या घशाला कोरड पडली होती. त्या भयंकर कटाच्या कल्पनेनेच तिचा जीव कोंडला. तिला आपल्याच श्वासाची भीती वाटू लागली, म्हणून तिने पदराचा बोळा करून तोंडात घातला आणि ती परसदाराकडे धावली.

बाहेरचं भिरभिरं वारं तिच्या मेंदूमध्ये घुसलं. तिच्या पावलांना विलक्षण गती प्राप्त झाली. तिने पागेतल्या खुंटावळ्यावरचं जिनसामान काढलं आणि साठसत्तर घोड्यांच्या पागेतून पाखऱ्या नावाचा बळीच्या पंखासारखा फुरफुरता घोडा निवडला. झटकन घोड्यावर उडी ठोकून तिने कचकन टाच मारून लगाम मागे खेचला, अन् रात्रीच्या थंडीवाऱ्यातून, अंधाराच्या डोहातून तिचा घोडा रायगडाच्या दिशेने झेप घेऊ लागला.

गोदू जशी काही वाऱ्याच्याच पाठीवर स्वार झाली होती. वाटेतल्या झाडांची, ओढ्याओघळींची, कशाकशाची तिला आता पर्वा नव्हती. रिकिबीमध्ये पाय रुतवून, पालथे पडून पाठीची कमान करीत ती रिकिबीतच अर्धीमुर्धी उभी राहत होती. ''चल, पळ मर्दा! घे बिगी बिगी धाव,'' असे ओरडत होती. घोड्याच्या तोंडाला फेस येत

होता. त्याचे तुषार तिच्या मुखावर उमटत होते.

बघता बघता गोदू पाचाडच्या वेशीपाशी जाऊन पोहोचली. आता पहाट सरत होती. डोंगरकडे, सुळके, गडावरच्या माच्या, हिरकणीचा बुरूज अन पल्याडचा कोकण दिव्याचा उंच कडा - साऱ्या डोंगररांगा आणि कातीव कडे अंधारातून डोकं बाहेर काढू लागले होते.

पाचाड पाठीमागं पडलं. घोडा समोरची तिरपी चढण वेगाने चढू लागला.

अन् उजाडता उजाडता गोदूच्या डोळ्यांपुढे चितदरवाजाची कमान उभी राहिली.

''बापू, मघाशी आपल्या वाड्यामागं कुणाच्या तरी जनावराची पावलं वाजल्यासारखा आवाज आला होता बघा,'' निवासरावने आंदेशा बोलून दाखवली.

तिघेही गांगरले. शंकेची इंगळी काळजाला डसली. वाडकरांच्या वाड्यामध्ये गडबड उडाली. बैठकीतून सर्वजण पटापट उठले. वाड्याच्या पाठीमागं धावले. तर पाठचा दरवाजा उघडा होता. पागेचेही दार सताड मोकळे अन् आश्चर्य म्हणजे पाखऱ्या नावाचा सर्वात चपळ आणि तगडा घोडाच जागेवर नव्हता. सळसळत्या पिंपळाच्या बुडाखाली सर्वजण घाबरून उभे होते.

इतक्यात निवासरावची म्हातारी आई तिथे पोचली. घरातून आपली सूनबाई कुठे गडप झाली आहे असं विचारू लागली. आता मात्र त्र्यंबकराव वैतागून मनगट चावू लागला. कसली म्हणायची ही भानामती? पागेत घोडा नाही. घरात सून नाही. तितक्यात मोठ्याने भोकाड पसरत निवासराव आतून बाहेर आला,

''बापू, घात झाला घात. पळाली. तुमची सून पळाली.''

''म्हणजे रे?''

''मी शपथ घेऊन सांगतो — ती छिनाल रंडीच शिवाजीची भगत आहे. ती घोडा घेऊन रायगडाकडे धावली असणार – आपलं बिंग फोडायला!''

बापलेकांचे चेहरे खर्रकन् उतरले होते. आखूड दाढीची आणि भेसूर तोंडाची ती पाहुणेमंडळीही घाबरून गेली होती. एका पाठोपाठ एक अशी पाचसहा घोडी पागेतून बाहेर पडली. सारेजण वाऱ्याच्या वेगाने रायगडाकडे धाव घेत होते. काय वाटेल ते करून गोदूला वाटेतच रोखायचे होते. तरच पुढची बला टळणार होती.

सारेजण रायगडाच्या दिशेने त्वेषाने घोडी दामटीत होते.

एकदाची चितदरवाजाची पाषाणी कमान दिसली आणि धाप लागलेल्या गोदूने जागीच घोडा रोखला. ती स्वत: घामाने डबडबून गेली होतीच. पण तिच्या मांडीखालचा घोडाही दमून गेला होता. त्याच्या तोंडातून लाळेचा लोळ वाहत होता. त्याचवेळी हातातल्या भाल्याच्या काठीचा आधार घेत गोदू उठली. तिने डोंबाऱ्याच्या

पोरासारखी काठी धरून पुढच्या बाजूला उडी ठोकली. एक क्षणही न दवडता ती बाणासारखी दरवाजाकडे धावली. दारावर जोरजोरात धक्के देत ती मोठमोठ्याने आरोळ्या देऊ लागली, ''अरे, घात झाला घात! दार उघडा दार!''

तिचा चिरका आवाज अंधाराचं काळीज कापीत गेला. रात्रभर जागलेले दोनतीन पहारेकरी कमानीच्या टोकावर आले. दिवट्यांच्या लाल प्रकाशात त्यांनी खाली उभ्या असलेल्या गोदूकडे रोखून पाहिले. तिच्या झिपऱ्या वाऱ्याला लागल्या होत्या. विस्कटलेले ध्यान कोणाशी तरी हातघाई करून आल्यासारखे दिसत होते. घाणेरीच्या झुडपाने चेहरा ओरखडलेला. अंगावरचे लुगडेही फाटलेले. ती बेंबीच्या देठापासून ओरडत, कळवळून बोलली, ''पहारेकरी दादा, दरवाजा उघडा हो दरवाजा. मला राजांना तातडीनं भेटायचंय. अगदी आत्ताच्या आता!''

''कोण, कुठली गं तू? तुला शिवाजीराजांचा कायदा माहीत नाही का?''

''पण दादा — ?''

''किल्लेदार सकाळी सातप्रहरालाच किल्ल्यांचा जुडगा घेऊन इथं येतील. तेव्हाच दरवाजा उघडेल. तोवर नाही,'' वरून पहारेकऱ्याचा राकट आवाज आला.

''पण तोवर घात होईल हो घात. राजांच्या जिवाला धोका आहे. दया करा. मला आत सोडा हो!''

पहारेकरी हसले. रात्रीबेरात्री असे अनेक वेडेखुळे जीव आणि भुतंखेतं दरवाजाच्या आजूबाजूला फिरत असतात म्हणे!

गोदू मात्र वेडीपिशी झाली होती. काहीही करून ही भयंकर बातमी तिला तात्काळ गडावर पोचवायची होती. तिने खूप आर्जवे केली. ती ओरडली. किंचाळली. विनवण्या करून कंटाळली. आता इथे थांबून वेळ गमावण्यात हशील नव्हते.

ती तेथून हळूच बाजूला झाली. करवंदीच्या जाळ्यांतून चितदरवाजाच्या पश्चिमेला ती भूतासारखी पुढे सरकू लागली. आईच्या मांडीवर असल्यापासून ती बहादूर हिरकणी गवळणीची गोष्ट ऐकत आली होती. एकदा सायंकाळच्या तोफेबरोबर गडाचे दरवाजे बंद झाले. त्यामुळे वर दूधाचा विक्रा करायला आलेली हिरकणी गवळण अडकून पडली. किल्ल्याच्या तळाशीच तिची वाडी होती. तिचे दूधपिते लेकरू घरात एकटे होते. आपल्या लेकराला स्तनपान करण्यासाठी एका आईचा जीव आसुसला होता. त्याच बेहोषीत रात्रीच्या अंधारात ती किल्ल्याचा कातीव कडा उतरून धाडसानं खाली गेली होती. लेकराच्या भुकेसाठी एका आईने आपला जीव धोक्यात घातला होता. आता इथे एका पराक्रमी महायोद्ध्याचा जीव धोक्यात होता. ज्याच्या अस्तित्वाने दगडाधोंड्यांच्या या माळरानाला स्वराज्याचा शेंदूर फासला गेला होता. गावागावातले आणि रानातलेही लांडगे हटले होते. गोरगरिबांच्या लेकीबाळींची अब्रू वाचली होती. ज्याच्यामुळे देवळांत देव राहिले होते आणि डोईवरच्या शेंड्या

वाचल्या होत्या. त्याच त्या मराठ्यांच्या पंचप्राणाचा — शिवाजीराजांचा जीव धोक्यात होता. त्यासाठी नक्कीच काही तरी करायला हवं होतं.

कोंढाणा सर करणाऱ्या तानाजीच्या यशवंती घोरपडीसारखा गोदूचा जीव तळमळू लागला. ती जाळ्या, झाडेझुडपे पालथी घालत होती आणि वर चढून जाण्यासाठी एखादी वाट, चोरवाट आहे का त्याचा शोध घेत होती. पण तिला तसा जास्त वेळ दवडावा लागला नाही. पावसाळ्यात किल्ल्यावरून धो धो वाहणारे पाणी बाहेर काढण्यासाठी पुसाटीच्या एका बुरुजाला एक दोनतीन मनगटाएवढे भोक रिकामे सोडण्यात आले होते. मागचा पुढचा विचार न करता गोदूने आपली मुंडी त्या भोकामध्ये घातली. अन उभ्या कातळांना कोपराच्या ढुसण्या देत ती वर सरकू लागली. त्या धडपडीत तिचे अंग अनेक ठिकाणी सोलपटून गेले. अंगावरचे लुगडे जागोजाग फाटले. जीव कोंदटला. श्वास गुदमरला. परंतु शिवरायांचे आणि आईभवानीचे नाव घेत एकदाची ती वर चढून गेली.

रायगडावरचा अंधार नाहीसा होऊ लागला. पहाटेपासूनच रंगपंचमीची तयारी सुरू होती. किल्ल्यावरचे राजरस्ते फुलमाळांनी, झिरमुळ्या-तोरणांनी सजविले गेले होते. शिवाजीराजांच्या प्रासादापुढे सनईचौघडा वाजत होता. झुली आणि पाखरा चढवून हत्ती सजवले जात होते. फकीर, गोसावी, लहान मुलेबाळे सारेच नवे, रंगीबेरंगी कपडे घालून इकडे तिकडे हुंदडू लागले होते. कमरेला तलवार खोचलेले आणि हातामध्ये भाले-बरच्या घेतलेले पहारेकरी महाराजांच्या दरवाजावर खडा पहारा देत होते.

तितक्यात बेभान झालेली गोदू तिथे धावत आली. पहारेकऱ्यांच्या हातापाया पडत त्यांना विनवू लागली, ''मला महाराजांना भेटू द्या हो.... महाराजांना भेटू द्या.''

गोदू पुन:पुन्हा विनवू लागली. अनेकवेळा सांगूनही ती मागे हटेना. तेव्हा पहारेकरी तिच्यावर कडाडले, ''कशासाठी, कशासाठी भेटायचंय तुला महाराजांना?''

इतक्यात पलीकडून घोड्यांच्या टापांचे जोरदार आवाज आले. सर्जा नावाच्या उंच पाठीच्या आणि आभाळी रंगाच्या घोड्यावर एक अत्यंत देखणा राजकुमार बसला होता. त्याच्या जिरेटोपावर पाचूंच्या माळा रूळत होत्या. त्याचा रंग फिकट तांबूस, रुंद कपाळ, गरुडाच्या नाकासारखी नाकसरी, गडद काळे डोळे— एकूणच त्याचे व्यक्तिमत्त्व कोणाच्याही डोळ्यांत सहज भरणारे होते. रेशमी केसांची त्याची कोवळी कातीव दाढी, पल्लेदार मिशा आणि खांद्यावर रुळणारे मुलायम केस त्याच्या उपजत सौंदर्यात भर घालत होते.

तो उमदा वीर घोडा उडवत तेथे येऊन पोचला. त्या बरोबर, ''शंभूराजे ऽऽ संभाजीराजे'' अशी कुजबुज वाढली. शंभूराजांच्या पाठोपाठ घोळदार जामानिम्यातले जोत्याजी केसरकर, कवी कलश, जगदेवराव असे राजांचे उमदे सहकारी घोडा

फेकत तेथे येऊन पोचले. त्यांच्या सोबतीनेच महार जातीचा रायाप्पा नाक चालला होता. त्याच्या डोक्यावर जिरेटोप वा पीळदार मराठी पगडी नव्हती तर एक साधेच मुंडासे आणि अंगात घोंगडीच्या वस्त्रापासून बनवलेली काचोळी होती. तो दिसायला काळपट, उग्र, राकट मिशांचा आणि भेदक डोळ्यांचा शेतकरीच होता, पण तो आपला घोडा शंभूराजांच्या आणि कवी कलशांच्या सोबतच हाकत होता.

रंगपंचमीच्या दिवशी तसे युवराज शंभूराजे नेहमी खुशाल आणि काहीसे स्वच्छंदी दिसत. मात्र आज त्यांच्या चर्येवर रात्रभराचे जाग्रण दिसत होते. डोळे ससाण्यासारखे काही तरी शोधत होते. त्यांचे सोबतीसुद्धा मध्यानरात्रीनंतर युवराजांच्या बरोबर भवानी कड्याच्या आणि टकमक टोकाच्या अंगाने दौड करून आले होते. सणाच्या मुहूर्तावर गडावर काही तरी गडबड होणार असल्याचा युवराजांना वास लागला होता. त्यामुळेच त्यांचे मूळचे पाणीदार, जागृत, पण आता काहीसे तारवटलेले डोळे चौफेर फिरत होते.

गोदू पहारेकऱ्यांना ''राजांच्या जिवाला धोका आहे–'' असे कळवळून सांगत होती. तेवढ्यात शंभूराजांचा फुरफुरता घोडा तेथे समोर येऊन थांबला. वस्त्रे फाटलेल्या, गोंधळलेल्या स्थितीमध्ये उभ्या असलेल्या गोदूकडे युवराजांनी बघितले. शंभूराजांना समोर पाहताच गोदू त्यांच्याकडे भिंगरीसारखी धावली. ती ओरडली, ''युवराज ऽ युवराजऽऽ आपल्या राजांच्या जिवाला धोका आहे! राजांच्या जिवाला धोकाऽऽ—''

शंभूराजांनी जोत्याजी आणि रायाप्पाला हळूच सांगितले,

''सर्वांपुढं वाच्यता नको. चला ऽ घ्या सोबत ह्या बाईला.''

शंभूराजांचा घोडा आपल्या महालाकडे उधळला. पाठोपाठ गोदूला घेऊन त्यांचे सहकारी वाड्याकडे त्वरेने गेले. आतल्या आपल्या खाजगी सदरेवर शंभूराजांनी चौकशीला सुरुवात केली. गोदूने आपल्या सासऱ्याच्या आणि नवऱ्याच्या पापाचा पाढा वाचला. शंभूराजांना प्रथमदर्शनी तिच्या बोलण्यात सत्यांश दिसला. सदरेवरची गडबड ऐकून तोवर येसूबाईही तेथे येऊन दाखल झाल्या होत्या.

गोदूचे कथन ऐकून युवराज कवी कलशांना बोलले, ''आता पटली नं खात्री कविराज? ह्या पंचमीला काही तरी घडणार याची आम्हांला खात्री होतीच!''

''आपण वेळेत दक्ष राहिलात हे खूप चांगलं झालं. पण राजन, गडावरचे सर्व पहारे-चौक्या तपासून झाल्या. आता कोणताही धोका नाही दिसत.''

''—असं म्हणून चालणार नाही, कविराज. आमचे आबासाहेब सांगतात तशी अखंड सावधानता हवी. चलाऽ, आपण सर्वजण आपापल्या मोर्च्यावर चला. आणि कविराज, ते वाडकर पितापुत्र इथं कुठं आढळले, तर त्यांना तात्काळ कैद करा. हवं तर त्यांच्या गावावर माणसं पाठवा. पण आजच त्यांना जेरबंद करा!''

''जशी आज्ञा, राजन–'' असे म्हणत आपली पाठ न दाखवता, मुजरा करत

युवराजांचे सर्व सहकारी लागलीच कामगिरीवर बाहेर पडले.

अतिशय घाबरून गेलेल्या, थरथरत उभ्या असलेल्या गोदूकडे युवराजांनी एक नजर टाकली. त्यांनी येसूबाईंना सांगितले, ''हिला ल्यायला चांगली वस्त्रं द्या. आम्हांला वाटतं रायगडावर येणारी मोठी बिलामत हिच्यामुळे टळली. तिचा जीव धोक्यात येऊ शकतो. ह्या गोदूला आपण संरक्षण द्या.''

युवराज तातडीने स्नानगृहाकडे वळले. पूजाअर्चा आटोपून त्यांना त्वरेने बाहेर पडायचे होते.

आता रायगडावर लख्ख उजाडले होते. जागोजाग लेझिमवाली पोरे आणि दांडपट्टा खेळणारे खेळगडी घोळक्याने गोळा होऊ लागले होते. सनईचौघडा, फुलांची आरास, रांगोळ्या, इकडेतिकडे उधळणारे तरुण अशी शिवरायांच्या राजप्रासादासमोर उत्सवाला बहार आली होती. तितक्यात अतिशय घाबरून गेलेले त्र्यंबकराव आणि निवासराव तेथे येऊन पोचले. आपल्याआधी जर गोदू महाराजांना जाऊन भिडली आणि आपले बिंग फुटले तर आपणाला कडेलोटाशिवाय अन्य शिक्षा मिळणार नाही, याची बापलेकांना पुरती कल्पना होती.

त्र्यंबकराव एका पहारेकऱ्याला दबक्या आवाजात विचारू लागला, ''नारिंगी लुगड्यातली, खडीची चोळी घातलेली एक तरणीताठी बाई इकडं आलेली बघितलीत?''

''व्हय व्हय, मघाशी एक बया इथं आली होती. पण मघाशीच तिला घेऊन शंभूराजे गेले आपल्या वाड्याकडं.''

ती गोष्ट ऐकून वाडकर पितापुत्र काहीसे बावरले. पण लगेच सावरलेसुद्धा. गोदूने आपल्या विरुद्ध कांगावा करण्याआधी तिलाच बदनाम करायची, ही नामी संधी चालून आली होती! आपल्या गळ्यामध्ये पडणारी पेटत्या फटाक्यांची माळ काढून ती बेसावध युवराजांच्या गळ्यामध्ये घालायची. बायाबापड्यांच्या नावे शंभूराजांना बदनाम करायची कारस्थाने आधी चालूच होती. त्यात गोदूचेही प्रकरण खपवू. अंगावर आलेले भयंकर संकट कसे का होईना, टळले म्हणजे चांगले!

ते दोघेही पितापुत्र शंभूराजांच्या वाड्याकडे धावले. मात्र प्रत्यक्ष तिथे पोचल्यावर भितीने त्यांचे पाय लटपटू लागले. दोघांनी एकमेकांना चेतवायचा प्रयत्न केला. पण सिंहाच्या गुहेत शिरून त्याला ललकारण्याची हिंमत त्या दोघांमध्येही नव्हती. घाबरलेल्या बापलेकांनी घोडी तशीच पुन्हा महाराजांच्या राजप्रासादाकडे वळवली.

आज पंचमीच्या मिरवणुकीत सामील होण्यासाठी राजांच्या वाड्यापुढे तोबा गर्दी गोळा झाली होती. पंचक्रोशीतले सारे हौसे, गौसे आणि नवसे तिथे जमले होते.

थोड्याच वेळात महाराज पालखीतून जगदीश्वराच्या मंदिराकडे मिरवणुकीने निघणार होते. तितक्यात त्र्यंबकरावाने तोंडावर पालथी मूठ ठेवली अन् ठो ठो बोंब

मारत तो ओरडू लागला, ''पळवली, पळवली हो — युवराजांनी गरिबाची सून पळवली.''

''आता मी बिना बायकोचा कुठं जाऊ? गणगोताला तोंड कसं दाखवू?'' आपल्याच हाताने आपले थोबाड फोडत निवासराव मोठ्याने रडू लागला.

तिथे जमलेले बघे आणि मानकरीसुद्धा चक्रावले. प्रत्यक्ष छत्रपती शिवरायांच्या ज्येष्ठ पुत्रावर असा कोणी किटाळ घ्यावा, उद्याच्या राजगादीच्या धन्यावर अशी उघड चिखलफेक करावी, तीही महाराजांच्या राजप्रासादासमोर? अवतीभवती गर्दी वाढली, तसे त्र्यंबकराव आणि निवासराव यांनी मोठ्याने भोकांड पसरले. आपल्याच श्रीमुखात भडकावत त्र्यंबकराव गरजला, ''लोकहो, न्यायाच्याच घरी असा अन्याय घडणार असेल, तर आम्ही गरिबांनी कुठं जायचं? थोरामोठ्यांच्या नजरा पडतील म्हणून काय आमच्या लेकीसुनांची खांडोळी करायची?''

''ये थेरड्या, तुला काय तोफेच्या तोंडी जायचं आहे का?'' एक शिलेदार पुढे होऊन विचारू लागला.

''तुझ्याकडं पुरावा काय?'' दुसऱ्याने विचारले.

''उलट मलाच कसला पुरावा विचारता? जा, जा त्या युवराजांच्या वाड्याकडं. उघडा दरवाजा आणि बघा तुमच्या डोळ्यांनी – कशी कोंडलीय तिथं माझ्या सुनेला! हाय रे दैवा, आता कुठे जाऊ!''

डोक्यावरचे मुंडासे काढून त्र्यंबकराव गळे काढू लागला.

''पण हे घडलं तरी कसं?'' बघे विचारू लागले.

''मी सांगतो की!'' हातवारे करत निवासराव बोलला, ''चार दिवसांमागे युवराज शिकारीला चालले होते. तिथे पाणवठ्यावर ह्या गरिबाच्या बायकोवर शंभूराजांची नजर पडायचं निमित्त झालं — अन् आज — रायगडावरून लष्कराचं एक पथकच आमच्या घरावर चालून आलं. शंभूराजांच्या त्या दुष्ट धटिंगणांनी तिला अक्षरश: ओढून आणली हो....''

''अरे, युवराजांचे रंगमहाल रंगवा, अन् आम्हा गरिबांच्या अब्रूचे धिंडवडे काढा रे ऽ ऽ'' त्र्यंबकराव मोठमोठ्याने ओरडत होता.

थोड्याच वेळात गर्दीच्या मागे एकाएकी हालचाल झाली. एक खासी पालखी घेऊन भोई तेथे धावत आले. शिवाजीराजांच्या अष्टप्रधानांपैकी एक न्यायाधीश प्रल्हाद निराजी पालखीतून खाली उतरले. त्याच वेळी वाडकर पितापुत्रांचा तमाशा तिथे सुरू होता. त म्हणताच ताकभात ओळखणाऱ्या प्रल्हाद निराजींच्या ध्यानात तो सर्व प्रकार आला. त्यांनाही खूप खेद वाटला. नेमका सणादिवशीच हा असा गलिच्छ प्रकार युवराजांकडून घडावा? करोडो होनांचं राज्य उभारणाऱ्या शिवाजीराजांच्या पदरी ही बदनामी यावी?

कपाळाचा घाम टिपत प्रल्हादपंत तडक आत सदरेवर गेले. महाराजांना मुजरा करायचा रोजचा शिरस्ताही त्यांनी सांभाळला नाही. त्यांनी बाहेरचा तो अश्लाघ्य प्रकार लागलीच महाराजांच्या कानावर घातला. तेवढ्यात हिंदवी स्वराज्यातील विद्वान न्यायाधीश काझी मुल्लासाहेबही सदरेवर येऊन पोचले. तेही घाबऱ्या नजरेने राजांकडे पाहू लागले. राजांनी तातडीने पुढची पावले टाकली. वाडकर पितापुत्रांना आत बोलावून घेतले. त्र्यंबकराव राजांच्या पायावर डोकं आपटीत अंगावर आभाळ कोसळल्यासारखाच ओरडत बोलला, ''महाराज, खुद्द युवराजांकडून अशी आगळीक घडणार असेल तर आम्ही जगायचं तरी कसं? तिकडं मोगलाईत रस्त्यावर दिसेल त्या देखण्या बाईला जनानखान्यात खेचतात म्हणं. अन इथं?''

''खामोश ऽ ऽ'' राजे तारस्वरात कडाडले. ''त्र्यंबकराव, आपली जीभ आवरा. खूप बोलला आहात आपण.''

शिवाजीराजांची मुद्रा अतिशय गंभीर दिसू लागली. खरे तर पहाटेच देवपूजा आटोपून, उंची वस्त्रालंकार परिधान करून शिवाजीराजे पंचमीच्या सोहळ्यासाठी बाहेर पडायच्या विचारात होते. मात्र आज सणासुदीचा मुहूर्त साधून अंगावर रंगाऐवजी बेअब्रूचा बुक्का उडवला जाईल याची त्यांना बिलकूल कल्पना नव्हती. शंभूराजांच्या सावत्रमाता पुतळाबाई सणाच्या निमित्ताने पायथ्याचा पाचाडचा वाडा सोडून गडावर आल्या होत्या. त्यांनी पोलादपूरच्या सराफकट्ट्यावरून एक खास रत्नकंठा घडवून आणला होता. होळीच्या निमित्तानं आपल्या लाडक्या शंभूबाळांना त्यांना तो पेश करायचा होता. पण त्या अचानक उद्‌भवलेल्या प्रकाराने पुतळाबाई मांसाहेबही दिङ्मूढ होऊन गेल्या होत्या.

थोरल्या महाराजांसोबत देवपूजेसाठी सोयराबाई बाहेर पडणार होत्या. गळ्यामध्ये रत्नमाळा, सोन्याचा कमरदाब लेवून, खांद्यावर भर्जरी शाल पांघरून त्या तयारीनेच उभ्या होत्या. पण ह्या अचानक उद्‌भवलेल्या प्रकाराने त्याही अचंबित झाल्या. आपल्या मुद्रेवरचा भाव कोणाला दिसू नये ह्याचा त्या कसोशीने प्रयत्न करीत होत्या. परंतु शंभूराजांच्या अब्रूचे निघत असलेले धिंडवडे पाहून नकळत त्यांच्या खानदानी चर्येवर एक छद्मीपणाची रेघ उमटत होती. मात्र युवराजांवरील त्या किटाळाने शिवरायांइतकेच पुतळाबाईंचे काळीजही आतल्या आत तुटत होते.

काही महिन्यामागे अण्णाजी दत्तोंची कन्या हंसा आणि युवराज शंभूराजांच्या संबंधाबाबत अशाच वावड्या उठल्या होत्या. शंभूराजांबाबत असे का घडावे, सणासुदीच्या मंगल दिवशी नाचक्कीचा असा प्रसंग का ओढवावा, याचेच महाराजांना वैषम्य वाटत होते. औरंगजेबासह मोठमोठ्या शत्रूंसमोर ताठ उभी राहणारी त्यांची गर्दन आज शरमेने खाली झुकली होती. मात्र त्यांच्यातल्या जाणत्या राजाने मनातल्या मनात भावनेच्या पुराला तुंबा घातला. युवराजांबद्दलचे काळजातले मायेचे सारे झरे

आटल्यासारखे झाले. कर्तव्याचा राजदंड त्यांनी आपल्या हाती घट्ट पकडला होता. ते शांत, धिम्या पण धारदार शब्दांत इतकेच बोलले,

"हे पाहा त्र्यंबकराव, बाहेरचा पालखी सोहळा उरकू दे. तोवर आपण निश्चिंत मनानं इथंच बसून राहा. गुन्हेगार कितीही मोठा असला तरी त्याची चौकशी होईल. निश्चित होईल. तुम्हांला न्याय मिळेल."

बाहेर पडणाऱ्या राजांची पावले अडखळली. त्यांनी काझी मुल्लासाहेबांना जवळ बोलावले. त्यांच्या पिकल्या, लांब, रुळदार दाढीवर राजांचा खूप भरवसा होता. राज्यातले एक नेक न्यायाधीश म्हणून मुल्लासाहेब मुसलमानी रयतेपेक्षाही मराठ्यांमध्ये अधिक प्रिय होते. राजांनी त्यांना काही सूचना दिल्या. मुल्लासाहेबांनी राजांना आदराने कुर्निसात केला. ते पुढच्या कामगिरीसाठी तातडीने बाहेर निघून गेले.

राजदरबारातून बाहेर पडता पडता पुतळाबाईंनी शंभूराजांच्या महालाकडे नजर टाकली तेव्हा त्यांच्या डोळ्यांतून उष्ण अश्रू ओघळले. ❐




**नवे कोरे**

# क्रिटिकल

**डॉ. रॉबिन कुक**

अनुवाद **डॉ प्रमोद जोगळेकर**

**रु. ३६०/-**सभासदांना सवलतीत

मार्च-एप्रिल २००७ मधल्या एका आठवड्यात एकमेकांना अजिबात न ओळखणाऱ्या तीन माणसांच्या आरोग्याच्या संदर्भात सर्वस्वी अनपेक्षित अशा घटना घडल्या. ह्या घटनांमध्ये दोघांचा जीव गेला अनेक लोकांच्या जीवनांवर गंभीर परिणाम झाले.

या घटनांमध्ये बळी पडलेल्या लोकांना असं काही होणार, याची पुसटशीही कल्पना नव्हती. या तिघांमधला एक गोरा डॉक्टर होता. दुसरा आफ्रिकन-अमेरिकन कॉम्प्युटर प्रोग्रॅमर होता. तिसरा माणूस आशियाई वंशाचा होता. व्यवसायानं अकाउंटंट असणाऱ्या या तिसऱ्याची निर्घृण हत्या झाली होती.

**नवे कोरे**




# झॅपड्

मॅनहॅटनच्या ब्लॅकआउटमध्ये
घडलेली रहस्यकथा

**कॅरोल हिगिन्स क्लार्क**

अनुवाद **जयंत गुणे**

**रु. १४०/-**सभासदांना सवलतीत

लोकप्रिय अमेरिकन लेखिका कॅरोल हिगिन्स क्लार्क हिच्या रेगन रैली मालिकेतील 'झॅप्ड' ही एक उत्कंठावर्धक रहस्यकथा. लॉरेन लिली ही हॉलीवूडमध्ये पदार्पण करू पाहणारी एक नटी. न्यूयॉर्कच्या जे.एफ.के विमानतळावरून टॅक्सीतून मॅनहॅटनमधल्या तिच्या घरी परत येत असते. वाटेतच तिचा धनाढ्य नवरा फोन करून घटस्फोटाची नोटीस देत असल्याचे तिला सांगतो. तेवढ्यात न्यूयॉर्क शहराचा वीज पुरवठा खंडीत होतो आणि संपूर्ण शहर काळोखात बुडून जाते.

या काळोखात अनेक गोष्टी होत असतात. एका छोट्या जागेत 'स्टँड अप कॉमेडीचा शो' बघण्यासाठी वीकएन्डच्या निमित्ताने गर्दी झालेली असते.

दोन व्यक्ती लॉरेनच्या घराचे कुलूप तोडण्याच्या खटपटीत असतात.

एका निष्पाप तरुणाला आपल्या जाळ्यात फसवून जन्माची अद्दल घडवण्याच्या उद्देशाने एक तरुणी त्याच्या मागे हात धुवून लागलेली असते. सगळी तरुणाई नाक्यावरच्या बारमध्ये जमा होते. घरात बसून अंधारात दुसरे काहीच करण्यासारखे नसल्याने लोक चौकाचौकात जमून 'बार्बेक्यू पार्टी'

करत धमाल करत असतात.

ब्लॅकआउटच्या रात्री वरवर वेगवेगळ्या वाटणाऱ्या या घटनांची सांगड घालत लेखिकेने मोठ्या कौशल्याने एका उत्कंठावर्धक कथानकाची गुंफण केली आहे. कथानक न्यूयॉर्कच्या मॅनहॅटन या भागात घडते. जेथे दिवे दिवसासुद्धा चालू असतात त्या मॅनहॅटनवर आता अंधाराचे साम्राज्य पसरलेले असते. रात्र सरत जाते तसा गुंता सुटत जातो आणि हडसन नदीवर सूर्याचे प्रथम किरण पडता-पडता सर्व काही आलबेल होते आणि वाचक सुटकेचा नि:श्वास टाकतो.




# वाचनोपचार

## वाचनातून स्वत:वर उपचार करता येतात

मराठीत अनुवादित झालेलं 'लव्ह, मेडिसिन आणि मिरॅकल्स' हे पुस्तक नुकतच हाती पडलं. ते आधी इंग्रजीतही वाचलं होतं. ते मला अनुवादिका डॉ. शुभदा लोहिया यांनीच वाचायला दिलं होतं. त्याचं एक कारणही होतं.

मी चांगलाच आजारी पडलो होतो. पण त्या आजारपणातही मी चांगला होतो. आजारही चांगला होता- 'नॉट आदरवाईज स्पेसिफाईड पेरिफेरल टी सेल टाईप थ्री बी-नॉन हॉगकिन्स लिम्फोमा'- अर्थात लसिका ग्रंथींचा कर्करोग उपाख्य कॅन्सर. त्याचा तिसरा अंक सुरू झालेला. पहिले दोन अंक केव्हा संपले कळालंच नाही. कारण ते मी पाहिलेच नाही. पाहू पाहू अशा कुरबुरी कुरकुरी चालायच्याच- असं करत लांबणीवर टाकत गेलो.. तर हा असा लांबलचक आजार झालेला. पण ह्या लांबलचक आजारात लचक नसलेली. पण पडदा वर गेला तो तिसऱ्या अंकात. मात्र मी ठरवलं, हा अंक तिसरा असला तरी शेवटचा असणार नाही. शेवटी रंगमंच माझा आहे. आणि मी काही रंगमंचावरची कठपुतली नाही. आणि म्हणूनच मी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आवश्यक त्या डॉक्टरांकडे गेलो. सगळ्या डॉक्टरांवर माझी मनःपूर्वक श्रद्धा.

'श्रद्धा असेल तर आजारपणाविरुद्धचं युद्ध जिंकता येतं' ही गीता मला एका दवाखान्याच्या दारातच सुचली. त्याच श्रद्धेनं मी एका डॉक्टरांना म्हणालो होतो, ''काळजी करू नका डॉक्टर.'' माझं वाक्य ऐकून डॉक्टरांना झालेल्या आनंदानंही माझ्यावर उपचार सुरू केले.

असेच आनंददायी उपचार मला डॉ. शुभदा लोहिया ह्यांच्याकडंही मिळाले.

त्यांच्या रुग्णालयाचं 'सद्भाव' हे नाव तर रुग्णाला अर्ध बरं करणारं. शेक्सपीअरला अशी नावं माहित नसावीत. 'नावातसुद्धा सद्भावना असतात.' ह्या सद्भावानं मी 'सद्भाव' मध्ये भरती होतो. दि. १८.५.२०११ ला माझी किमोथेरपी सुरू होती. मी रुग्णालयातल्या कॉटवर निश्चिंत पडलेला. माझ्या सोबत असलेल्या सौ. कल्पनाचाही चेहरा निश्चिंत. तेवढ्यात डॉ. लोहिया मॅडम तिथं आल्या. आणि मला म्हणाल्या, ''सर, एक पुस्तक वाचायला देऊ? तुम्हांला आवडेल.''

आणि दि. १९.५.२०११ ला डॉक्टर लोहिया मॅडमनी मला पुस्तक दिलं.

बर्नी सिगेल (एम.डी) ह्यांनी इंग्रजीत लिहिलेलं 'लव्ह, मेडिसिन ॲण्ड मिरॅकल्स'. पुस्तकाचा तोंडवळा न्याहाळता न्याहाळता माझ्या लक्षात आलं, हा तर वाचनोपचार. म्हणजे केवळ उपचार म्हणून वाचन करायला नाही, तर वाचनातून स्वत:वर उपचार करायचे. पुस्तक उघडता उघडता मला पुस्तकाची एक नवीन व्याख्या सुचली, 'पुस्तकं डॉक्टरसुद्धा असतात.'

घरी पडल्यापडल्या दि. ३१.५.२०११ पर्यंत मी हे पुस्तक संपूर्ण वाचलं. नेहमीप्रमाणं ह्याही पुस्तकाशी माझी छान मैत्री जमली. बर्नी सिगेल ह्यांनी कॅन्सरच्या रुग्णांवर उपचार करता करता पुस्तक लिहिलेलं. उपचारांना घाबरत असलेल्या रुग्णांना सिगेल ह्यांनी आत्मविश्वास वाढवण्याचा सल्ला दिलेला. सिगेल ह्यांनी रुग्णांचा आत्मविश्वास वाढवण्याचा प्रयत्नही जाणीवपूर्वक केलेला. आणि उपचार घेत घेत रुग्ण ठणठणीत बरे झालेले.

कुसुमाग्रजांच्या त्या कवितेत 'प्रेम औषधावरही करावे' ही एक ओळ ॲड करायला हवी- पुस्तक वाचता वाचता माझी उमटलेली एक प्रतिक्रिया.

पुस्तक वाचताना मी आत्मविश्वासपूर्वक ठरवलं. आजारपण म्हणजे मृत्यूची निश्चिती नसतेच मुळी.

ह्या पुस्तकानं माझ्यावर केलेले उपचार आणि उपकार मी विसरणार नाही. मुळीच.

आज मी ठणठणीत बरा आहे. ह्या पुस्तकाचा डॉ. शुभदा लोहिया ह्यांनी केलेला मराठी अनुवाद 'लव्ह, मेडिसिन आणि मिरॅकल्स' ह्या प्रकाशित पुस्तकाच्या रूपानं माझ्या पुढ्यात आहे. माझी खात्री आहे, या अनुवादानं मला अधिक सुदृढ केलं आहे.

संतोष मोतीराम मुळावकर
समर्थनगर, अंबाजोगाई. जि. बीड ४३१५१७
०९४२२२४०३३८
santoshmulawkar@gmail.com




# लव्ह, मेडिसिन आणि मिरॅकल्स

मूळ लेखक
**बर्नी सिगेल, एम.डी.**

अनुवाद
**डॉ. शुभदा राठी लोहिया**

१९०रु. पोस्टेज २५रु.

बंधनमुक्त प्रेम हे प्रतिकारक्षमता वाढविणारे सर्वात शक्तिशाली प्रेरक प्रेम होय. प्रेमाने माणूस दुरुस्त होतो हे एक सत्य आहे. ज्या रुग्णांमध्ये प्रेम करण्याचे धैर्य असते व दुरुस्त होण्याच्या प्रक्रियेत तसेच त्यावर परिणाम व्हावा म्हणून डॉक्टरांसोबत काम करण्याचे धैर्य असते असे अपवादात्मक रुग्ण रोज एक नवीन आश्चर्य अनुभवतात.

उठा, त्वरा करा, नजीकच्या पुस्तकालयात जा व तुम्ही स्वत:ला आजारी अगर निरोगी कसे 'बनवता' याचे स्पष्टीकरण देणारे हे अद्भूत पुस्तक मिळवा... प्रत्येक कुटुंबामध्ये याची एक प्रत असायला हवी. हे जीवनदान देणारे पुस्तक आहे.

***—ॲन लॅन्डर्स.***

**आगामी**

# ट्रॅव्हलिंग टू इन्फिनिटी

## माय लाइफ विथ स्टीफन

**जेन हॉकिंग**

अनुवाद **सुदर्शन आठवले**




आजच्या युगातील नामवंत, गुणवंत, सुप्रसिद्ध वैज्ञानिकांच्या मालिकेतील एक वैशिष्ट्यपूर्ण नाव आहे, 'ब्रीफ हिस्ट्री ऑफ टाइम' या अडीच कोटी प्रतींच्या विक्रीचा विक्रम केलेल्या शास्त्रीय पुस्तकाचे लेखक, प्रोफेसर स्टीफन हॉकिंग. त्यांची पहिली पत्नी जेन हिने या पुस्तकात त्यांच्या असाधारण वैवाहिक जीवनाचे अंतरंग उलगडून दाखवले आहे. स्टीफन आपल्या बुद्धिबळावर गगनाला गवसणी घालत असताना 'मोटर-न्युरॉन' या मज्जासंस्थांच्या महाभयंकर रोगाचे प्राणघातक हल्ले मात्र त्याच्या शरीराला जखडून ठेवत होते. आपल्या विकलांग पतीची दिवस-रात्र, अष्टौप्रहर सेवा करणे आणि त्याच वेळी आपल्या वाढत्या कुटुंबाची काळजी वाहणे या दोन्ही कर्तव्यांचा समतोल राखण्यासाठी जेनने केलेले अथक परिश्रम, सोसलेले आघात यांचे तिने अतिशय प्रामाणिकपणे केलेले वर्णन; जे कुटुंब अशा प्रकारच्या रोगाशी सामना करीत असेल त्यांच्यासाठी अतिशय उपयोगी आणि त्यांचे मनोबल वाढविणारे, त्यांना स्फूर्ती देणारे ठरेल. पतीची असाधारण प्रज्ञा, प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत त्याने पादाक्रांत केलेली यशशिखरे आणि त्यासाठी त्याला जेनने स्वत:च्या आंतरिक शक्तीचा दिलेला बळकट आधार यांची ही कहाणी खरोखरच अविश्वसनीय वाटावी अशीच आहे. त्यातून ती अत्यंत निडर अशा प्रामाणिकपणे सांगितलेली आहे. त्यांच्या पंचवीस वर्षांच्या वैवाहिक जीवनाची क्लेशकारक अशा घटस्फोटात झालेली परिणती, त्याच्या सेवेतील एका नर्ससाठी स्टीफनने जेनला दिलेली सोडचिठ्ठी आणि जेनने एका जुन्या मित्राशी केलेला विवाह – या साऱ्याच प्रसंगातून लेखिकेच्या स्पष्टवक्तेपणाचा प्रत्यय येतो.

अपवादात्मक खुलेपणाने, आत्यंतिक प्रांजलपणाने लिहिलेल्या, मन हेलावून टाकणाऱ्या आणि तरीही जागोजागी नर्म विनोदाची पखरण करणाऱ्या या संस्मरणिकेत जेन हॉकिंग हिने तिच्या खूप गुंतागुंतीच्या, यातनामय वैवाहिक आयुष्यातील अवघड, कठीण प्रश्न, प्रसंग यांच्याशी धाडसाने, धीरोदात्तपणे केलेल्या सामन्याचे वर्णन तर आहेच, पण त्याबरोबरच समृद्धी आणि प्रसिद्धी यांच्या व्यापक परिणामांमुळे नात्यांच्या विणी कशा उसवतात, नात्यातल्या हळव्या जखमा कशा उकलतात हेही हळुवारपणे दाखवलेले आहे. त्यामुळे हे पुस्तक जगभरातल्या वाचकांना निरपेक्ष प्रेमाचे दर्शन घडवेल, त्यांच्या मनात आशा पालवेल, त्यांचे विचार बदलेल आणि त्यांच्या अंतरीच्या जवळचे वाटेल.




*** ज्येष्ठ साहित्यिक भा. द. खेर**

'क्रांतिफुले'तून भारताचे स्वातंत्र्य अबाधित राहण्याची प्रेरणा देणारे...'प्रबुद्ध'मधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे झुंजार जीवन, ज्ञानार्जनाची तळमळ आणि विषमतेविरुद्ध पुकारलेला लढा याची आठवण करून देणारे ज्येष्ठ साहित्यिक व पत्रकार भालचंद्र दत्तात्रय तथा भा. द. खेर (वय ९५) यांचे २१ जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

प्रकृतीअस्वास्थ्य आणि वयोमानामुळे गेल्या चार वर्षांपासून खेर अंथरुणाला खिळून होते. त्यांच्या पार्थिवावर वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे पत्नी, मुलगा, स्नुषा असा परिवार आहे.

वयाच्या सहाव्या वर्षी साहित्यिक होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या खेर यांनी विपुल लेखन केले. वाचकांशी चरित्रनायकाचा स्नेहभाव जुळविण्याची किमया खेर यांच्या लेखनात होती. वयाच्या ९० वर्षापर्यंत त्यांनी ११७ हून अधिक पुस्तके लिहिली. महापुरुषांच्या व्यक्तिमत्त्वाचा धागा पकडून त्यांच्या जीवनातील योग्य प्रसंग निवडून त्यांचे चरित्र वाचकांसमोर पुस्तकरूपाने त्यांनी उभे केले. इतकेच नव्हे तर, त्यातून प्रेरणाही दिली. म्हणूनच प्रसिद्ध साहित्यिक ना. सी. फडके यांनी 'चरित्रात्मक कादंबरीचे निर्माते' अशा शब्दांत खेर यांचा गौरव केला. त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. त्यात सोव्हिएत लॅण्ड, नेहरू ॲवॉर्ड, महाराष्ट्र राज्य पुरस्कार, न. चिं केळकर परस्कार, हरी नारायण आपटे पुरस्कार यांचा समावेश आहे. त्यांच्या 'प्रबुद्ध' कादंबरीला पी.व्ही. नरसिंहराव यांनी, तर 'हिरोशिमा', 'दि प्रिन्सेस' या कादंबऱ्यांना यशवंतराव चव्हाण यांनी प्रस्तावना लिहिली. लेखनानिमित्ताने भारत सरकारतर्फे १९६९ मध्ये त्यांनी रशिया दौरा केला. जर्मन सरकारच्या

निमंत्रणावरून सुभाषचंद्र बोस यांच्यावर कादंबरी लिहिण्यासाठी जर्मनीचा परवास केला. चर्चिल, चार्ली चॅप्लिन, सावरकरांवर लिहिण्यासाठी १९६९ मध्ये ते लंडनला गेले.

कर्जत येथे १२ जून १९१७ रोजी खेर यांचा जन्म झाला. १९३९ मध्ये ते बीए झाले. त्यानंतर दोन वर्षे कायद्याचा अभ्यास केला. यात 'करिअर' न करता ते साहित्य - पत्रकारितेकडे वळले. ते २२ वर्षे ऽकेसरी'चे सहसंपादक होते. 'सह्याद्री' मासिकात दहा वर्षे संपादक होते. मराठी शब्दकोशाच्या संपादक मंडळावर पाच वर्षे होते. आकाशवाणी व पुणे विद्यापीठाच्या बहि:शाल शिक्षण मंडळात वक्ते म्हणून काही वर्षे होते.

* **मेहंदी हसन**

'पत्ता पत्ता, बूटा बूटा', 'अब के हम बिछडे', 'रंजिश ही सही दिल दुखाने के लिये आ', 'तडप ना मेरे दिल, किसी की आस में, हजार तिल्खिया तेरी प्यास में' अशा एका पेक्षा एक सरस आणि अविट गोडीच्या गझलांनी रसिकांवर पाच दशकांहून अधिक काळ अधिराज्य गाजवणारे गझल सम्राट मेहंदी हसन यांचे कराची येथे निधन झाले. काही दिवसांपूर्वी त्यांना आगाखान रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. गेल्या १२ वर्षांपासून ते आजारी होते.

मेहंदी हसन यांचा जन्म १८ जुलै १९२७ रोजी राजस्थानातील लुणा गावात झाला. त्यांनी गायनाचे धडे वडील उस्ताद अमीझ खाँ आणि काका उस्ताद इस्माईल खाँ यांच्याकडून गिरविले.

पाकिस्तानचे जनरल आयुब खान यांनी त्यांना ''तमगा-ए-इम्तियाज''ने गौरविले होते. तर जनरल झिया उल हक यांनी त्यांचा ''गझलेची शान'' अशा शब्दात गौरव केला होता. तसेच जनरल परवेझ मुशर्रफ यांनी त्यांचा ''हिलाल-ए-इम्तियाज'ने सन्मान केला होता.

त्यांच्या मागे नऊ मुलगे आणि पाच मुली असा परिवार आहे. ❒

## सभासदांना सूचना

आमच्या प्रिय वाचकांनी, तसेच सभासदांनी वर्गणीचे नूतनीकरण करावे.
वर्गणीत वाढ झालेली आहे,
हे कृपया लक्षात ठेवून वर्गणीची पूर्ण रक्कम पाठवावी.
पुस्तक खरेदीस येताना मेंबरकार्ड जरुर आणावे
ही नम्र विनंती.

# बालनगरी

## भारतीय साबरी विद्येच्या पार्श्वभूमीवरील अफलातून फँटसी

### मंत्रावळी सुपारी

(मागील अंकावरून)

सेंट कार सायकल किती वाईट आणि कंटाळवाणी आणि छळवादी शाळा होती, हे तिथल्या कोणाही विद्यार्थ्याने अगदी सहज खुलासेवार सांगितले असते. प्रत्येक विद्यार्थ्याने छळ केले जाण्याचे नवनवे प्रकार नोंदवले असते. ते ऐकताना कान किटून गेले असते. पण सेंट सायकल किती वाईट शाळा होती याचे बखान करण्यापेक्षा अमुदि शाळा किती आनंददायक, चित्तथरारक, अनुभवदायिनी आहे, ते सांगायला ओमला मनापासून आवडले असते. नव्हे, सरलकाकाने त्याचीच रसभरीत वर्णने ऐकवायला सांगितले होते.

ओमच्या आईवडिलांकडून कधीना कधी ती शाळा सोडली जाण्याबद्दल आणि ही शाळा चालू करण्याबद्दल उत्तर, खुलासा मागितला जाणार याची त्याला कल्पना होती. साबरी शाळेविषयी मात्र अवाक्षर उच्चारायचे नव्हते. सरलकाकाला वाटत होते की अमुदि शाळेत वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या गंमतीजंमती ऐकून ओमचे आईबाबा हरखून जातील. ओमला अशा मस्त शाळेत प्रवेश मिळाल्याबद्दल त्यांना कदाचित त्याचा हेवाही वाटेल. ते सरलकाकाचे न थकता परत परत वाकून आभार मानतील. हं! किती सरळ मनाचा होता सरलकाका. त्याने ज्या आईवडिलांबरोबर पुरी आठ वर्षे काढलीत त्या ओमचे, त्यांना पुरते ओळखणाऱ्याचे वेगळे मत होते.

''आम्ही शिवाजीच्या पुतळ्यापाशी मैदानात भेटतो. म्हणजे जमतो आणि तिथून रोज वेगवेगळ्या ठिकाणी... वेगवेगळ्या दुकानदारांना... अं! माणसांना... अं! म्हणजे... पुष्कळ, पुष्कळ जागी जातो नी तिथल्या माणसांना भेटतो. म्हणजे...'' ओमला सांगण्यासारखं तर खूप होतं, पण नेमकी सुरुवात कशी करावी कळेनासे झाले.

''शीतल, उद्या दोन वाजता तुला कुठली अपॉईन्टमेन्ट आहे का? बघ जरा काही ॲडजस्ट कर. डॉन फियास्कोचे रेक्टर कोण आहेत? फादर फजिकल म्हणालेली ना सत्यभामा?'' बाबांनी ओमच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केलं आणि आईशी पुढच्या व्यवस्थेबद्दल चर्चा केली.

''अं नको! मला वाटतं आपण श्रीमंतांच्या इन्टरनॅशनल अकादमी मध्ये घालूया त्याला. हर्षाचा मुलगा वेलू तिथेच आहे. सत्यभामाने सुद्धा तिच्या मुलाला, करुप्पणला तिथेच हलवलंय. गेल्या वर्षीच्या त्या...'' आईने वाक्य तोडले. तिचे ओमकडे लक्ष गेले.

''हं! त्याची काळजी करू नकोस. त्याला माहित आहे ते. गेल्या वर्षी त्याने शब्द दिला होता. घरी नीट राहीन. कसले उपद्व्याप करणार नाही. त्याने ति पाळली नाही. सॉरी डियर. ओम, तुला बोर्डिंगमध्ये जावे लागेल.'' बाबांनी फैसला सुनावून टाकला. बहुतेक ते अशा एखाद्या संधीची वाट पाहत असावेत. ओमपासून सुटका करून घ्यायची संधी.

''आज घरापासून दूर जाताना तुला थोडे वाईट वाटेल. पण लवकरच तू तिथे रुळशील. आम्ही करतोय ते तुझ्या भल्यासाठी होते हे तुला मोठे झाल्यावर कळेल.'' ओम जन्माला येताना मोठा बनूनच का आला नाही, याची खंत तिच्या आवाजात प्रकटलेली. ती उठली आणि टीव्ही पाशी जाऊन तिने रिमोट उचलला.

''राहुल, आज किती दिवसांनी टीव्ही बघतेय रे मी?'' आढ्यतेने सोफ्यावर रेलत ती म्हणाली. प्लीज जरा डिशवॉशरमधली भांडी बघशील का?

बाबांनी खुर्चीवरून उठताना ओमकडे एक कटाक्ष टाकला. स्वत:शीच बेपर्वा खांदे उडविले आणि ते डिशवॉशरपाशी गेले.

ओम भानावर आला तेव्हा आईबाबा सारे आवरून बेडरूममध्ये जाऊन झोपी गेले होते.

तोही खचल्या चालीने आपल्या खोलीत गेला. झोपायचे कपडे बदलून अंथरूणात शिरला. सवयीने त्याने दिवे बंद केले. तसे खिडकीच्या

काळ्या तावदानातून बाहेरचे जग जिवंत झाले. जोरदार पाऊस चालू होता आणि बंद काचांवरून मोठे थेंबोळे पघळत खाली जात होते.

ओमची उशी आसवांनी ओली झाली. ती भिजवायची त्याला सवय झाली होती. सवयीने मग तिची सुकी बाजू बदलून त्याने डोक्याखाली केली. तो खूप घाबरून गेला होता. आपल्या आईबाबांना आपण नको आहोत याची कधी नव्हे तितक्या प्रखरतेने त्याला जाणीव झाली होती. आईबाबांनी आपल्याला टाकलं तर मग आपण कोणाला हवे असणार? असाही एक दिवस कधीना कधी येणार, हे सरलकाकाने त्याला साबरी शाळेत भरती होण्यासाठी सांगितले तेव्हापासून त्याच्या मनात आत कुठेतरी डाचत होते. आईबाबा साबरी शाळा कधीच कबूल करणार नव्हते. साबरी शाळा किंवा आईबाबा, कोणातरी एकाची निवड करायची होती. याच भीतीने गुप्तगंगेच्या काठावर बारा पिंपळाजवळ शपथ घेताना तो त्याच्या शाळेत परतला होता. पण पुत्रंजीव देवतेने त्याला ओढून साबरी जगात नेले होते. तो सुखाचा भास... ते अमुदी शाळेचे आनंदी स्वप्न आता संपणार होते. बाबा जे ठरवतात ते करतात. लवकरात लवकर या घरातून आपली उचलबांगडी होणार. ही कदाचित येथली शेवटची रात्र.

सरलकाकाचा विश्वास खोटा होता. तो म्हणत होता. आपण चुटकीसरशी तुझ्या आईवडिलांना पटवू. आता कुठे होता तो? उद्या संध्याकाळी आपल्याला इथून नेण्यात येईल. गुंडी, पंडीशी त्याला परत कधी संपर्क साधता येईल का? सरलकाकाची परत कधी भेट होऊ शकेल का? मंजुघोषाला आकाशात उडताना कधी त्या बोर्डिंग स्कूलमधला ओम दिसेल का? ओमचे काय झाले ते त्यांना कधी कळेल का?

ओमच्या मनात विचारांची, भावनांची आवर्तने चालू होती. परत परत घुमवून फिरवून तेच ते वाईट विचार, त्याच्या डोक्यात थैमान घालत होते...

आणि ही आई त्याच्यावर किती जोराने ओरडत होती, ''ओम, कुठे लागला तुला इतका वेळ? मी किती वेळ तुझी वाट पाहत उपाशी बसून आहे! माझा काही विचार?''

नली तिच्या खालच्या मजल्यावरच्या खिडकीतून ओमकडे भिरभिरत्या नजरेने बघत राहिलेली.

''काय सॉलिड आवाज आहे रे तुझ्या आईचा?'' आणि बाबांनी

त्याला धरून सरळ बुकलायला सुरुवात केली होती. त्याला बजावत होते, ''घरातून मला विचारल्याशिवाय यापुढे पाय बाहेर टाकता कामा नये. मी तुझ्यावर लक्ष ठेवून असणार आहे. तू काय करतोस, कोठे जातोस, कोणाकोणाला भेटतोस सगळ्या गोष्टी बरोबर मला कळल्या पाहिजेत. आल्याबरोबर ताबडतोब मला सगळं सांगितले पाहिजेस. कळलं? आणि मग ओमने घडाघडा साऱ्या गोष्टी बाबांना सांगितल्या. दरवेश्याच्या अस्वलाने खिजवल्यामुळे चंटीची कशी पाठ घेतलेली आणि पळापळीत राम श्यामच्या पायात पाय अडकून कसा पडला होता.. नि अस्वलाच्या गुदगुल्यांनी कस्सा खिदीखिदी खिदळत होता, ते ऐकताना तर बाबांनाही चक्क हसू फुटत होते. ते दाबून त्यांनी त्याला पुन्हा सारे नीट नीट सांगायला डाफरले.

ठक.. ठक.. ठक. ओमचे कान आवाज टिपत होते. स्वप्न नव्हे, ते सत्य होते. ओम सुखाच्या स्वप्नविलासातून जागा व्हायला तयार नव्हता. आवाजाची तीव्रता वाढतच होती. त्याने डोळे उघडून पाहिले. खिडकीकडून आवाज येत होता. काहीतरी पांढरे तिथे होते आणि खिडकीवर टकटकत होते. अधांतरी एखादे भूत? की एखादा पक्षी?

ओमची झोप उडाली. धावत जाऊन त्याने खिडकी उघडली. ओल्या पंखांतून पाण्याचे तुषार त्याच्यावर उडवत, एक पांढरा पक्षी टेबलावर येऊन बसला.

बाहेर पाऊस थांबला होता.

जोशीकाकूंच्या कुंड्यांमध्ये फुललेल्या रातराणीचा दरवळ आला. खिडकीतून लावलेल्या आकाशी पडद्यांमधून बाहेरच्या प्रकाशाचे झोत रंगीत संगीत होऊन त्याच्या खोलीत पसरले होते. आसपासच्या एखाद्या घरात इतक्या रात्रीही कुठेतरी टीव्हीवरील बातम्या ऐकल्या जात होत्या. रस्त्यावरून जाणाऱ्या चुकार वाहनांचा घरघराट.

परत एकदा पंखांचा फडफडाट करीत तो पक्षी म्हणाला,

''बाळ, मुळी भिऊ नकोस हो. कोणी तुला कुठे पाठवत नाही. आम्ही आहोत ना! सकाळी सरल येईल. तुझ्या आईबाबांना भेटेल. मग सारे व्यवस्थित होईल. आताच येत होता. मीच म्हटले झोपलेल्यांची झोपमोड करणे पाप आहे.''

ओमने डोळे मिटून घेतले. जर हे स्वप्न असेल तर ते कधीच तुटायला नको. तोच खळकन आवाज करत कुठेतरी काचा फुटल्या.

आपोआपच त्याचे मिटले डोळे उघडले गेले.

रावकाकांचा आवाज गर्जत गेला. समोरच्या सिंधुगर्जना इमारतीतल्या त्या टिव्ही चालू असलेल्या खोलीची काच त्यांनी काहीतरी फेकून फोडली होती. इतक्या रात्रीपर्यंत टीव्ही चालवून झोपमोड केल्याबद्दल त्या टिव्हीवाल्याला शिवीगाळ करत होते. हे स्वप्न नक्कीच नव्हते. सत्य होते.

ओमचा जीव खुशालून आला.

तोच परत काचा फुटल्याचा आवाज झाला. आपोआप ओम खिडकाशी गेला. सिंधुगर्जनामधल्या टीव्हीवाल्याने रावकाकांच्या खिडकीवर काहीतरी मारले होते. नेम चुकून व पल्ला न गाठता आल्याने त्या वस्तूने खालच्या मजल्यावरच्या राघवकाकांची काच फोडली होती.

राघव काका भांडाभांडीत सामील झाले.

मंजुघोषाने तीव्र नापसंती दाखवित मान वेळावली. आणि तो बोलता झाला. ''बाळ, तुझ्या पुकाऱ्याच्या आर्ततेने सरलला कळले हो. भारी जीव आहे त्याचा तुझ्यावर. तुझ्या वडिलधाऱ्यांनी तुला दूर धाडायचे ठरवले, याचे तुला जे तीव्र दुःख झाले आणि ज्या तीव्रतेने तू सरलची आठवण केलीस, त्यामुळे तुझ्या मनाची कळ त्याच्या मनाला जाऊन भिडली. तुमची मने जोडली गेली. तुझे विचार त्याला कळले. बरे, तुला मनोसंवादाची नीट जाण नाहीसे दिसते. सरलला त्याचे विचार. झाले ना बाळ?'' ओमने मान हलवेपर्यंत आणि काही उत्तर देईपर्यंत खिडकी बाहेरचा गडबडाट दहापटींनी वाढला होता. म्हणजे इतर दहा घरे रात्रीच्या वेळी शिमगा घालणाऱ्या त्या तीन घरांना गप्प करण्यासाठी शिकस्त करत होती. मंजुघोषाचे बोलणे त्याला बरेचसे अस्पष्ट ऐकू आले होते.आई बाबा जागे झाले होते त्यांच्या खोलीच्या बंद दारापाशी आवाज येत होते. ओमने दाराला कान लावला.

''शीतल, ओमच्या खोलीत कोण बडबडतेय?''

''ओह! हा मुलगा नेहमी रात्री झोपेत काही ना काही बरळत असतो. आज तो जरा नाराज असणार, तेव्हा जास्त बडबडणार.''

ही मुलं म्हणजे एक कटकट आहे. मॉमच्या आग्रहाला बळी पडलो नसतो तर, हा मुलगा जन्मला नसता आणि हा प्रश्न निर्माण झाला नसता.

आता पश्चात्ताप करून काय उपयोग आहे राहुल? जाऊ दे. लोक

आपल्याला वांझ म्हणण्यापेक्षा त्याच्यावर होणारा खर्च परवडला. उद्या त्याला बोर्डींगमध्ये पोहोचवला की आपण सुटलो.

हो. तो त्याचं आयुष्य त्याच्या चालीने चालेल, आपण आपले.

''तो बराच हट्टी आहे. सरळपणे ऐकणार नाही. खूप सारे तमाशे करून दाखवणार. अख्खी बिल्डिंग गोळा करणार. आपली लाज घालवणार.

शीतल! कधीतरी जरा लोकं काय बोलणार? यापलीकडे आपण काय करणार? केलं पाहिजे याचा विचार करशील.

''बाहेर भांडाभांडी चालू आहे. आता आपल्या घरात नको.''

ओमच्या डोक्यावरून मंजुघोषाने मायेने पंख फिरवला. तो ओमच्या खांद्यावर येऊन बसलेला होता. ओमचे उजळलेले डोळे पुन्हा निस्तेज झाले होते. बाळ, म्हणूनच दुसऱ्यांचे बोलणे असे आडून ऐकू नये म्हणतात हो. लोक अभावानेच कोणाविषयी मागे चांगले म्हणतात. लोकांची बोलणी आडून ऐकताना फायद्याऐवजी दुःख, तिरस्कार वाट्याला यायचा बरे.''

''ते लोक नाहीत. माझे आईबाबा आहेत.'' ओम मुसमुसत करवादला.

''आहेत खरेच.'' मंजुघोषाला याऐवजी, खरेच आहेत? असे म्हणायचे असावे. थोडा वेळ गप्प राहून त्याने ओमचा उमाळा वाहून कमी होऊ दिला. ''तू मुळी म्हणून काळजी करू नकोस.'' सरल सकाळी सगळे ठीक करेल. आता मी निघतो. येऊ मी?''

''तो कसे सगळे ठीक करणार? त्याला काही कळतच नाही. त्याला वाटतेय अमुदि शाळेचे छान छान वर्णन केले की आईबाबा कबूल होणार. ते कबूल व्हायचे नाहीत. ओमने छातीठोकपणे सांगितले.

ते कसे ते तू त्यालाच विचारतोस का बाळ? तुला त्याच्याशी बोलायचेय का?'' मंजुघोषाचा आवाज मिस्किल वाटत होता. ओमचे डोळे लकाकले.

सरलकाकाने मोबाईल घेतला आहे का?

''मोबाईल?...फोन?.... नाही बरे! फोनची काय गरज जर आपल्याला सरळ त्याच्या मनात जाता येते?

फुर्र! ओमने एकदम घोड्यासारखे फुरफुरून मंजुघोषाला दचकविले. तो ओमच्या खांद्यावरून उडून परत टेबलावर जाऊन बसला.

''ते कसे? ही जादू आहे का?'' ओमची उत्सुकता ताणली गेली होती. जादू कशाला? कोणीही करू शकते. कोणालाही जमू शकते हो

बाळ. मग ओमला आजपर्यंत हे कसे जमले नव्हते? कोणी करताना त्याने कसे पाहिले, ऐकले नव्हते? जणू मंजुघोषाला त्याचा प्रश्न कळला.

माणूस निसर्गापासून दूर गेला आणि आपल्या अनेक मूळ नैसर्गिक शक्ती हरवून बसला. त्यातलीच ही एक हो.

अशी कशी विसरेल?

पोहणे विसरतो तश्शी. जगातला प्रत्येक मानव प्राणी पोहू शकतो. जसे सगळे चार पायांचे प्राणी पाण्यात पडले की आपोआप पोहू लागतात तसे. पण माणसाच्या मनाची पक्की धारणा होऊन बसलेली असते, मी पोहायला शिकलो नाही, मला पोहता येत नाही आणि घाबरून तो पाण्यात बुडतो. किती तरी दुर्दैवी जीव असे हकनाक जीव गमावून बसलेत. अरेरे!

फुर्रर! यात काही तथ्य आहे खरे, अशा अर्थी.

तशीच लहानपणापासून साऱ्यांची समजूत असते की प्रत्यक्ष समोर असल्याशिवाय, बोलल्याशिवाय आपल्याला एकमेकांशी बोलता, संवाद साधता येणार नाही. ही धारणा इतकी पक्की असते की प्रत्यक्ष तसा संवाद साधता येत असूनही इतर कोणी आमच्या मनाशी संवाद साधायचा प्रयत्न केला, तरी माणसाचे मन त्याचा विरोध करते. आपल्या मनात प्रवेश देत नाही. म्हणूनच सरलने तुझ्या मनाचे बोल स्वीकारले. तू मात्र त्याच्या मनाचे बोल स्वीकारू, समजू शकला नाहीस.

मला ऐकायचेयत आत्ता. ओमने अधीरतेने म्हटले.

सोप्पे आहे. तुझ्या मनाची धारणा हे शक्य नाही म्हणून आहे, ती बदलून टाकायची की हे शक्य आहे. आपोआप तुला त्याच्या मनाचे बोल ऐकू येऊ लागतील, बाळ.

हे शक्य आहे, हे शक्य आहे, हे शक्य आहे. ओम आपल्या मनाशी घोकत बसला. मंजुघोषचा हसल्यासारखा आवाज त्याला ऐकू आला.

हे तुला घोकावे का लागते बाळ? म्हणजे तुझ्या मनाचा विश्वास नाही असेच समजते हो.

ओमचा चेहरा गोंधळात पडला. हे काय अजून अतरंगी! म्हटले तर कितके सोप्पे, म्हटले तर कसेच जमत नाही. असाच बराच वेळ गेला. ओमने मनाची धडपड करणे सोडून दिले.

मंजुघोषही शांत खिडकीवर बसून होता. ओमला अचानक नवल वाटले. यावेळी मंजुघोषाच्या मनात काय विचार चालू असतील. त्याची बहीण घराकडे एकटी होती आणि त्यामुळे घराकडे लवकर पोहाचण्याची मंजुघोषाला चिंता वाटत होती. ओमच्या मनात जणू अचानक साक्षात्काराचा लखलखाट झाला. तो आपोआप मंजुघोषाला कळला. मंजुघोषाचे मनही ओमच्या जाणीवांनी सुखावल्याचे ओमला कळले.

''अलख.'' म्हणत मंजुघोषाने ओमचा निरोप घेतला आणि तो लगबगीने बाहेर उडाला. त्यापुढे मात्र त्याच्या मनाशी ओमला संवाद साधता येईना. आपल्याच नादात ओमला त्याला मनोसंवादातला अलख कळवता आला नाही.

ओम खिडकी बंद करून बिछान्यात विसावला. बाहेरच्या धुमश्चक्रीशी त्याला काही देणे घेणे नव्हते. मनातले धुमशान थंड झाले होते.

ओम झोपेत असताना जोरात दारावरची घंटी वाजली. ओमच्या घरची घंटी फार अभावाने वाजे. इतक्या सकाळी सकाळी तर कधीच नाही. ओम ताडकन अंथरूणातून उठला. धावत आपल्या खोलीचे दार उघडून बाहेर आला. तो मुख्य दाराकडे पोहोचण्याआधी आईबाबांच्या खोलीचे दार उघडले गेले.

''ओम आधी बाहेर कोण उभे आहे ते विचार,'' बाबांनी ओमला थांबवण्याचा प्रयत्न केला.

ओमने दाराच्या जाळीदार भोकातून पाहीले. त्याला वाटलेच होते. सरलकाका बाहेर उभा होता. आता बाबा नक्कीच सरलकाकाला हाकलून देणार. त्याचा अपमान करणार. ओम त्याला कसे तोंड दाखविणार होता? सरलकाकाला बाहेरच्या बाहेर परत जा असे सांगायचे का? ओमला फार वेळ विचार करता आला नाही. ओमने भीत भीत दार उघडले.

एक प्रसन्न घमघमाट आणि वाऱ्याची झुळुक आत शिरली. सरलकाकाचा पांढरा स्वच्छ कलाबुती काम केलेला सदरा, सुहास्य चेहरा आणि त्यावर लावलेला केशरकस्तुरीचा टिळा लगेच नजरेत भरत होता. आई बाबांचे लक्ष सरलकाकाकडे गेले.

''हे गुंडीचे सरलकाका.'' ओमने ओळख करून दिली.

''रूद्राक्षमाळ वाले?'' म्हणताना बाबांचे डोळे आक्रसले. ओमने गुपचुप मान होकारार्थी हलवली. ती रूद्राक्षमाळ गळ्यातून काढली जाऊ

नये म्हणून आईबाबांसमोर त्याला किती आक्रोश करावा लागला होता. ओमला आठवले. शाळेच्या बाबतीत तसला आक्रोश काही कामाचा नव्हता. ओम आईबाबांना पुरेपूर ओळखून होता. सरलकाकाला त्याने त्याची कल्पना द्यायचा प्रयत्न केला होता. तरी सरलकाका ते काम अगदी सहज सोप्पे समजत होता.

"ओम जरा आत जा." सरलकाकाने ओमला फर्मावले. त्या मोठ्या माणसांच्या काही खास गोष्टी असणार होत्या. अशा वेळी काय करायचे असते, ओमला स्वानुभवाने चांगले माहित होते. दाराआड उभे राहिले की सगळ्यांच्या नजरेआड सगळ्यांचे सगळे छान व्यवस्थित ऐकू येते. बाहेरच्या खोलीत कॅमेऱ्याचा फ्लॅश पडतो तसा भरपूर चकचकाट झाला असावा. मग सरलकाकाचा आवाज ऐकू येऊ लागला. सरलकाका अमुदि शाळेत जाण्याचे फायदे त्याच्या आईबाबांना सांगत होता. ओम तिथे भरती झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करत होता. याविषया संबंधी गुप्तता बाळगायला बजावत होता. ओमला आई बाबांचा एकही शब्द, प्रश्न, शंका ऐकू आली नाही. कसला वाद नाही. कसली अडवणूक नाही. कसला नकार नाही. सरलकाका त्याला जादू येत नाही म्हणाला होता. तरी त्याने काहीतरी जादू केली. नक्की केली. नाहीतर त्याचे आईबाबा? चक्क त्याचे आईबाबा इतक्या सहज राजी झाले? आणि परत तो फ्लॅशचा चकचकाट झाला. ओमला हाक मारून बाहेर बोलावले गेले. ओम बाहेरच्या खोलीत येऊन पाहतो तो सरलकाका दाराबाहेर पडत होता. ओम धावत त्याच्याकडे गेला. सरलकाका भिंतीचा आधार घेऊन लिफ्टची वाट पाहत थांबला.

त्याचा श्वास खूप फुलला होता. त्याची छाती जोरजोरात वरती खालती होताना दिसत होती. एक एक शब्द उच्चारायला त्याला खूप प्रयत्न करावा लागत होता. एखादे खूप ताकदिचे काम केल्याने थकल्यासारखा सरलकाकाचा आवाज अस्फुट येत होता. तो घामाने पार भिजला होता. त्याचा गोरा रंग लाल झाला होता.

ओम. .तुझे. काम. झाले. मग. भेटू. ..अलख.

(क्रमशः)

समीर बागायतकर, वेंगुर्ला
+९१-७७९८६७१४८०
इ-मेल : ssbagayatkar@yahoo.co.in



# दिवाळी अंक २०१२

## बालमित्रांसाठी स्पर्धा

## ‘जादू माझ्या मोबाईलची’

**बालमित्रांनो,**

यंदाच्या दिवाळी अंकासाठी एक स्पर्धा जाहीर करीत आहोत.

तुमच्या घरी मोबाईल असणारच. आईचा, बाबांचा, दादाचा, ताईचा
प्रत्येकाकडे वेगळा मोबाईल असणार
तुम्हीही तो कधीकधी वापरत असणार
त्यात कितीतरी गमती असतात, नाही!
परीकथेतल्या जादूच्या दिव्याप्रमाणे मोबाईलही कितीतरी कामे करतो.

मोबाईल वरून तुम्ही मित्रांशी गप्पा मारता. चित्रे बघता. गाणी ऐकता. गेम्स खेळता. इंटरनेटद्वारे अभ्यासही करू शकता. फोटो काढू शकता. फोटो एकमेकांना पाठवू शकता.

अशा कितीतरी गोष्टी करता येतात. एखाद्या जादूच्या दिव्याप्रमाणे मोबाईल खूप कामे करू शकतो.

तर मोबाईलच्या अशा गमतीजमती लिहून पाठवा २०/३० ओळीत.
तुमच्या लेखांतील आम्हाला आवडलेले लेख आम्ही दिवाळी अंकात छापू.

त्यातील ३ उत्तम लेखांना बक्षीस म्हणून छानछान पुस्तके देऊ.
पहिल्या नंबरला ५००रु. ची पुस्तके
दुसऱ्या नंबरला ४००रु. ची पुस्तके
तिसऱ्या नंबरला ३००रु. ची पुस्तके

**तुमचे लेख आम्हाला ३१ ऑगस्ट २०१२ पर्यंत मिळायला हवेत**

**आमचा पत्ता :**

संपादक, मेहता मराठी ग्रंथजगत
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३०.
फोन – ०२०-२४४७६९२४



# ओळखा पाहू



## पाकिस्तानचे नुकतेच निधन पावलेले गझल सम्राट

विजेत्यास २००रु. किंमतीचे पुस्तक भेट म्हणून पाठवण्यात येईल

आपली उत्तरे दिनांक १५ ऑगस्ट२०१२ पर्यंत आम्हाला मिळायला हवीत.
बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल.
निकाल सप्टेंबर २०१२ च्या अंकात जाहीर होईल.

## 'मे' अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

नवसाहित्याचे प्रभावशाली भाष्यकार आणि मराठीचे अध्यापक
वा.ल.कुलकर्णी

स्पर्धेचे विजेते - **मधु भट - मुंबई**

साक्षी नार्वेकर, अक्षय तांबवे, निरजा जगताप - बुलढाणा, ऐश्वर्या सोनावणे, सरिता भालेराव - पुणे, रुपाली पवार, अशोक बनसोडे, लता काकडे, अतुल गावडे - कोल्हापूर, संजय शिंदे, ऋजुता आंबेकर - रत्नागिरी,

**उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**
**मेहता पब्लिशिंग हाऊस,** मेहता मराठी ग्रंथजगत विभाग, १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, पुणे टेलिफोन भवनसमोर, पुणे-४११ ०३०.

# मेहता मराठी ग्रंथजगत

**वर्गणीदारांसाठी पुस्तक खरेदीवर सवलत**

**एक वर्षाला २०%   तीन वर्षांना २५%   पाच वर्षांना ३०%**

**एक वर्षाची वर्गणी १५०रु.**

**तीन वर्षांची वर्गणी ३५०रु.**

**पाच वर्षांची वर्गणी ५००रु.**

**तीन किंवा पाच**
**वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट**

३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'लोखंड खाणारे उंदीर'** आणि **'नशीबवान शेखर'**
लेखिका - वृषाली पटवर्धन
प्रत्येकी ३०रु.ची
पुस्तके भेट
पोस्टेज २०रु.

५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'चला जाणून घेऊ या मंत्रसामर्थ्य'**
आणि **'चला जाणून घेऊ या प्रार्थना'**
प्रत्येकी ४०रु.ची
पुस्तके भेट
पोस्टेज २०रु.







भेट पुस्तके प्रती शिल्लक असेपर्यंतच

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.**

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PNCW / M-184 / 2012 - 2014 / Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 July 2012

# Forthcoming

## The Art of Ageing




John Lane

Inspiration for a positive and abundant later life

"No young man believes he shall ever die," observed William Hazlitt. Yet ageing remains a natural part of life and it is precisely the impermanence of life that renders it so precious. Knowing that it is brief requires us to appreciate each moment of beauty and waste no opportunity for learning and love. *The Art of Ageing* has been written to help us achieve these ends. However this aim has become much more difficult on account of our culture's marginalization of the elderly and its glorification of the years of youth. A consequence of this bias is that ageing has become the major fear of a generation despite the calculation that by 2040 there will be more people over sixty-five years of age than children under five.

*The Art of Ageing* gives advice on how to make the most of ageing, how we can celebrate its positive gifts and includes the stories of a variety of people who have enjoyed creative and productive lives well into their eighties and nineties.

---

BOOK POST
Printed Matter

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, ______________________

______________________

______________________

______________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.